14-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1
MSK/ ST/ AKN/ 13:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**<u>सभागृहातील कामकाजाबाबत</u>**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ....

**सभापती** : कोणाही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्याअगोदर मला एक निर्णय जाहीर करावयाचा आहे.

आज दिनांक 14 डिसेंबर, 2015 रोजीच्या कामकाजपत्रिकेत तारांकित प्रश्न, अहवाल, म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना, लक्षवेधी सूचना, पुरवणी मागण्या, विधेयके व दुष्काळाच्या संदर्भातील प्रस्ताव इत्यादी कामकाज दर्शविण्यात आलेले आहे. मी माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे, इतर सर्व ज्येष्ठ माननीय मंत्री, माननीय मंत्री श्री. गिरीष बापट, दोन्ही सभागृहांचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षांचे ज्येष्ठ सन्माननीय नेते, सन्माननीय गट नेते यांच्याबरोबर बैठक आयोजित केली होती, या बैठकीत एकमताने घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे कामकाज करण्यात यावे असा निर्णय मी घेतलेला आहे. (एक) प्रश्नोत्तरे (दोन) अहवाल (तीन) म.वि.प. नियम 93 अन्वये सूचना घेण्यात येतील. लक्षवेधी सूचना व पुरवणी मागण्या पुढे ढकलण्यात येतील. नंतर दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चा ....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुरवणी मागण्या ....

**सभापती** : पुरवणी मागण्या उद्या सकाळी घेतल्या जातील असे ठरले आहे. आपण सकाळी जास्त वेळ बसू. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब, मला वाटते की, हे एक दिवसात संपवून टाकू. .... वेळ उपलब्ध होऊ शकल्यास विधेयके नंतर चर्चेस घेण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. मी आपले आभार मानण्यासाठी उभा आहे. दोन्ही सभागृहांचे कामकाज गेल्या आठवड्यात पूर्णपणे बंद पडले होते. आपण आज सकाळी आम्हाला आपल्या दालनात बोलावून बैठक घेऊन आवाहन केले आणि सभागृहाचे कामकाज सुरळीत सुरूकरण्याबाबत पुढाकार घेतला. खंबीरपणे भूमिका मांडली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

आज दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू करण्यामध्ये आपले मोठे योगदान आहे. त्यामुळे मी या ठिकाणी आपले आभार मानतो.

**सभापती** : ठीक आहे. प्रश्नोत्तरे ....

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ता.प्र.क्र.12387 व 12648 एकाच विषयासंदर्भातील आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, दोन्ही प्रश्नांवर एकत्रित चर्चा घेण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे. ता.प्र.क्र.12387 व 12648 एकत्र करण्यात येत आहेत.

**राज्यात शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(१)** * 12387 **श्री.कपिल** पाटील, **श्री.अमरिशभाई** पटेल, **श्री.संजय** दत्त, **श्री.मुझफ्फर हुसैन** सय्यद, **श्री.चंद्रकांत** रघुवंशी, **डॉ.अपूर्व** हिरे, **डॉ.सुधीर** तांबे, **श्री.अशोक उर्फ भाई** जगताप, **श्री.विक्रम** काळे, **श्री.नागो** गाणार, **श्री.अनिल** सोले, **श्री.हरिसिंग** राठोड, **श्री.धनंजय** मुंडे, **श्री.सुनिल** तटकरे, **श्री.हेमंत** टकले, **श्री.अमरसिंह** पंडत, **श्री.सतिश** चव्हाण, **श्री.जयवंतराव** जाधव : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय **:-**

(१) राज्यात सन 1995-96 पासून शासन मान्यतेने सुरु झालेल्या व अनुदानाचे निकष पूर्ण केल्यानंतर सन 2004-05 पासून अनुदानास पात्र होऊन शंभर टक्के अनुदान मिळत असलेल्या माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(२) राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक 1 **नोव्हेंबर**, 2005 नंतर सेवेत असलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीस मा.उच्च न्यायालयाचे अंतरिम स्थगिती दिली **आहे**, हे खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेचे खाते उघडणे व रक्कमा जमा करणे इत्यादी कार्यवाही पूर्ण होवू शकलेली **नाही**, हे ही खरे आहे **काय**,

(४) **असल्यास**, राज्यात सार्वत्रिकस्तरावर अन्यायकारक असलेली नवीन अंशदायी पेन्शन योजना रद्द करुन **नोव्हेंबर**, 2005 नंतर सेवेत कार्यरत असलेले राज्यातील सर्वच शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू **करावी**, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून सातत्याने शासनाकडे करण्यात येत आहे व त्यासाठी वारंवार आंदोलनेही करण्यात आली **आहेत**, हे ही खरे आहे **काय**,

(५) **असल्यास**, मा.उच्च न्यायालयाने अंतरीम स्थगिती दिलेल्या नवीन पेन्शन योजनेऐवजी आग्रही मागणी असलेली जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे व त्यानुषंगाने` कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (1) सन 2005 पूर्वी 100% अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे. **तथापि**, सन 2005 नंतर 100% अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन पेन्शन योजना लागू असून या संदर्भातील प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(२) हे खरे नाही.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387....

(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) हे खरे आहे.
(५) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

### राज्यातील शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्याबाबत

(११) * 12648 ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक 7512 ला दिनांक 24 जुलै, 2015 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन 1995-96 पासून शासन मान्यतेने सुरु झालेल्या व अनुदानाचे निकष पूर्ण केल्यानंतर सन 2004-05 पासून अनुदान देण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीचे खातेदार बनवून घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पासून अनुदानित शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतरांना अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात येणे, तसेच दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर जे सेवेत दाखल झाले आहेत त्यांना नवीन निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करण्यात येणार असल्याचा धोरणात्मक निर्णय माहे ऑक्टोबर, 2015 मध्ये शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर सेवेत रुजू झालेले 20 हजार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी नवीन निवृत्ती वेतन योजनेस पात्र असून भविष्य निर्वाह निधीचे खाते सुरु करण्याची त्यांनी मागणी करुनही त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक 23 सप्टेंबर, 2015 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते तातडीने सुरु करावे, अशा आशयाचे निवेदन शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, 2015 च्या तिसऱ्या आठवड्यात मा. शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) त्याचप्रमाणे, सदरचे भविष्य निर्वाह निधी खाते online पध्दतीने सुरु करण्यात यावे अशी मागणीही लोकप्रतिनिधींनी शासनाकडे त्याचसुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, संबंधित सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे (दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर रुजू झालेले) भविष्य निर्वाह निधीचे खाते अद्याप सुरु न करण्याची कारणे काय आहेत वव त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (1) दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी 100% अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू आहे तथापि सन 2005 नंतर 100 % अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन पेन्शन योजना लागू आहे, अशा कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू नाही.

(२) होय हे खरे आहे.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12648....

*(३) दिनांक* 1 नोव्हेंबर, 2005 ***पूर्वी*** १००% ***अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू आहे तथापि सन*** 2005 ***नंतर*** 100 % ***अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन पेन्शन योजना लागू*** आहे, ***अशा कर्मचाऱ्यांना*** भविष्य ***निर्वाह निधी योजना लागू नाही.***

***(४) होय हे खरे आहे.***

***(५) होय हे खरे आहे***

*(६) दिनांक* 1 नोव्हेंबर, 2005 ***पूर्वी*** १००% ***अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू आहे तथापि सन*** 2005 ***नंतर*** 100 % ***अनुदानास पात्र ठरलेल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना नवीन पेन्शन योजना लागू*** आहे, ***अशा कर्मचाऱ्यांना*** भविष्य ***निर्वाह निधी योजना लागू नाही.***

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सदर प्रश्नामध्ये दोन प्रश्न अपेक्षित आहेत. सन 2005 च्या अगोदर नेमणूक झालेले कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मिळण्याचा आणि सन 2005 नंतर नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. सरकारने पहिल्यांदाच काही वर्षे घोळ घातला, त्यामुळे आज हजारो शिक्षकांची अडचण झाली आहे. नेमणूक अगोदर झाली, मात्र अनुदानावर नंतर आले, शिक्षण सेवक अगोदर झाले, मात्र नियमित नंतर झाले अशांना नेमणुकीच्या दिनांकापासून जुनी पेन्शन योजना लागू करणे अनिवार्य आहे. शासनाने अनेक शासन निर्णयांत मान्य केले आहे आणि केंद्र सरकारच्या योजनेमध्ये सुध्दा तेच अपेक्षित आहे, असे असताना, त्यांना ते का देण्यात येत नाही ?

सभापती महोदय, सदर बाबतीत आणखी अडचण झाली आहे की, डीसीपीएस अकाऊंट अकाऊंट उघडली आणि नंतर बंद केली. त्यामुळे हजारो शिक्षकांचे नुकसान झाले आहे. हा जटील प्रश्न आहे. त्यामुळे मी एकत्रितपणे विचारत आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, पैसे अडकून पडल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. केवळ अकाऊंट उघडले नाही म्हणून त्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी सुध्दा मिळू शकली नाही. त्यामुळे ती थकबाकी शासनाकडून मिळणार की नाही ? गेली अनेक वर्षे शासन पेन्शनबाबत निर्णय घेत नाही. न्यायालयात प्रकरणे पडून आहेत. वयाची 40/45 वर्षे ओलांडलेले अनेक शिक्षक आहेत. 8/10 वर्षांत जे निवृत्त होतील, त्यांच्या हातात काहीही पडणार नाही. शासन त्यांच्याबाबत काय करणार आहे ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387 व 12648....

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदय, सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, सन 2005 च्या अगोदर नेमणूक झालेल्या शिक्षकांना हे देत आहात. मात्र सन 2005 नंतर नेमणूक झालेल्या शिक्षकांच्या बाबतीत शासन काहीच निर्णय घेत नाही. शासन त्यांना काय देणार आहे हे स्पष्ट करणार आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बरीच वर्षे सातत्याने हा प्रश्न सभागृहात मांडला जात आहे. सर्व सन्माननीय सदस्य या विषयावर वारंवार पाठपुरावा सुध्दा करीत असतात. मुद्दा इतकाच आहे आणि या विषयाची वारंवार मांडणी करणाऱ्यांनाही ते माहीत आहे की, शानाने दिनांक 01.11.2005 ला धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. वित्त विभागाचे पत्र आहे. 100 टक्के अनुदान असणाऱ्यांनाच या पध्दतीची मार्क्सची योजना अशी त्यामध्ये क्लॅरिटी आहे. स्वाभाविकपणे शिक्षक कोर्टात गेले. पर्यायी योजना सुरू केली होती, त्याला कोर्टामध्ये स्टे दिला गेला. त्यामुळे जुनी योजना लागू करायची की नवीन योजना लागू करायची याबाबतीत माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर त्याची अंमलबजावणी शासनाला करता येईल. वित्त विभागाने दिनांक 01.11.2005 ला निर्णय घेतला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, संदर्भाधीन क्रमांक 1 ते 5 यांत नमूद केलेल्या निर्णयानुसार जे जे उमेदवार राज्यातील मान्यताप्राप्त 100 टक्के शासन अनुदानित प्राथामिक, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ विद्यालय .... वगैरे, वगैरे शासन निर्णय से.नि.वे.1008/प्र.क्र.16/सेवा-4, दिनांक 19 जुलै, 2011 असा हा निर्णय आहे. तेच कोर्टात आहे. त्यामुळे त्या विषयाचा निर्णय जोपर्यंत लागत नाही तोपर्यंत या विषयातील कोणताच निर्णय करता येत नाही असे मला वाटते.

श्री. कपिल पाटील, : सभापती महोदय, ....

**सभापती** : आपण 4 प्रश्न विचारले आहेत. 4 प्रश्नांची उत्तरे घ्यावीत, मग पुढचा प्रश्न विचारावा. व्यत्यय आणण्यात काही अर्थ नाही. माननीय मंत्री, 4 प्रश्नांची उत्तरे नेहमीच्या शैलीत द्यावीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी माझ्या शैलीत उत्तरे दिली. एकदा निर्णयाच्या संदर्भातील क्लॅरिटी माननीय उच्च न्यायालयाच्या माध्यामातून आली की, 4 नव्हे तर 10 प्रश्नांची उत्तरे मिळतील.

..7

ता.प्र.क्र.12387 व 12648....

श्री. नागो गाणार : सभापती महोदय, हा विषय नवीन परिभाषित अंशदायी पेन्शन योजनेच्या संदर्भात आहे आणि याबाबतचा पहिला एक निर्णय वित्त विभागाने दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 ला घेतला. माझा मूलभूत प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा, सेवा निवृत्ती वेतन नियम 1982, 1984 हे नियम विधिमंडळात संमत केले, ते रद्द करण्याचा अधिकार वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार वैध आहे का, नसेल तर, तो शासन निर्णय रद्द केला जाईल का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हे सर्व मुद्दे माननीय उच्च न्यायालयात चर्चेला आहेत. मला वाटते की, कितीही प्रश्न विचारावेत, काहीही प्रश्न विचारावेत, शंभर टक्के अनुदानित झालेल्या शाळा शासकीय सेवेत मानायच्या की 20 टक्के टप्प्याने झालेल्या मानायच्या हा मोठा डिस्प्युट आहे. स्वाभाविकपणे शिक्षक संघटना व शिक्षक आमदारांचे म्हणणे आहे की, तुम्ही मान्यता दिली आहे आणि ज्या म्हणण्यामध्ये सुध्दा तथ्य आहे. वेतन पूर्ण आलेले नाही. वेतन पूर्ण आले नाही तर शासन, मी वित्त विभाग व शालेय शिक्षण विभाग असा भेदभाव करीत नाही, शासन म्हणते की, आम्ही शंभर टक्के पगार देतो, तोच आमचा कर्मचारी, त्याला सर्व योजना लागू होतात. शासनाने असे म्हटले आहे. काही शिक्षक संघटनानी हे कोर्टात चॅलेंज केले आहे. कोर्टात त्यामध्ये डेलिबरेशन सुरू आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, सहावा वेतन आयोग किंवा हे सर्व प्रश्न .... 20 टक्के मान्य केले की शंभर टक्के केले यावर आहेत. त्यामुळे आपणच सांगावे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहेत. आज राज्यातील हजारो शिक्षक कर्मचारी त्याबाबत आक्रोश मोर्चा घेऊन विधिमंडळावर आले आहेत. अनुदान देणे किंवा न देणे हा सरकारचा निर्णय आहे. त्यांची केवळ एकच मागणी आहे की, दिनांक 01 नोव्हेंबर, 2005 पूर्वी नियुक्ती दिनांक असेल तर त्यांना नियमाने जुनी पेन्शन योजना लागू झाली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....B

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387.........

श्री.विक्रम काळे.........

हा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले असले तरी सुध्दा शिक्षकांच्या न्यायभावना लक्षात घेऊन मंत्री महोदयांनी निर्णय घेतला तर यामधून मार्ग निघू शकेल.

सभापती महोदय, वित्त विभागाने शिक्षण सेवकांना दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वीची जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. हा प्रश्न तर नियमित शिक्षकांचा आहे. केवळ 20 टक्के, 40 टक्के किंवा अनुदानच नाही, अशा शाळांमधील असल्यामुळे जर आपण त्यांच्यावर अन्याय करणार असू तर ते योग्य नाही. शासनाने या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला आणि तसे न्यायालयाला सांगितले तर ही याचिका निकाली निघू शकेल. न्यायप्रविष्ट बाब आहे, असे म्हणून शासनाला माघार घेता येणार नाही. शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सर्व शिक्षकांना आणि अन्य सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत सरकार काही पावले उचलणार आहे का ?

**सभापती :** या प्रकरणी न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक कृती समिती विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन दाव्यामध्ये माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 23 जानेवारी, 2014 रोजी राज्य शासनाच्या शासन निर्णयाला इंटरिअम रिलिफ म्हणून स्थगिती दिली आणि त्यामुळे ते थांबले.

**सभापती :** न्यायालयीन स्थगित नेमकी कोणत्या मुद्याबाबत आहे ?

श्री.विनोद तावडे : सन 2005 पूर्वीची योजना ज्यांना लागू नाही, अशांना आम्ही नवीन पध्दतीने डीसीपीएस योजना सुरु केली. ही योजना स्थगित करावी आणि the appointment of teachers prior to 01.11.2005 हे योग्य आहे किंवा नाही, हे ठरविल्यानंतर या प्रकरणी पुढे कार्यवाही करावी, असे सांगितले. तोच स्थगितीचा मुद्दा आहे. सन 2005 च्या आधीच्यांना लागू आहे की नाही, हाच मुद्दा आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387.........

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोर्टाने काय सांगितले आहे, हे मी येथे मांडले आहे. मी ज्यावेळी विरोधी पक्षात होतो त्यावेळी प्रकरण न्यायप्रविष्ट आहे म्हणून सभागृहात त्या प्रकरणी चर्चा टाळणे बरोबर नाही, असे मानणाऱ्यांपैकी मी सदस्य होतो. ज्यावेळी हा तारांकित प्रश्न आला त्यावेळी आमच्या विभागाने असे सुचविले होते की, ही न्यायप्रविष्ट बाब असल्यामुळे प्रश्न नाकारला पाहिजे. मी त्यांना सागितले की, अजिबात नाही, न्यायप्रविष्ट आहे म्हणून प्रश्न नाकारणे ही पळवाट आहे. खरोखरच एखाद्या न्यायप्रविष्ट प्रकरणाच्या सभागृहातील चर्चेमुळे न्यायालयीन निर्णयावर परिणाम होणार असेल तर ती चर्चा आपण टाळत असतो. कारण, आपण तेवढे मॅच्युअर्ड आहोत. परंतु, तसे नसेल तर सभागृहात चर्चा होऊ शकते आणि तशी ती आपण करीत आहोत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विषय अतिशय गुंतागुंतीचा आहे, हे आपल्या लक्षात आलेच असेल. ही केंद्र शासनाची योजना आहे. केंद्र शासनाने दिनांक 30 ऑक्टोबर, 2005 रोजी निर्णय घेतला आणि राज्य शासनाने दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 ला असा शासन निर्णय काढला आणि दिनांक 1/11/2005 पासून ही योजना लागू केली. Entry in service एवढाच विषय होता. दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी लागलेले आणि दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर लागलेले शिक्षक, असा मुद्दा होता. दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी लागलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना आणि दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर सेवेत लागलेल्यांना नवीन पेन्शन योजना, असा साधा, सरळ आणि सोपा विषय होता. त्यानंतर शासनाने एक शासन निर्णय निर्गमित केला. त्यामध्ये शासनाने असे म्हटले की, दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी सेवेत रूजू झाले असले, त्यांना शासनाने मान्यता दिली असली तरी जर त्या शाळांना शासनाने अनुदान दिले नसेल तर आम्ही त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणार नाही, त्यांना अंशदायी पेन्शन योजनेमध्ये यावे लागेल. अशा प्रकारचा जो निर्णय आला त्या अनुषंगाने न्यायालयामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हजारो शिक्षकांची प्रकरणे गेली. या संदर्भातील 10 हजार शिक्षकांची प्रकरणे न्यायालयामध्ये पेंडिंग आहेत. शेवटी शासनाला याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. Entry in service बाबत सांगावयाचे झाले तर आमची विनाअनुदानित सेवा पेन्शनसाठी आपण ग्राह्य धरता,

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387.........

श्री.रामनाथ मोते........

वेतन निश्चितीसाठी ग्राह्य धरता, वेतनवाढीसाठी ग्राह्य धरता, ग्रॅच्युईटीसाठी ग्राह्य धरता मग पेन्शन योजनेसाठी Entry in service ची तारीख दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वीची आहे, ती ग्राह्य धरून जुनी पेन्शन योजना लागू का करीत नाही ? या संदर्भात शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, नागपूर खडपीठाच्या न्यायालयीन प्रकरणाबाबत तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी सांगितले होते की, "हा निर्णय तुमच्या विरोधात होता." हा निर्णय आमच्या विरोधात नव्हता. शासनाचे एवढेच म्हणणे होते की, पॉलिसी मॅटरला आपण चॅलेंज केले आहे आणि धोरण ठरविण्याचा अधिकार शासनाचा आहे. त्यामुळे आता या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आणि या योजनेचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, अन्य अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाने जे निदेश दिले, अधिकार दिले त्याची अंमलबजावणी झालेली नाही. हे प्रकरण न्यायालयामध्ये आहे, हे आम्ही मान्य करतो. परंतु, अन्य प्रकरणात न्यायालयाने ही योजना लागू करावी, असे आदेश देऊन देखील शासनाच्या अधिकाऱ्यांकडून, या विभागाकडून त्याची अंमलबजावणी होत नाही. न्यायालयाने ज्यांना रिलिफ दिलेला आहे, दिलासा दिलेला आहे, त्या प्रकरणीशासन कार्यवाही करणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही हा विषय गांभीर्यानेच घेतो आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी या संदर्भातील निर्णय घेण्यात आला त्यावेळी हे लोक गप्प बसले. ते का गप्प बसले, माहीत नाही. परंतु, त्यावेळी ते गप्प बसले होते. त्यावेळी जर ते दोन मिनिटे जागे राहिले असते तर असे झाले नसते. पण आता असे आहे की, कोर्टामध्ये हे सर्व मुद्दे मांडण्यात आले आहेत आणि त्या ठिकाणी याबाबतची चर्चा सुरु आहे. मी

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ता.प्र.क्र.12387.........

श्री.विनोद तावडे.........

असे म्हटले की, माननीय उच्च न्यायालयासमोर वित्त विभागाने घेतलेला दिनांक 19 जुलै, 2011 चा शासन निर्णय आहे आणि तो मी आपल्याला वाचून दाखविला आहे. आता एवढाच निर्णय लागायचा आहे की, नियुक्ती केली म्हणजे पेन्शन लागू आहे का, नियुक्ती केल्यानंतर 100 टक्के पगार झाल्यानंतर योजना लागू होईल का ? शासनाचे इतर विभाग आणि शिक्षण विभाग यामध्ये फरक आहे. आज सरकारचा असा निर्णय आहे की, 100 टक्के पगार सुरु झाला तर ही योजना लागू आहे. या निर्णयाला कोर्टात चॅलेंज करण्यात आले असून कोर्टात चर्चा सुरु आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, 15 हजार शिक्षक पी.एफ.खात्याविना आहेत. आपण जे निदर्शनास आणले, तोच हा विषय आहे. त्यांची नियुक्ती नोव्हेंबर, 2000 पूर्वी झाली. पण त्यांची शाळा नंतर अनुदानास पात्र झाल्यामुळे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन

योजना लागू करावी का आणि त्यांचा समावेश नवीन पेन्शन योजनेत करावा का, यासाठी प्रकरण कोर्टामध्ये आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, नवीन शिक्षकांना ही पी.एफ.ची खाती तातडीने उपलब्ध करुन देणार का आणि नोव्हेंबर, 2005 पूर्वी नियुक्ती झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणार का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, तरुण, अभ्यासू सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी सन 2005 नंतरच्या शिक्षकांना अंशकालीन योजना लागू करणार का, असा प्रश्न विचारला आहे. त्यांना ही योजना लागू करणार आहोत.

श्री.सुधीर तांबे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे, त्याबाबत एक मुद्दा मला लक्षात आणून द्यावयाचा आहे. जुनी पेन्शन योजना आणि नवीन पेन्शन योजना, या संदर्भातील हा वाद आहे. आम्ही यापूर्वीही अर्थ मंत्री महोदयांना सांगितले होते की, या योजनेमुळे शासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही. सर्व कर्मचाऱ्यांना आपण या योजनेचा लाभ देत

..5....



श्री.सुधीर तांबे........

आहोत. शिक्षकांबाबत आता धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. फक्त थोडे शिक्षक, जे पूर्वी लागले आणि नंतर 100 टक्के वेतनावर आले आहेत, त्यांच्यामुळे शासनावर जास्त आर्थिक भार येणार नसेल तर शासनाने त्यांच्यासंदर्भात धोरण निश्चित करण्यास काय हरकत आहे ? नवीन पेन्शन योजनेच्या माध्यमातून कुटुंब निवृत्ती वेतन दिले जात नाही.

...C-1......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387........

डॉ.सुधीर तांबे........

त्यामुळे आज शिक्षक आणि सर्व शासकीय कर्मचारी रस्त्यावर आलेले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, नवीन पेन्शन योजनेऐवजी सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करण्यास हरकत नाही. त्यामुळे शासनावर कोणताही आर्थिक भार पडत नाही. माननीय शिक्षण मंत्र्यांनी पुढाकार घेऊन या संदर्भात अर्थ मंत्रालयासमवेत बैठक घेतली तर यातून चांगले सोल्यूशन निघू शकेल. माननीय शिक्षण मंत्री अशी बैठक घेणार आहेत काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी सांगितल्याप्रमाणे शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसेल तर करुन घेऊ.

श्री.दत्तात्रय सावंत : सभापती महोदय, केंद्र शासनाची परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजना दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी लागू आहे. परंतु, अगोदर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी जुनीच पेन्शन योजना लागू आहे, असे न्यायालयाने अंतरिम आदेशात नमूद केले आहे. तरी देखील 30 हजार लोक उच्च न्यायालयात गेलेले आहेत आणि त्या सर्वांना अंतरिम आदेश मिळालेला आहे. मी शालेय शिक्षण विभागाचे एवढ्यासाठी अभिनंदन करतो की, शालेय शिक्षण विभागाने कोर्टात अत्यंत चांगली भूमिका मांडलेली आहे. वित्त विभागाची भूमिका विरोधी आहे, चुकीची आहे. या दोन्ही विभागांनी एकत्र बसून तत्काळ निर्णय घेतला तर राज्यातील सुमारे 50 हजार शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळणार आहे. म्हणून वित्त विभाग आणि शिक्षण विभाग एकत्रित बसून या संदर्भात निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून आपण सकारात्मक निर्णय घ्यावा.

**सभापती :** शिक्षक मतदारसंघातील सर्व सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आपण ते कार्यवृत्तातूनही घेऊ, आपण या संदर्भात पॉईंट्स काढावेत. ज्या लिगल अडचणी आहेत त्याबाबत तुम्ही मुद्दे काढा आणि शुक्रवारच्या आत माझ्या दालनात बैठक घेऊन आपण हा विषय सोडविण्याचा प्रयत्न करू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387........

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती :** तोपर्यंत निर्णयच होणार नाही. बैठकीत काही तरी ठरेल. प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. आपण तो निर्णय घेतलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे एवढेच म्हणणे आहे की, या विषयाबाबत खरच बैठक घेण्याची आवश्यकता आहे काय ? अनेक वर्षापासून सभागृहात असे प्रश्न चर्चेला येतात. प्रामाणिकपणे सांगायचे तर समोरच्या बाकावरुन आणि या बाकावरुनही या संदर्भात स्पष्टता आहे. कन्फ्युजन काय आहे ते मी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरातच सांगितले आहे. आता माननीय सभापती या विषयावर बैठक घेणार, मग विषय सुटणार, मग पुन्हा चार आत्महत्या झाल्याचे मॅसेज येतात. आपण कृपया असे करु नका. यामध्ये खूप स्पष्टता आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : मी निर्णय दिलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. मी आज आपल्याला भेटून या संदर्भात माहिती देतो. त्यानंतर आपण निर्णय द्यावा.

**सभापती** : ठीक आहे. मी जो निर्णय दिलेला आहे त्यावर मी ठाम आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय,....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी कृपया जागेवर बसावे. आपण शिक्षक आमदार आहात. आपण शिक्षकाप्रमाणे वागले पाहिजे. माननीय श्री.विनोद तावडे साहेब, आपण आजच भेटू, निर्णय घेऊ आणि आवश्यकता वाटली तर करु.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांनी आपल्या उत्तरात न्यायप्रविष्ठ बाबी, त्यामुळे निर्णय कसा होत नाही आणि 10 हजारापेक्षा जास्त प्रकरणे न्यायालयात आहेत असे सांगितले. मला असे वाटते की, ही दोन-तीन क्षेत्रे अशी आहेत की, त्यासाठी आपण न्यायालयाला मध्ये आणूच नये. शिक्षण असेल, आरोग्य असेल ही तुमची जबाबदारी आहे. बऱ्याच वेळा कोर्ट देखील सांगते की, तुम्ही आणि संबंधितांनी समोरासमोर बसावे आणि आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट करावे. हे विषय असे आहेत की, तुम्ही शिक्षकांच्या प्रतिनिधी बरोबर एकत्रित बसून यातून मार्ग

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12387........

श्री.हेमंत टकले.......

काढणे आवश्यक आहे. तुम्हाला जर वाटले की, अन्याय होतो तर त्यातून मार्ग काढणे आपल्या हाती आहे. आपण मागे काय झाले या इतिहासात न जाता काही तरी नवीन पायंडा सुरु करु शकता. आपण सर्वांना बोलावून घ्यावे आणि तुम्हाला ज्या मागण्या न्याय वाटतात आमच्या समोर मांडा, कोर्टासमोर नाही. आपण त्याला मान्यता घ्यावी. त्यामुळे लवकर निर्णय होईल आणि कोर्टातील केसेस मागे घेतल्या जातील. असे काही पर्याय आपण बघणार आहात काय ?

**सभापती** : आपण हे दुपारी ठरवू. आता आपण तारांकित प्रश्न क्र.12731 चर्चेला घेऊ.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुरु होऊन आता 25 मिनिटे झालेली आहेत. आता पर्यंत एकाच तारांकित प्रश्नावर चर्चा झालेली आहे. विषयाचे भान, गांभीर्य आम्हाला निश्चितच आहे. परंतु, राज्यात या बरोबरच इतरही गंभीर विषय आहेत याचाही विचार होणे गरजेचे आहे. एका तारांकित प्रश्नावर 25 मिनिटे चर्चा होणार असेल तर आपण पुढील प्रश्नांना न्याय कसा देणार आहात ?

**सभापती** : मी मघाशीच तारांकित प्रश्न क्र.12731 पुकारलेला आहे.

--------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण अ.क्र.2 वरील तारांकित प्रश्न क्र.12731 आणि अ.क्र.5 वरील तारांकित प्रश्न क्र.11362 एकत्रित चर्चेला घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

**राज्यात अनेक वर्षापासून सुरु असलेल्या व अनुदानासाठी पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत**

**(२) * १२७३१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंद ठाकूर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक वर्षापासून सुरु असलेल्या व अनुदानासाठी पात्र ठरलेल्या शाळांना व त्यांच्या वर्ग तुकड्यांना अनुदान देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून जाचक निकषांची पूर्तता करणे सक्तीचे केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने केलेल्या जाचक निकषांच्या विरोधात दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास राज्यातील विविध शिक्षक संघटनांनी मोर्चा काढून निषेध नोंदविला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने अनुदानासाठी पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे : (१), (२), (३)** व (४) शासन निर्णय दिनांक २० जुलै, २००९ नुसार निधीच्या उपलब्धतेनुसार शाळांना वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. यासंदर्भात विविध शिक्षक संघटनांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी मोर्चाचे आयोजन केले होते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**राज्यात कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना मानधन देण्याबाबत**

**(५) * ११३६२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक २८२५ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कायम विनाअनुदान तत्त्वावर चालणाऱ्या प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व महाविद्यालये येथील शिक्षक वर्ग गेल्या अनेक वर्ष पगारापासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र.12731 व 11362........

(२) असल्यास, सदर शिक्षकांना मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) विहित निकषानुसार अनुदानास पात्र ठरणा-या शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

श्री.दत्तात्रय सावंत : सभापती महोदय, मी शालेय शिक्षण विभागाचे मनापासून अभिनंदन करतो. शालेय शिक्षण विभागाने सन 2001 पासून मान्यता दिलेल्या शाळांना अनुदान देत असताना दिनांक 8 जुलै, 2014 रोजी तत्कालीन मंत्री महोदयांनी 58 शाळांना अनुदान दिले आणि 1234 शाळांना अनुदान देण्याबाबत शिक्षण मंत्र्यांनी दोन दिवसापूर्वी निर्णय घेतलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. या अनुषंगाने एक छोटा प्रश्न राहिलेला आहे आणि तो म्हणजे, त्यावेळी ज्या शाळांचे मूल्यांकन झाले त्याच वेळी तुकड्यांचेही मूल्यांकन झाले होते. आपण शाळांना पात्र घोषित केले. परंतु, तुकड्यांना पात्र घोषित केलेले नाही. ज्या अधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर प्रशासकीय भूमिका पूर्ण करावयास पाहिजे होती त्यांनी ती पूर्ण केलेली नाही. आता सन 2015 हे वर्ष संपत आले आहे. त्यामुळे आपण त्या तुकड्यांना पात्र घोषित करून अनुदान देणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे मला असे वाटले होते की, आपण हा प्रश्न पुकारण्यापूर्वी सन्माननीय सदस्य स्वतःहून म्हणतील की, मंत्री महोदयांनी या संदर्भात अगोदरच निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे आपण या प्रश्नाऐवजी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील प्रश्न चर्चेला घेऊ. परंतु, त्यामध्ये काही तरी असते आणि ते महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.दत्तात्रय सावंत यांनी तुकड्या, त्यांचे मूल्यांकन, त्यातील त्रुटी या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी ज्यावेळी या संदर्भात घोषणा केली त्याच वेळी

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र.12731 व 11362........

सांगितले की, शाळा असो किंवा तुकड्या असोत, आम्ही या सर्वांची पूर्तता करुन घेतो. माझे असे म्हणणे आहे की, सर्व विषयांची एकाच वेळी मागणी करु नये, नाही तर आहे ते देखील मिळत नाही. आपण राज्याची आर्थिक स्थिती समजून घ्यावी. तरी देखील आम्ही हिंमतीने निर्णय घेत आहेत. आपण काही तरी धिराने घेतले पाहिजे. यांनी हे सांगितले, असे करु नका. माझे असे म्हणणे आहे की, आपण सर्व नीट आणि योग्य पद्धतीने करू. नाही तर मग ज्या प्रकारचे कन्स्ट्रेन्टस वित्त विभागावर आहेत त्यामुळे हे सर्वच थांबेल. म्हणून आपण योग्य पद्धतीने जाऊ. आपण तोपर्यंत धीर धरु या.

--------

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*मुंबईत कागदाच्या लगद्याच्या गणेशमुर्तीची स्थापना करण्याबाबत*

***(३) * १२२३५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय पर्यावरण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) मुंबईतील मुर्तीकार पाटकरांच्या तीन पिढया गणेशमुर्ती साकारत असून सन २००३ पासून शाडूची माती न वापरता कागदाच्या लगद्याची गणेशमुर्ती बनविण्यास सुरूवात करून पर्यावरणाचा ऱ्हास रोखणारी कागदाच्या लगद्याची मनमोहक २५ गणेशमुर्ती साकारल्या आहेत, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, या तंत्रज्ञानाचा विस्तार व्हावा आणि अधिकाधिक कागदाच्या लगद्याच्या गणेशमुर्ती गणेश भक्तांनी त्या मुर्तीची स्थापना करावी यासाठी शासन विचाराधीन कृतिशील आहे, हे खरे आहे काय,*

*(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,*

*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रामदास कदम यांच्याकरिता* **:** (१) *श्री. पाटकर कागदाच्या गणेश मुर्ती तयार करतात हे खरे आहे.*

(२) *पर्यावरणस्नेही गणेशमूर्तींच्या स्थापनेबाबत शासन व्यापक जनजागृती करत आहे.*

(३) *पर्यावरणस्नेही ी गणेशोत्सवासाठी राज्यात अग्रगण्य वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिन्या यासारख्या प्रसार माध्यमांच्या सहाय्याने सार्वजनिक गणेश मंडळ, घरगुती गणेश उत्सव व गृहनिर्माण सोसायटी यांच्याकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. पर्यावरणपूरक गणेशोत्सवास दरवर्षी वाढता प्रतिसाद मिळत आहे.*

(४) *प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आपण गणेशोत्सव, दुर्गादेवी उत्सव अत्यंत उत्साहाने साजरा करतो. परंतु, त्यावेळी आपल्या समोर काही महत्वाचे प्रश्न उपस्थित होतात. तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "श्री.पाटकर कागदाच्या गणेश मूर्ती तयार करतात हे खरे आहे." माझा प्रश्न असा आहे की, आपण गणेश मूर्तींची अत्यंत भक्ती भावाने पूजा करतो, आरती करतो, प्रसाद करतो. गणोशोत्सवात वातावरण अत्यंत अत्साहाचे असते.

..D-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12235...

श्रीमती विद्या चव्हाण...

अनेक ठिकाणी गणपती उत्सव दीड दिवस, पाच दिवस, गणपती गौरी सात दिवस किंवा 11 दिवस गणपतीची पुजा केली जाते. आज गणेशमुर्तीची उंची जवळपास 21 ते 30 फूटापर्यंत असते. गणेश मुर्ती किती फूटाची असावी असे कोणतेही बंधन घालण्यात आले नाही. माझा प्रश्न असा आहे की, गणपती विर्सजनासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात येतात. गणपती विसर्जन केल्यानंतर अनेक चौपाट्या किंवा कृत्रित तलावात दुसऱ्या दिवशी त्या मुर्तीची काय अवस्था होते ते आपण सर्वजण पाहतो. गणेशमुर्तीची आपण अत्यंत भक्तीभावाने पुजा करतो, दुसऱ्या दिवशी त्या गणेशमुर्तीचे अवशेष त्या ठिकाणी पहावयास मिळातात. ही बाब अत्यंत हृदयद्रावक व प्रत्येकाचे मन हेलावून टाकणारी आहे. ज्या मुर्तीची आपण अत्यंत भक्तीभावाने पुजा करतो त्या मुर्तीची अशी अत्यंत दुर्दशा होणे योग्य नाही. गणेशमुर्ती तयार करण्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरिस वापरण्यात येते. डेकोरेशनसाठी थर्माकोलचा वापर केला जातो. प्लॅस्टर ऑफ पॅरिस किंवा थर्माकोलचे विघटन होत नसल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो, अशा प्रकारे यातून दोन प्रश्न निर्माण होतात. ज्या गणेश मुर्तीची आपण भक्तीभावाने पुजा करतो त्यांच्या विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशी त्या मुर्तीचे अवशेष महानगरपालिकेच्या ट्रकमध्ये गोळा केले जातात. काही चॅनलवर असे दाखविण्यात आले की, गणपतीच्या मुर्ती अक्षरश: ढकलून दिल्या जातात. भक्तांच्या भावना दुखावणाऱ्या या सर्व बाबी आहेत, प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मुर्ती व थर्माकोलवर ताबडतोब बंदी आणावी. पर्यावणाचा ऱ्हास होणार नाही, तातडीने ज्याचे विघटन होईल व आपल्या भावना दुखावल्या जाणार नाहीत अशा पेपरच्या लगद्यापासून किंवा शाडूपासून छोट्या मुर्ती तयार केल्या जात आहेल. परंतु मोठ्या गणेश मुर्ती तयार करण्यासाठी पेपरच्या लगद्याचा किंवा शाडूचा वापर करण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी अत्यंत महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. पर्यावरणाची महाराष्ट्र व मुंबईला जास्त गरज आहे. आता प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मुर्ती मोठ्या प्रमाणात तयार करण्यात येतात. सन 2003 पासून मुंबई व महाराष्ट्रात शाडूपासून व कागदाच्या लगद्यापासून मुर्ती तयार केल्या जातात, सन 2003 ते 2014 पर्यंत महाराष्ट्रात मुर्तीकारांनी 5000 मुर्ती तयार केल्या आहेत. यामुळे

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12235...

श्री.प्रविण पोटे-पाटील...

पर्यावरण पूरक व पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी या सर्व कामांना शासनाकडून प्रोत्साहन दिले जाते. पर्यावरणाचा ऱ्हास थांविण्यासाठी लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सामना, सकाळ व डीएनए ही दैनिक वर्तमानपत्रे आणि झी मराठी या वाहिनीने समाजात चांगले वातावरण तयार केले आहे. सन्माननीय सदस्या यांनी असा प्रश्न विचारला की, प्लॅस्टर ऑफ पॅरिस व थर्माकोलवर शासन बंदी आणेल काय ? यावर बंदी आणण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. या निमित्ताने मला एक कल्पना सूचली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्याच्या कामासंदर्भातील अध्यक्षपद घेऊन संपूर्ण महाराष्ट्रातील सन्माननीय सदस्यांकडून प्रत्येकी एक लाख रुपये जमा करावे व जे लोक शाडू व कागदाच्या लगद्यापासून मुर्ती तयार करतात त्यांना विशेष पारितोषिक देऊन हे काम करण्यास त्यांना प्रोत्साहन द्यावे, त्यामुळे प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मुर्ती तयार करणे थांबतील असे मला वाटते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गणेशाची सेवा सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या हातून घडावी अशी माननीय राज्यमंत्री यांची इच्छा दिसत आहे, त्याबाबत मी त्यांचे निश्चितपणे स्वागत करते. माझा प्रश्न असा आहे की, जे मुर्तीकार मुर्ती तयार करतात त्यांच्या रोजगाराचा प्रश्न एका बाजूला आहे. पुणे शहरात या वर्षी जेथे उंच गणेश मुर्ती होत्या त्यांनी त्या मुर्तीचे विसर्जन न करता फक्त उत्सव मुर्तीचे विसर्जन केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, पर्यावरण पूरक गणेश मुर्ती तयार करण्यासाठी एखादी कालबध्द योजना तयार करावी यामध्ये मुर्तीकारांना देखील प्रोत्साहन मिळेल व पर्यावरणाचा नाश करणाऱ्या गोष्टी थांबविता येतील. सर्वात महत्वाचे म्हणजे ही बाब कायदेशीररित्या करु शकलो नाही तरी चायनिज गणेशमुर्ती विकत घेतल्या जाणार नाहीत या दृष्टीकोनातून कालबध्द कार्यक्रम किंवा एखादी योजना तयार करण्यात येईल काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी भूमिका मांडली ती अत्यंत चांगली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्यामुळे या बाबीकडे शासनाने विचार करण्याची गरज आहे. त्यानुसार शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. या विषयाबाबत महाराष्ट्र प्रदूषण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12235...

श्री.प्रविण पोटे-पाटील...

नियंत्रण मंडळाच्या सचिवांशी आमची चर्चा सुरु आहे. बाहेरुन प्लॅस्टर ऑफ पॅरिस किंवा अनेक रंगाच्या मुर्ती येतात त्यातून पाण्याचे प्रदूषण होते त्यामुळे या गणेश मुर्ती थांबविता येतील काय याबाबत चर्चा सुरु आहे. या दृष्टीकोनातून शासन योग्य ती कार्यवाही करीत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून पॅरिस येथे विचारमंथन चालू असताना हा प्रश्न सभागृहात उपस्थित झालेला आहे कदाचित हा योगायोग असेल. महाराष्ट्रातील सर्वांचे दैवत श्री गणेश आहे. या गणेश मुर्तीबाबत पर्यावरणाच्या बदलाची शासनाने दखल घ्यावी व एक चांगली सुरुवात करावी. इतर विभागाप्रमाणे याबाबत होऊ नये. जसे एस.टी.चा सौजन्य सप्ताह असतो. याचा अर्थ ते सप्ताहभर चांगले वागतात. 365 दिवसातील सात दिवस वगळले तर ते काय करतात. यामुळे गणेश मुर्ती हे एक प्रतिक मानून संपूर्ण पर्यावरणाचा व्यापक विचार करुन केवळ गणपती विर्सजनाच्या मुर्तीबाबतच नव्हे तर आज नद्यांची जी अवस्था आपण केलेली आहे त्या दुरुस्त करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. आपण पुरस्कारासाठी सन्माननीय सदस्यांकडून एक लाख रुपयांची मागणी केली आहे. यापेक्षा जास्त रक्कम आम्ही देण्यास तयार आहोत. नद्यांचे प्रदूषण थांबविण्याची जबाबदारी देखील आपण घेतली पाहिजे. यामध्ये काही सामाजिक संस्था काम करीत आहेत. गणपती उत्सवापासून प्रोत्साहन घेऊन वर्षभर सातत्याने पर्यावरण प्रेमींना हा कार्यक्रम राबविता येईल अशा प्रकारचा गणपती उत्सव फक्त दहा दिवसांचा साजरा न करता पर्यावरणासाठी वर्षभर चालू राहणारे उपक्रम या निमित्ताने करता येतील काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, या पध्दतीने शासनाची कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केला आहे. गणेश उत्सवाच्या कालावधीतच नव्हे तर महाराष्ट्रातील नद्यांचे प्रदूषण थांबविणे अत्यंत गरजेचे आहे यासाठी गेल्या

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-4

VVK/ AKN/ ST/ 13:30

ता.प्र.क्र.12235...

श्री.प्रविण पोटे-पाटील...

एक वर्षापासून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यासंदर्भात विचारविनियम करुन काही समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत यासंदर्भातून काही ठिकाणी अंमलबजावणी देखील झालेली आहे.

गणपती उत्सवानिमित्त पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याचा कार्यक्रम फक्त दहा दिवस न ठेवता हा कार्यक्रम वर्षभर सुरु राहिल व महाराष्ट्रातील नद्यांचे प्रदुषण कमी करण्यासाठी शासनाचा विचार सुरु आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण व श्रीमती निलम गोऱ्हे यांनी देखील प्रश्न उपस्थित केला आहे. पर्यावरण हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. पेण येथे गणेशमुर्ती तयार करण्याचे उद्योग सुरु आहेत. या ठिकाणी लाखो कामगार काम करीत आहेत. यावर्षी नाशिक आणि कोल्हापूर येथे लोकांनी गणेश मुर्तीचे विसर्जन न करता लहान व मोठ्या मुर्ती तेथे आणून दिल्या आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.निलम गोऱ्हे यांनी पुणे येथील उल्लेख केला आहे. नाशिक व कोल्हापूर येथील मंडळानी लाखो मुर्ती स्वीकारल्या आहेत व त्यांनी त्या मुर्तीचे पर्यावरण पूरक विसर्जन केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले की, हा विषय केवळ गणपती उत्सवापूरता न करता आज पर्यावरणामुळे समतोल बिघडला आहे त्यामुळे यासाठी कृती आराखडा तयार करुन एक विशेष चळवळ चालविली तर मुर्तीकारांना देखील यातून रोजगार मिळेल व पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही. अशा प्रकारचा कृती आराखडा मंत्री महोदय तयार करतील काय ?

....E-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12235......

श्री.प्रवीण पोटे-पाटील : Taken for action.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, लोकमान्य टिळक यांनी पुण्यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव सुरु केला. त्या पुणे शहरामध्ये यावर्षी सार्वजनिक मंडळांनी पुढाकार घेऊन गणपती मूर्तींचे विसर्जन केले नाही. परंतु सनातन सारख्या संस्थेने या संदर्भात विरोध केला. त्यांनी गणेश मूर्तीचे विसर्जन केलेच पाहिजे अशी भूमिका मांडली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली भूमिका स्वीकारणाऱ्यांना विरोध करणाऱ्या ज्या संस्था किंवा संघटना आहेत त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय?

श्री.प्रवीण पोटे - पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी गंभीर विषय मांडला आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी ज्या योजना करावयाच्या आहेत त्या आम्ही करणार आहोत, एवढेच मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, 2003 पासून शासन पर्यावरणाच्या रक्षणाच्या दृष्टीने अभ्यास करीत आहे, कन्सेप्ट शासनाच्या लक्षात आली आहे. आज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची संख्या करोडोच्या घरात गेली आहे. मंत्री महोदय असेही म्हणाले की, माती ऐवजी शाडूच्या मूर्ती तयार केल्या जात आहेत. गणेशोत्सवाशिवाय सार्वजनिक नवरात्रौत्सव, गोकूळ अष्टमीसारखे सण सार्वजनिक मंडळामार्फत साजरे होत आहेत. पर्यावरण स्नेही मंडळे, वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिन्या यांच्यामार्फत पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने जनजागृती केली जात आहे. आमदारांनी एक-एक लाख रुपयांचा निधी द्यावा अशीही अपेक्षा व्यक्त केली गेली. या संदर्भात सरकारची नेमकी भूमिका काय आहे? 2003 पासून या प्रश्नाचा अभ्यास सुरु आहे. माती, शाडू ऐवजी आता कागदाच्या लगद्यापासून गणेश मूर्ती तयार केल्या जात आहेत. मागील 12 वर्षात शासनाने काय अभ्यास केला, अद्याप अभ्यास पूर्ण झाला नसेल तर आणखी किती कालावधी लागणार आहे? प्रोत्साहन म्हणून बक्षिसे देण्यासाठी आमदारांनी प्रत्येकी एक लाख रुपये निधी दिला तर शासन त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देणार आहे हेही सभागृहाला सांगितले पाहिजे. जेणेकरुन गणेश आपल्याला चांगली बुध्दी देईल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12235.....

श्री.प्रवीण पोटे - पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारचे प्रोत्साहनात्मक काम करीत असताना शासनाने लोकवर्गणीची प्रथा सुरु केली आहे. लोकवर्गणीतून एखादे चांगले काम होत असेल तर पैसा हा महत्वाचा विषय न ठरता लोकांच्या सहभागातून मोठी चळवळ तयार होते. अशी चळवळ उभी करण्याची गरज आहे.

**सभापती :** मंत्री महोदय, मी आपल्याला असे सूचित करतो की, या संदर्भात लोकांचे मत परिवर्तन करावयाचे असे शासनाचे धोरण दिसून येते. प्रत्येक जिल्हयात पालकमंत्र्यांनी जी नोंदणीकृत मंडळे आहेत त्यांना बोलावून घेऊन पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने शासनाला जे काही करता येईल ते करावे.

---------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*रेशन धान्याच्या द्वार पोहोच योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत*

***(४)*** * **१२३२३** *श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.राजेंद्र जैन, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभये : तारांकित प्रश्न क्रमांक ३८५३ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राज्यात राबविण्यात येणाऱ्या रेशनच्या धान्याचा द्वार पोहोच या योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाई होत असल्याने त्यांचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,*

*(३) असल्यास, तद्नुसार सदर योजनेचा लाभ नागरिकांना व्यवस्थित व वेळेवर व्हावा म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,*

*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. गिरीश बापट* **:** *(१) हे खरे नाही.*

*(२) प्रश्न उद्‌भवत नाही.*

*(३) सुधारित धान्य वितरण पद्धतीनुसार अन्नधान्य शासकीय वाहतूकदाराकडून रास्त भाव दुकानापर्यंत पोहचविले जाते. धान्याचा अपहार टाळण्याच्या दृष्टीकोनातून वाहतूकदाराने त्याच्या वाहनांना हिरवा रंग देणे त्यावर सुधारित धान्य वितरण पद्धत असे ठळकपणे लिहिणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या जिल्ह्यातील वाहनांवर GPS यंत्रणा प्रायोगिक स्तरावर बसविण्यात आलेली आहे.*

*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या संदर्भात दोन महिन्यापूर्वी तक्रार देण्यात आली होती. द्वार योजना केवळ कागदावर सुरु आहे. वाहनांना हिरवा रंग देणे, त्यावर सुधारित धान्य वितरण पध्दत असे ठळकपणे लिहिणे, वाहनांवर जीपीएस यंत्रणा प्रायोगिक तत्वावर बसविणे याची अंमलबजावणी झालेली नाही. मी पुराव्यासहित मंत्री महोदयांकडे लेखी तक्रार दिलेली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12323........

श्री.अमरसिंह पंडित......

द्वार पोहोच योजनेच्या वाहनांसाठी वाहनचालक सुध्दा उपलब्ध नसल्यामुळे वाहने जागेवर उभी करुन ठेवलेली आहेत. ठेकेदार रॅकमधून माल उचलतात आणि तो माल खुल्या बाजारात विकण्यासाठी नेतात. या संदर्भात जो काळाबाजार सुरु आहे त्याच्या पुराव्यासह मी तक्रार दिलेली होती. एखाद्या विशिष्ट जिल्हयापुरता हा प्रश्न नसून संपूर्ण राज्यात या योजनेचा फज्जा उडाला आहे. एखाद्या जिल्हयातील किंवा तालुक्यातील हा प्रश्न असेल तर मी मान्य करतो. पुराव्यासह तक्रार दिलेली असताना शासनाकडून ठोस कारवाईची अपेक्षा आहे. सरकारी यंत्रणा वापरली जाते म्हणून मी लेखी तक्रार दिली होती. जर द्वार पोहोच योजना सुरु आहे असे शासनाचे म्हणणे असेल तर यंत्रणा कोणती आहे? यंत्रणा नसताना देखील मंत्री महोदय म्हणतात की, द्वार पोहोच योजना सुरु आहे. या योजनेसाठी शासन तातडीने यंत्रणा उभी करणार आहे काय आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी जिल्हानिहाय कशा पध्दतीने योजना सुरु आहे याची सविस्तर माहिती सभागृहाला दिली जाणार आहे काय?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी काही महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, 2012 मध्ये ही योजना सुरु झाली. 2012-13 नंतर या योजनेमध्ये काही त्रुटी आढळून आल्या म्हणून 2014 मध्ये या योजनेत सुधारणा करण्यात आली. आज राज्यातील 15 जिल्हयांमध्ये द्वार पोहोच योजना सुरु आहे. द्वार पोहोच योजनेचा अर्थ असा की, एफसीआयच्या गोडावूनमधून माल घेऊन तो तालुका किंवा जिल्हयाच्या गोडावूनमध्ये आणायचा आणि तेथून दुकानदारांपर्यंत तो माल पोहोच करायचा आहे. 19 जिल्हयांमध्ये ही योजना सुरु नाही. या योजनेत सहभागी असलेल्या ठेकेदारांकडून ट्रक वा टेम्पोमार्फत रेशन धान्य परस्पर बाजारामध्ये विकण्यासाठी नेले जाते असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी छापे घातल्यानंतर ही बाब लक्षात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, उर्वरित जिल्हयांमध्ये ही योजना सुरु करण्याकरिता खात्याचे प्रयत्न सुरु आहेत. पाच वेळा कोर्टाकडून स्टे आला. ठेकेदारांनी रॅकेट करुन एकही अर्ज भरायचा नाही असे असोसिएशनमार्फत ठरविले, म्हणून एकही अर्ज भरण्यात आला नाही. या यामुळे सामान्य माणसांचे

...5...



ता.प्र.क्र.12323.....

श्री.गिरीश बापट......

हाल होत नाहीत. याचे कारण असे की, ठेकेदारांनी गाड्या लावलेल्या नाहीत. 19 जिल्हे या योजनेमध्ये सामील झालेले नाहीत. जिल्हाधिकारी आणि आरटीओ यांच्यामार्फत जी वाहने ताब्यात घेतली जातात, त्यांचे पेमेंट दिले जाते. त्या माध्यमातून ही योजना सुरु आहे. मी हे मान्य करतो की, ही योजना जशी चालली पाहिजे तशी चालत नाही. याची अनेक कारणे आहेत. कोणाचे सरकार सत्तेवर होते आणि आता कोणाचे सरकार सत्तेवर आहे यामध्ये मी जाऊ इच्छित नाही. या योजनेबाबत खात्याने जेवढ्या जबाबदारीने काम करावयास पाहिजे होते तेवढे झालेले नाही. मी विरोधी पक्षात असताना देखील पुण्यामध्ये एक ट्रायल घेतली होती. ट्रकद्वारे माल वाहतूक केली जायची. परंतु प्रत्यक्षात जीपीएस यंत्रणा स्कूटरला लावली जायची. त्यामुळे ट्रकचा वापर होत नसे. म्हणून जीपीएस यंत्रणा बसविणे, संगणकीकरण करणे महत्वाचे आहे. महाराष्ट्र राज्यात एका जिल्हयासाठी एक टेंडर निघणार नाही. यामध्ये ग्रामीण आणि शहर असे दोन भाग पडतात. शहरी भागात एरिया कमी, दुकाने आणि लोकसंख्या जास्त असते. ग्रामीण भागात दोन दुकानांमधील अंतर जास्त असते. म्हणून मध्यंतरीच्या काळात एका तालुक्याकरिता 9 टन माल आणि 100 कि.मी.अंतर गृहित धरुन 8500 कोटी रुपयांचे पेमेंट देण्याचे मान्य केले होते. ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर ही शहरे आहेत, त्या ठिकाणी कॉम्पॅक्ट भाग आहे. डोंगराळ भागात दुकानांमधील अंतर दूर असते. एका तालुक्यापासून दुसऱ्या तालुक्यापर्यंत अंतर 100 कि.मी. आणि दुकानदारांना द्यायचा माल 20 ते 25 पोती असतो, तेथे वाहतुकदार टेंडर भरण्यास उत्सुक नसतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एफ.1....

ता.प्र.क्र.12323.....

श्री.गिरीश बापट....

त्यामुळे शहरी आणि ग्रामीण असे वेगळे टेंडर काढण्याचा निर्णय सरकारने घेतला असून त्याचा प्रस्ताव देखील तयार केला आहे. मागच्या दोन महिन्यामध्ये आम्ही निर्णय घेतला आहे की, अवैध वाहतुकीमध्ये टेम्पो, ट्रक सापडला तर तो आता सुटणार नाही. यापूर्वी अवैध वाहतूक करताना वाहन आढळले तर ते संध्याकाळ पर्यंत सुटून जायचे. आता नवीन धोरणानुसार तो ट्रक मालकाला मिळणार नाही. तो कोर्टात जरी गेला तरी कायदा असे सांगतो की, तो ट्रक आता सरकार लिलावामध्ये विकून टाकेल. मी मान्य करतो की, या योजनेमध्ये त्रुटी आहेत. यासंबंधी आम्ही अनेकांच्या भेटी घेतल्या आहेत. दुकानापर्यंत धान्य द्यायचे असेल तर बायोमॅट्रीक, जीपीएस सिस्टीम, आधारकार्ड लिंक-अप, संगणकीकरण, वाहनांना हिरवा रंग देऊन त्यावर शासकीय धान्य वाहतुकीसाठी असा फलक लिहिणे इत्यादी प्रकारच्या सुधारणा भविष्यकाळामध्ये करू. मला असे वाटते की, पुढील सहा महिन्यांमध्ये यात लक्षणीय सुधारणा होतील. माननीय सदस्यांना यात जे काही सुचवावयाचे असेल ते त्यांनी सुचवावे. त्याची मंत्री म्हणून मी स्वत: पाहणी करेन. यासाठी मी 22 जिल्ह्यांमध्ये जाऊन आलो आहे. दुकानदारांच्या असोसिएशनला भेटलो. वाहतूकदारांना भेटलो आहे. सगळ्यात शेवटचा मुद्दा सांगून मग आपण मला प्रश्न विचारावा. शासनाच्या हाय पॉवर समितीने मागची जी टेंडर्स होती त्यात 77 टक्क्यांपेक्षा जास्त जायचे नाही असे बंधन घातले आहे. त्यामुळे आता आमच्याकडे जी टेंडर्स येत आहेत ती 77 टक्क्यांच्या पुढील येत आहेत. पण ती आम्ही देऊ शकत नाही. लो टेंडर आले तर त्यात कायद्याची पळवाट काढण्यात येते. त्यामुळे आपल्या सगळ्या सूचनांचा आदर करून पुढील सहा महिन्यांमध्ये सुधारणा होऊन द्वार पोहोच योजना सुरू होईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, खात्याने दिलेली चुकीची माहिती माननीय मंत्री सभागृहामध्ये सांगत आहेत. कारण आजही द्वार पोहोच योजना सगळीकडे सुरू नाही.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, हे मी कबूल केले आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12323.....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, जेथे ही योजना सुरू आहे तेथे गोडावून मधूनच स्वस्त धान्य दुकानदाराची पोहोच घेतली जाते आणि त्यास माल दिला जातो. गावापर्यंत माल पोहोचवायला वाहतूक ठेकेदार जातच नाही. उलट सरकार स्वतःहून या योजनेचा फज्जा उडवून घेत आहे. त्यामुळे सुरूवातीलाच दोन टेंडर्स वेगवेगळी केली असती तर बरे झाले असते. पहिले टेंडर हे एफसीआय ते तहसील गोडावून आणि दुसरे टेंडर हे तहसील गोडावून ते स्वस्त धान्य दुकान असे पाहिजे होते. अशा प्रकारे आपण दोन वेगवेगळ्या एजन्सी फायनल केल्या पाहिजे होत्या. आमचा आदिवासी जिल्हा आहे. टीडीएसच्या मार्फत स्वस्त धान्य दुकानांपर्यंत धान्य पोहोचवले जात असे. त्यामुळे आदिवासी उप योजनेच्या माध्यमातून तेथ पर्यंत धान्य जात होते. पण आज गोडावूनलाच स्वस्त धान्य दुकानाची पोहोच पावती घेतली जात आहे. तेथेच स्वस्त धान्य दुकानदाराला माल दिला जात आहे ही वस्तुस्थिती आहे. असे संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. येथे आर.टी.ओ.चा उल्लेख करण्यात आला आहे. पण दुसऱ्या जिल्ह्यामध्ये त्यावर अधिक खर्च होत आहे. तेव्हा राज्य स्तरावर एक टेंडर काढले असते तर ते शासनाला स्वस्त पडले असते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या योजनेसंबंधी इगो न करता शासन स्तरावर या योजनेसंबंधात एकच टेंडर काढण्यात येणार आहे काय ? एफसीआय ते तहसील कार्यालय आणि तहसील कार्यालय ते स्वस्त धान्याचे दुकान असे टेंडर काढण्यात येणार आहे काय, असे टेंडर काढले तर सर्वसामान्य गरीब लाभार्थीपर्यंत धान्य तरी पोहोचेल. आज तेथे पर्यंत धान्य जात जातच नाही.

**सभापती :** आपला प्रश्न समजलेला आहे.

श्री.गिरीश बापट अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी राज्याचे एक टेंडर काढण्यात येणार आहे काय, अशा प्रकारची सूचना केली आहे मला असे वाटते की, तसे टेंडर काढता येणार नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, दोन टेंडर्स काढण्यात यावीत. एक म्हणजे एफसीआय ते सहसीलदार आणि दुसरे तहसिलदार ते स्वस्त धान्य दुकान.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12323.....

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आपली सूचना चांगली आहे. फक्त एकच अडचण आहे. एफसीआयमधून माल निघतो. काही खेडी अशी आहेत की तेथे दोनशे, अडीचशे, दीडशे लोकसंख्या आहे. त्यामुळे वाहतूकदाराला एक-दोन बोचकी एकाच गाडीने पुरविणे परवडत नाही. त्यांना तसे करायला सांगितले तर वाहतूकदार अव्वाच्या-सव्वा वाहतूक खर्च लावतो. हमाली देखील लावता. त्यामुळे रेशन असोसिएशन समवेत चर्चा झाली. त्यांनी असे सांगितले की, आपण एकच माणूस तेथे ठेवावा. वेगळे टेंडर काढले तर आम्हाला त्रास होईल. त्यांनी त्याला पूर्ण विरोध केला आहे. तरी आपल्या सूचनेचा अभ्यास करण्यात येईल. शहरी विभागात हे करणे शक्य आहे. पण ग्रामीण भागात अवघड जाईल. कारण मालाची क्वांटीटी कमी आहे. तरी आपल्या बरोबर चर्चा करून आपल्या सूचनेचा आदर करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय,....

**सभापती :** आपल्या उत्तरास मंत्री महोदयांनी समर्पक उत्तर दिलेले आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक प्रश्न अतिशय स्पेसिफिक विचारला होता की, यासंदर्भात राज्यस्तरीय एक टेंडर शासन काढणार आहे काय ? दुसरा एक महत्वाचा विषय आहे. केरळ राज्याने महामंडळ स्थापन केले आहे. तसे महामंडळ येथे स्थापन करण्यासंबंधीचा विचार शासन करणार आहे काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, महामंडळ स्थापन करण्याबाबतचा विचार शासन करीत आहे. 3-4 राज्यांचा अभ्यास करण्यासाठी टीम तयार केली आहे. त्यानुसार एका राज्यात टीम पाठविली होती. सदर टीम केरळ राज्यात गेली नव्हती. अजूनही दोन राज्यांमध्ये टीम पाठविणार आहोत. तद्नंतर विचार करण्यात येईल. परंतु, राज्यस्तरीय टेंडर काढण्यामध्ये मला आता तरी अडचण वाटत आहे. तालुक्यातील अंतर, डोंगराळ भाग, कि.मी.व वजनात ते बसत नाही. त्यामुळे असे टेंडर आता तरी काढता येणार नाही. पण जिल्हा स्तरावर टेंडर काढू. त्यात शहरी व ग्रामीण वेगळे करण्यात येईल.

**सभापती :** टीक आहे. आता पुढील तारांकित प्रश्न क्रमांक 11801 घेण्यात येईल.

......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 11362.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रूपनवर यांना सांगू इच्छितो की, मी पुढील तारांकित प्रश्न पुकारलेला आहे. आपण जो तारांकित प्रश्न पुकारीत आहात तो क्लब केला असून त्यावर उप प्रश्न देखील झाली आहेत. आपणाला जे काही विचारावयाचे असेल ते अन्य संसदीय आयुधांचा वापर करून विचारावे. सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी प्रश्न विचरावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय,....

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी खाली बसावे. आपण पुढील प्रश्नावर गेलेलो आहोत. आपण अन्य संसदीय आयुधांचा वापर करून प्रश्न उपस्थित करू शकता. हे एकच संसदीय आयुध नाही. मी रूलिंग दिलेले आहे. आपण खाली बसावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

श्री.सतिश चव्हाण : श्री.माणिकराव ठाकरे साहेब सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रूपनवर यांचा प्रश्न क्लब केलेला आहे. माझा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना न्याय मिळाला पाहिजे. आपण दोन्ही प्रश्न क्लब केले होते हे मी मान्य करतो. सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रूपनवर यांचा पाचवा प्रश्न क्लब केल्यानंतर देखील त्यांना प्रश्न विचारण्यास संधी मिळालेली नाही. त्यांना असे वाटले की, त्यांचा प्रश्न वेगळा असल्यामुळे त्यांना प्रश्न विचारण्यास संधी मिळेल.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांना सांगू इच्छितो की, मी सनमाननीय सदस्य श्री.रामहरी रूपनवर यांना सांगितले की, अन्य संसदीय आयुधांचा वापर करून आपण आपला हा प्रश्न उपस्थित करावा. सन्माननीय सदस्य नियम 93 अन्वये, विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे या संसदीय आयुधांच्या माध्यमातून आपला प्रश्न उपस्थित करू शकतात. आजच प्रश्न विचारावयास पाहिजे असे नाही. नियम 93 हा विषय उपस्थित केला तर मी त्यांना संधी देईन. औचित्याचा मुद्दा देखील ते मांडू शकतात. श्री.रामहरी रूपनवर साहेब आपण वकील आहात. आपण दुसऱ्या प्रश्नाचा वेळ घेऊ नका. मी सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांना थांबविले आहे आणि आपल्याला देखील थांबवितो. आता आपण खाली बसावे. ..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात (जि.औरंगाबाद) येथील***
***बारकोड उत्तरपत्रिका छपाई व्यवहाराच्या चौकशीबाबत***

**(६)** * ***११८०१ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडत, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, डॉ.अपूर्व हिरे :*** *तारांकित प्रश्न क्रमांक १०२४५ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील बारकोड उत्तरपत्रिका संदर्भात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या त्रिसदस्य समितीने त्यांचा अहवाल दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी कुलगुरु आणि मा. राज्यपाल यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, चौकशी समितीचा अहवाल आणि निष्कर्ष व शिफारशी यानुसार गैरव्यवहारातील दोषीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,*

*(३) उक्त प्रकरणात विद्यापीठाचे झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात आली असल्यास त्याच्या वसुलीसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,*

*(४) गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्याविरुध्द शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,*

*(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

***श्री.रवींद्र वायकर, श्री. विनोद तावडे यांच्याकरिता :*** *(१)१ होय.य सदरहू अहवाल कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांचेकडे` दि. ०१ सप्टेंबर, २०१५ रोजी सादर केला आहे.*

***(२), (३), (४) व (५)*** *सदरहू अहवालावरर दि. २८/११/२०१५ रोजी झालेल्या विद्यापीठ अधिसभेच्या बैठकीमध्ये विस्तृत चर्चा करण्यात आली असून या अहवालात बारकोड उत्तरपत्रिका प्रायोगिक पध्दतीवर खरेदी करताना कोणत्याही प्रकारचा आर्थिक अपहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आलेला नसल्यामुळे कोणावरही कार्यवाही करण्यात आलेली नाही.*

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, यात माननीय मंत्र्यांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.रवींद्र वायकर : नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..6

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरात दुरूस्ती करावयाची नाही असे सांगितले आहे. लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "कोणत्याही प्रकारचा आर्थिक अपहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आलेला नसल्यामुळे कोणावरही कार्यवाही करण्यात आलेली नाही". सिनेटने हा निष्कर्ष कशाच्या आधारे काढला आहे ? चौकशी अहवाल माझ्याकडे आहे. त्यात स्पष्टपणे कुलगुरू व अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आलेला आहे. हा अहवाल मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना देतो. 25 लाख रूपयाच्या उत्तर पत्रिका 75 लाख रूपयात छापण्यात आलेल्या आहेत.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेवून प्रश्न विचारावा.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, ज्या प्रेस मध्ये या उत्तर पत्रिका छापल्या त्या प्रेसचे नाव माहीत नाही. तो बॉंड पेपेर गुजरातचा आहे. ती प्रेस औरंगाबादची आहे. त्यावर व्हॅट नंबर नाही. त्यांनी सिक्युरिटी डिपॉझिट भरलेले नाही. त्याला अग्रीम ॲडव्हान्स दिलेला आहे. एवढे सगळे केल्यामुळे आपण चौकशी समिती नेमली. या समितीने त्यांच्यावर ठपका ठेवला आहे आणि उत्तरामध्ये आपण स्पष्टपणे म्हणता की, कोणत्याही प्रकारचा आर्थिक अपहार झाल्याचा ठपका ठेवण्यात आलेला नाही.

G-1........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :12472.....

श्री.सतीश चव्हाण .......

सन्माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांनी नवीन विद्यापीठ कायद्याची घोषणा केलेली आहे. आपली केवळ विद्यापीठावर चर्चा सुरु आहे परंतु प्रत्यक्षात तुमच्या हातामध्ये काहीच अधिकार नाहीत. मागील सहा महिन्यापासून या विषयाच्या संदर्भात वर्तमानपत्रात भ्रष्टाचाराच्या बातम्या छापून येत आहेत. या ठिकाणी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. शिक्षण खात्याचे वरिष्ठ अधिकारी सिनेटमध्ये आहेत असे असताना त्यांनी आपल्याला माहिती दिली नाही काय ? या ठिकाणी प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे आपण संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार की, नेहमी प्रमाणे आपण राज्यपाल महोदयांकडे बोट दाखवणार आहात ?

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, खरे म्हणजे टेंडर करुनच सर्व प्रक्रिया व्हावयास पाहिजे होती. दर पत्रिकेच्या माध्यमातून बारकोडच्या उत्तर पत्रिका घेण्यात आल्या होत्या. या विषयाच्या अनुषंगाने श्री. सर्जेराब ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली त्रीसदस्य समिती नेमण्यात आली होती. या विषयाच्या संदर्भात श्री. ठोंबरे यांनी असे म्हटले आहे की, उत्तर पत्रिका प्रायोगिक पध्दतीने खरेदी करताना कोणताही आर्थिक अपहार झालेला नाही. परंतु त्यांनी टेंडर प्रोसेस करावयास पाहिजे होती ती केली नाही ही वस्तुस्थिती आहे.

**सभापती :** खरे म्हणजे प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. परंतु विरोधी पक्ष नेते उभे असल्यामुळे त्यांना मी प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मला महत्वाचे दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. विद्यापीठाच्या मालकीची स्वतःची प्रेस असताना, प्रिंटींग टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम विद्यापीठातच असताना विद्यापीठात उत्तर पत्रिकेची तपासणी का करण्यात आली नाही, ज्या अहवालात कुलगुरुंनाच दोषी ठरविण्यात आलेले असतांना त्यांनीच चौकशी कशी केली, त्यांनीच दोषी कसे काय ठरवले ? असे असताना कुलगुरुच म्हणत आहेत की, हा अहवाल पाळावयची गरज नाही. त्यामुळे हे सरकार कुलगुरुंना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :12472.....

श्री.रविंद्र वायकर : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, कुलगुरुंच्या माध्यमातून त्रीपक्षीय सदस्य समितीची नेमणूक करण्यात आली,अहवाल आला. खरे म्हणजे असे होऊ नये म्हणून राज्यपाल महोदयांच्या माध्यमातून त्यांना समज देण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सदस्य उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न प्रश्न विचारला, त्यामध्ये जे समिती सदस्य आहेत ते कोण आहेत, कोणाचे आहेत, कसे आहेत याची सर्व माहिती सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण साहेबांना आहे. (अडथळा) या अहवालात आर्थिक अपहाराचा ठपका ठेवण्यात आलेला नाही अशी स्पेसिफिक माहिती देण्यात आलेली आहे. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर यामध्ये मलाफाईड मिस्टेक झालेली नसून बोनाफाईड मिस्टेक झालेली आहे. मलाफाईड म्हणजे पैसे लाटण्याचा उद्देश ठेवून केलेला अपहार व बोनाफाईड म्हणजे (अडथळा)

**सभापती :** मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण न होताच त्यांच्या उत्तराला हरकत घेणे बरोबर नाही. या विषयाच्या संदर्भात मी शेवटी निर्णय देणार आहे. मी आपल्याला प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी चौकशीचा अहवाल वाचला असून या विषयाच्या संदर्भात चौकशी अहवालाचे सदस्य,चेअरमन यांच्याशी मी स्वतः बोललो आहे. श्री. सर्जेराव ठोंबरे हे अध्यक्ष असून त्यांचे आणि सन्माननीय सदस्यांचे नाते काय आहे याची सर्वांना कल्पना आहे. या विषयाची मी सविस्तर माहिती घेतली आहे. ती व्यक्ती निषपक्ष चौकशी करेल याची माहिती सन्माननीय सदस्य श्री. सतिश चव्हाण यांना असून अशा व्यक्तींकडून या विषयाची चौकशी करण्यात आलेली आहे. अशा व्यक्तींने या विषयाची चौकशी केलेली असून त्यांसदर्भात मी संपूर्ण माहिती घेतलेली आहे. या प्रकरणामध्ये स्वाभाविकपणे जी प्रोसेस पाळावयास पाहिजे होती ती पाळली गेली नाही ही वस्तुस्थिती असून या संदर्भात समितीने देखील उल्लेख केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सगळया प्रकरणाची मी माहिती घेतलेली आहे. या विषयामध्ये आर्थिक घोटाळा झालेला नाही. परंतु आर्थिक घोटाळा नाही याची पारदर्शकता दिसली पाहिजे परंतु ती त्यांनी पुढच्या सर्व प्रक्रियेमध्ये पाळलेली आहे. हे काम त्यावेळी घाईने करावयाचे होते त्यामुळे त्यांनी

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :12472.....

श्री.विनोद तावडे....

काही निर्णय घाईने घेतले होते त्यामुळे ही मिस्टेक बोनाफाईड मिस्टेक आहे असे मी म्हणालो होतो. पैसे खावयाचे म्हणून जाणीवपूर्वक मिस्टेक केलेली नाही. या विषयाच्या संदर्भात काही जरी असले तरी यासंदर्भात राज्यमंत्र्यांनी सांगितल्यानुसार यासंदर्भातील समज, सूचना राज्यपाल महोदयांमार्फत संबंधितांना देण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी अहवालाचा संदर्भ देऊन मलाफाईड आणि बोनाफाईडच्या संदर्भात माहिती दिलेली आहे. या अहवालाची एक ओळ मी आपल्याला वाचून दाखवितो. ही ओळ वाचून दाखविल्यानंतर मंत्री महोदयांनी त्याबाबतीत आर्थिक ठपका आहे की, नाही याचाही खुलासा या सभागृहाला करावा आणि जर ठपका असेल तर या ठिकाणी राज्य मंत्र्यांनी सांगितले आहे की, आम्ही राज्यपाल महोदयांना कुलगुरुंना समज देण्यास सांगू. आमचे एवढेच म्हणणे आहे की, या अहवालात बारकोडींग पध्दतीची अंमलबजावणी करताना परीक्षा नियंत्रक व माननीय कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा,1994 व विद्यापीठ लेखा संहिता 2012 यातील तरतुदीचे अनुपालन केले नाही याचा अर्थ काय आहे ? (अडथळा) टेंडर प्रोसेस केली नाही याचा अर्थ काय ? टेंडर प्रोसेस केली नाही याचा अर्थ मलाफाईड होतो की, बोनाफाईड होतो ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय अतिशय स्पष्ट आहे. त्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठामध्ये (अडथळा) परीक्षेच्या अगोदर अग्रवाल समितीनुसार बारकोडींग करावयाचे होते. परंतु टेंडरींग प्रोसिजरला वेळ लागेल असे वाटल्यामुळे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात अगोदर कोणी काम केले, सोलापू विद्यापीठात कोणी काम केले होते, तेथे कोण आले होते त्यासंदर्भात त्यांच्याकडून एक्सप्रेशन ऑफ इंन्ट्रेस्ट मागवून त्या प्रमाणे त्यांना काम देण्यात आले. त्यामुळे या सगळया विषयाची चौकशी, चौकशी समितीने केली असून या विषयाच्या संदर्भात मी स्वतः माननीय ठोंबरे साहेबांशी बोललो आहे.

**सभापती :** मंत्री महोदय, माझ्या एका शंकेचे उत्तर द्या की, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे नमूद केले होते की, ज्यांनी हे केले त्यांच्याकडेच चौकशीचे काम दिले गेले ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तसे झालेले नाही. सिनेटने चौकशी समिती नेमली होती. ही चौकशी कुलगुरुंनी नेमली नव्हती.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :12472.....

**सभापती :** या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. असे असतांना आपण म्हणत आहात की, ही बोनाफाईड मिस्टेक आहे. Whether it is malafide or bonafide, if mistake is there and procedure is not followed, त्यामुळे सचिवांच्या माध्यमातून उच्च स्तरीय समिती नेमून या विषयाची चौकशी करण्यात यावी. (अडथळा) हे जे काही चालले आहे त्याचा प्रिसिडंट पंडला, एखादा मॅटर एक्सपीडीश केला तर ते समजू शकतो. परंतु जर आर्थिक गैरव्यवहाराला सपोर्ट करणारी प्रोसिजर आणि एखाद्याला पाठीशी घातले जाणार असेल तर ते चुकीचे ठरेल. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात पुन्हा एकदा चौकशी करावी व जे प्रश्न विचारणारे सदस्य आहेत त्यांच्याशी चर्चा करुन यासंदर्भात अहवाल द्यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण ज्या सूचना केल्या त्यांचा भावार्थ लक्षात घेऊन विद्यापीठाची स्वायत्तता धोक्यात येऊ नये म्हणून सदस्यांच्या भावना माननीय कुलपती आणि राज्यपाल महोदयांना सांगून त्यांना याबाबतची फेर चौकशी करण्याची विनंती करण्यात येईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** लेखी उत्तरे

**मु.शी.:**तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार दिनांक 7 डिसेंबर, 2015 व मंगळवार दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती :** दिनांक 7 व 8 डिसेंबर, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेसः येथे सोबत जोडलेल्या याद्या जोडाव्यात.)

----

H-1/...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:** उपविधान समितीचा अहवाल सादर करणे

श्री.विनायक मेटे (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती :** उपविधान समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती :** माझ्याकडे दिनांक 14 डिसेंबर, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत, त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी "मौजे एकोडी व बाम्पेवाडा (ता.साकोली, जि.भंडारा) येथे एका माथेफिरुने 12 शेतकऱ्यांच्या धानाचे पुंजणे आणि तनशीचे ढीग जाळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, यांनी " गोरेगाव (मुंबई) येथील 42 एकर जागेवरील पत्रा चाळीचा पुनर्विकास करताना विकासकाने परस्पर जागा हडप करुन म्हाडाचे कोट्यवधी रुपयांचे केलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "मुंबईत विविध ठिकाणी मच्छीमारांना सागरी सुरक्षेच्या नावाखाली मच्छीमारी करण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.ख्वाजा बेग यांनी "आर्णी (जि.यवतमाळ) येथील महंत दत्తाराम भारती महाविद्यालयात बी.एस्सीच्या प्रथम वर्षाच्या जुन्या विद्यार्थ्यांना गणित विषयाच्या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका देण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "पैठण-औरंगाबाद या 50 कि.मी.रस्त्याचे चौपदरीकरण तातडीने करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत नवीन आरोग्य केंद्र उभारणीसाठी निधी उपलब्ध असुनही कार्यवाही न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी "महाराष्ट्र औद्योगिक धोरणांतर्गत राज्यातील सहकारी औद्योगिक वसाहतींना उद्योग विभागाच्या मूळ योजनेप्रमाणे 25:75 या आकृतीबंधात अर्थसहाय्य करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनजंय मुंडे व सतीश चव्हाण यांनी "मौजे पायगाव व खारगाव (जि.ठाणे) येथे मे.सनसिफ इन्व्हेस्टमेंट या घटकास इंडस्ट्रीयल इस्टेट स्थापन करण्यासाठी देण्यात आलेल्या जमिनीवर अवैधरित्या निवासी संकुलाचे करण्यात आलेले बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "मौजे भूगाव (जि.वर्धा) येथील उत्तम गल्वा मेटॅलिक कंपनीतील रासायनिक पाण्यामुळे विविध परिसरातील गावांमध्ये झालेले प्रदूषण, भूगाव अंगणवाडीत 24 बालके कुपोषित आढळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांतील पाणी जायकवाडी धरणात सोडल्यामुळे सदर जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्यात करण्यात आलेली कपात " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "लातूर येथील शासकीय गोदामातील माथाडी कामगारांना मे.साईबाबा हमाल औद्योगिक सहकारी संस्थेच्या कंत्राटदाराने गत 7 वर्षे कामाची मजुरी न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आज सकाळी आपल्या दालनात नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे...

**सभापती :** या संदर्भात मी मघाशी निर्णय घेतलेला आहे. आज आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना घेणार नाही असे आपले सकाळी ठरलेले आहे आणि तसे जाहीर झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचा देखील तसाच विषय आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी देखील औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. आपण आता हा विषय न घेता नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात करु या.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्रासाठी 107 हुतात्मे झाले ते मुंबईकरांचे थोतांड अशाप्रकारचे वक्तव्य करण्यात आलेले आहे. गेल्या आठवड्यात सभागृहामध्ये गोंधळ सुरु असताना देखील आम्ही हा विषय दोन-तीन वेळा मांडण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी देखील हा विषय मांडला होता. राज्याचे महाअधिवक्ता ॲड.श्रीहरी अणे हे सातत्याने विधाने करीत आहेत. काल देखील त्यांनी विधान केलेले आहे. त्यावर राज्य शासनाने तातडीने निवेदन केले पाहिजे. सभागृहाला काही किंमत राहिली नाही काय ? महाअधिवक्ता यांनी केलेले विधान हे 107 हुतात्म्यांचा अपमान आहे. ते हुतात्म्यांना थोतांड म्हणत आहेत, हे काय आहे ?

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी विषयाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडला होता. आपण सर्वोच्च पदी विराजमान आहात. आम्हा सर्व सदस्यांचे आणि महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष आपल्या निर्णयाकडे लागलेले आहे. सभागृहात केवळ भाषण करायचे आणि आम्ही त्यावर मुद्दा मांडला म्हणून समाधान मानायचे अशाप्रकारचा कोणताच विषय नसतो. हा संयुक्त महाराष्ट्राचा विषय आहे.गेल्या आठवड्यामध्ये तेवढे कामकाज झाले नाही तरीही आम्ही गोंधळामध्ये तो मुद्दा मांडला. आम्हाला आपल्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. कारण या सभागृहात अनेकवेळेला आपण संयुक्त महाराष्ट्रासाठी एकमताने ठराव केलेले आहेत. आज आम्ही सत्ताधारी पक्षात असलो तरी

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

काही प्रश्न हे संपूर्ण महाराष्ट्राचे असतात. महाअधिवक्ता ॲड.अणे यांची संयुक्त महाराष्ट्राबद्दल भूमिका मांडण्याची जबाबदारी आहे, त्याऐवजी ते स्वतंत्र विदर्भाची भूमिका मांडत आहेत. तेव्हा या संदर्भात सरकारकडून सुस्पष्ट मत यावे, अशी आमची अपेक्षा आहे. ॲड.श्रीहरी अणे यांना महाअधिवक्ता पदावरुन मुक्त केले पाहिजे. आपण असे का बोलता अशी सरकारने त्यांना विचारणा तरी केलेली आहे काय ? ते आपणास मुक्त परवाना आहे असे बोलत आहेत. त्यांना पाहिजे तशी भूमिका घेण्याचा कोणी अधिकार दिला असा प्रश्न निर्माण होत आहे.

सभापती महोदय, मी आपली अत्यंत ऋणी आहे. आज हुतात्म्यांबरोबर महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष आपल्या निर्णयाकडे लागलेले आहे. या संदर्भात सरकारने निवेदन करावे अशा पद्धतीचे संरक्षण आम्हाला द्यावे, अशी मी आपणाकडे विनंती करते.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्याचे महाअधिवक्ते ॲड.श्रीहरी अणे यांनी आपल्या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने भाषण करताना त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या 107 हुतात्म्यांचा अपमान केलाच, परंतु ते ज्या सांविधानिक पदावर आहेत ते पद अखंड महाराष्ट्राचे आहे. सबंध महाराष्ट्राच्या पदावर असताना राज्याला कायदेशीर सल्ला देण्याचे त्यांचे काम आहे. आपल्या राज्याची बाजू ते उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात मांडत असतात. राज्याच्या महाअधिवक्ता पदावर असताना आपल्या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी त्यांचे मत राज्य विभाजनाच्या बाजूला असेल तर त्यांना महाअधिवक्ता पदावर राहण्याचा अधिकार आहे काय ? उद्या अशा प्रसंगावर कायदेशीर सल्ला वेगळ्या विदर्भाच्या बाजूने गेला तर हे सरकार काय करणार आहे, हे देखील सभागृहाला समजले पाहिजे. ती स्पष्टता सरकार देणार आहे काय ? सरकार त्यांना महाअधिवक्ता पदावरुन कमी करणार आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. सबंध महाराष्ट्र त्यांच्या अधिवक्त्याखाली व्यवस्थित राहू शकत नसेल, त्यांचे अखंड महाराष्ट्राबद्दल चांगले मत नसेल तर त्याबाबत सरकारने आपली भूमिका आजच स्पष्ट करावी. तसेच सरकारने त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे.

..7..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** आपल्या तिघांपैकी कोण बोलणार आहेत ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपणास मी बोलण्यास परवानगी देत आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या विषया संदर्भातील विषय आमच्या पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी मांडला होता. तेव्हा आपण त्यांना बोलण्याची संधी द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

प्रा.जर्नादन चांदूरकर : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नावर महाअधिवक्ता यांनी राजीनामा देण्याची गरज नाही. या विधानपरिषदेमध्ये भारतीय घटनेच्या तरतुदीनुसार मी महाधिवक्ता यांच्या विरुद्ध इम्पिचमेंटचा ठराव मांडत आहे. हा इम्पिचमेंटचा ठराव मी ओरली मांडत आहे, तो आपण दाखल करुन घ्यावा. हा ठराव मी आपणास नंतर लेखी स्वरुपात देतो.

**सभापती :** इतका महत्वाचा ठराव ओरली मांडता येईल किंवा कसे अशी माझ्या मनात शंका आहे. आपणास रितसर पद्धतीप्रमाणे जो काही ठराव मांडावयाचा आहे तो आपण मांडावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी, नियम 289 अन्वये हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी मी काही धोरणात्मक मुद्दे उपस्थित केले होते. राज्याचे महाअधिवक्ता जे सरकारचे ऑफिशिअल स्पोकपर्सन असतात त्यांनी पर्सनल व्हयू मांडले असे आमच्या ऐकण्यात नाही. या संदर्भात सरकारची काय भूमिका आहे हे स्पष्ट करण्यासाठी आम्ही आपल्या माध्यमातून सभागृहात विनंती केली होती. पण त्या संदर्भात सरकारने काहीही खुलासा केलेला नाही. त्यामुळे आमच्या मनात शंका आणि संभ्रम निर्माण झालेला आहे की, त्यांनी जे वक्तव्य केलेले आहे ते माननीय मुख्यमंत्री किंवा सरकारचे मत आहे काय, त्याबाबत खुलासा का होत नाही ? हा प्रकार झाल्यानंतर मिसरिपोर्टींग झाले असेही ते बोलले नाहीत किंवा त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली, असाही प्रकार झालेला नाही. त्यांनी असे वक्तव्य केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावर पांघरूण घालणारे मोघम उत्तर दिल्यावर पुन्हा महाअधिवक्ता असे म्हणाले की, मी माझ्या वक्तव्यावर ठाम आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

पुन्हा ते नंतर हेच बोलले. सभापती महोदय, हे पुन्हा पुन्हा घडत आहे. हा ठरलेला अजेंडा आहे, असे आम्हाला वाटते. परंतु प्रश्न असा आहे की, ॲडव्होकेट जनरल साहेबांनी असे म्हटले की, माझे पद सांविधानिक असल्यामुळे आणि मला माननीय राज्यपालांनी नेमल्यामुळे सरकार माझ्यावर कारवाई करु शकत नाही. वास्तविक पाहता माननीय राज्यपाल हे मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार ॲडव्होकेट जनरल यांची नेमणूक करतात. मला आश्चर्य याचे वाटते की, ॲडव्होकेट जनरल वारंवार सांगत आहेत की, त्यांचे पद सांविधानिक आहे. परंतु ते जेव्हा अखंड महाराष्ट्राच्या विरोधात भूमिका घेतात तेव्हा ती बाब असांविधानिक नाही काय, असा प्रश्न निर्माण होतो. माझी विनंती आहे की, जोपर्यंत सरकारच्या वतीने माननीय मुख्यमंत्री किंवा सभागृहाचे नेते सभागृहात येऊन या विषयी खुलासा करीत नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवावे. या विषयी सरकारची नेमकी भूमिका काय आहे हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

**सभापती** : मुळात हा विषय अत्यंत संवेदनशील होऊन बसला आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पहिल्या दिवशीच या विषयी औचित्याचा मुद्दा दिला होता. परंतु सभागृहात गोंधळ झाल्यामुळे त्यांना तो मांडता आला नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, मी आपल्या पक्षाच्या गट नेत्यांना अगोदरच विचारले होते की, या विषयावर काँग्रेस पक्षाकडून कोण भूमिका मांडणार आहे. त्यावेळी गट नेत्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे भूमिका मांडतील. त्यानुसार मी त्यांना संधी दिली. ठीक आहे. एक विशेष बाब म्हणून मी आपल्याला संधी देतो. आपण लवकरात लवकर आपले म्हणणे मांडावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नागपूर येथील हिवाळी अधिवेशन सुरु होण्यापूर्वीच हा विषय उपस्थित झाला. जो पक्ष सत्तेमध्ये बसलेला आहे त्या पक्षाच्या वतीने सुध्दा असे घोषित करण्यात आले होते की, आमच्या पक्षाचे राज्य आल्यानंतर वेगळा विदर्भ करण्यात येईल. त्यांच्या पक्षाचे राज्य आल्यानंतर त्यांच्याकडून राज्याच्या महाधिवक्त्यांची नेमणूक करण्यात आली. वास्तविक पाहता राज्याचे महाधिवक्ता यांना शासनाचे जे काही धोरण असेल त्या बाबत

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

न्यायालयात किंवा न्यायालयाच्या बाहेर तेवढ्या विषयापुरतेच बोलता येते. त्यांना विषयाच्या बाहेर जाऊन बोलण्याचा अधिकार नसतो. महोदय, शासनाच्या वतीने वेगळा विदर्भ करण्याच्या अनुषंगाने जी पावले उचलली जात आहेत त्या बाबत खुलासा होणे गरजेचे आहे. ॲडव्होकेट जनरल ॲड.श्रीहरी अणे साहेबांचे वडील बापूजी अणे हे पहिल्यापासून वेगळ्या विदर्भाची मागणी करीत आहेत. परंतु तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु आता राज्याच्या महाधिवक्त्यांकडून शासनाची भूमिका म्हणून विधान केले जाते. वेगळा विदर्भ झाला पहिजे, ही पक्षाची भूमिका आहे, आमची भूमिका आहे. आम्ही असे समजतो की, ॲडव्होकेट जनरल यांनी जे वक्तव्य केले आहे तीच शासनाची सुध्दा भूमिका आहे. या भूमिकेतून ॲडव्होकेट जनरल यांनी भाष्य केले असेल तर त्यामध्ये त्यांची काही चूक आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे या विषयी माननीय मुख्यमंत्री किंवा भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाकडून स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. भारतीय जनता पक्षाच्या मुख्यमंत्र्यांचे हे मंत्रिमंडळ आहे. भाजपा आणि शिवसेना पक्षाचे युती सरकार असले तरी मुख्यमंत्री मात्र भारतीय जनता पक्षाचे आहेत. शिवाय भारतीय जनता पक्षाने निवडणुकीपूर्वी विदर्भातील जनतेला स्वतंत्र विदर्भ राज्य करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाकडून भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. माझी मागणी आहे की, शासनाने या विषयी अस्थिर वातावरण ठेवता कामा नये. भाजपा आणि शिवसेना हे दोन्ही पक्ष सत्तेत असले तरी दोन्ही पक्ष या विषयाच्या बाबतीत वेगवेगळी भूमिका मांडत आहेत. या दोन्ही पक्षांना सत्ता उपभोगायची आहे आणि लोकांना दाखवायचे आहे की, वेगळ्या विदर्भाच्या प्रश्नावर आम्ही भांडत आहोत. त्यामुळे आता ही नाटके बंद केली पाहिजेत. भाजपाने विदर्भातील जनतेला जे आश्वासन दिलेले आहे, त्या विषयी सरकारची काय भूमिका आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. महोदय, यामध्ये ॲडव्होकेट जनरल ॲड.श्रीहरी अणे यांची काय चूक आहे ? ते राज्याचे ॲडव्होकेट जनरल आहेत. त्यांना सरकारने नेमलेले आहे. सरकारची तशी भूमिका असेल आणि ॲडव्होकेट जनरल यांनी ती मांडली असेल तर त्यामध्ये त्यांनी चुकीचे काय केले ? त्यामुळे आता या विषयी राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. विदर्भातील जनतेला असे वाऱ्यावर सोडून चालणार नाही. कोणी सांगत आहे की, वेगळे विदर्भ राज्य देणार आणि कोणी सांगत आहे की, वेगळे विदर्भ राज्य द्यावयाचे नाही. अशा प्रकारची सरकारमध्ये अस्पष्ट भूमिका असताना, राज्य सरकार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

चालविणे म्हणजे विदर्भातील जनतेची प्रतारणा आहे. त्यामुळे या संदर्भात जोपर्यंत शासनाची भूमिका स्पष्ट होत नाही तोपर्यंत हे सभागृह सुरु ठेवता कामा नये. माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात बोलवून त्यांच्याकडून स्पष्टीकरण घेतले पाहिजे.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय,...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण अशा प्रकारे प्रत्येक वेळी मध्येच बोलणे योग्य नाही. मला वाटते आता आपण थांबलेले बरे. या विषयाच्या अनुषंगाने नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना मांडल्या. सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. तसेच सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर यांनी तांत्रिक मुद्दा सुध्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, या विषयी मी तोंडी स्वरुपात इम्पिचमेंट मोशन मांडतो. त्यामुळे हा ठराव तोंडी स्वरुपात स्वीकारता येईल की नाही हे मल तपासून घ्यावे लागेल. मला वाटते सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर यांनी सुध्दा ते तपासून बघावे. आपण एकमताने ठरविले आहे की, आज नियम 260 अन्वये दुष्काळाच्या विषयावर चर्चा करावी. त्यामुळे या चर्चेमध्ये कोणीही अडथळा आणू नये असे माझे मत आहे, निर्णय आहे. मी असे निदेश देत आहे की, शिवसेना पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष किंवा अन्य पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी उक्त विषयाच्या अनुषंगाने आज उपस्थित केलेल्या तीव्र भावना लक्षात घेऊन शक्य झाल्यास माननीय मुख्यमंत्री किंवा सभागृहाच्या नेत्यांनी उद्या सकाळपर्यंत सरकारचे मत मांडावे.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोद,....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण पुढे गेलेलो आहोत. आपण तालिकेवर केलेले काम मी बघितलेले आहे. त्यामुळे आपण अशा प्रकारे मध्येच बोलणे हे आपल्याला शोभणारे नाही.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दि.11 डिसेंबर, 2015 रोजीच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.11157 ला दिलेल्या लेखी उत्तराच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्यावर माननीय सभापतींचा निर्णय**

**सभापती** : शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर, 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अनुक्रमांक 1 वरील प्रश्न क्रमांक 11157 ला दिलेल्या उत्तरात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना रू1.00 एवढे सानुग्रह अनुदान देण्यात येते, असे छापून आले होते. सदरची बाब गंभीर असून जबाबदारी निश्चित करावी, असा हरकतीचा मुद्दा श्री.शरद रणपिसे, वि.प.स. व माननीय परिवहन मंत्री, श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केला होता.

याबाबत माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सभागृहात असे सांगितले होते की, "लेखी उत्तरात रू1.00 असे जे छापून आले आहे, ती प्रिंटिंग मिस्टेक आहे. यामध्ये सुधारणा करावयाची आहे. असे मी आपल्याकडे यापूर्वीच पत्र दिलेले आहे आणि या संदर्भात चौकशी करावी, अशी विनंतीही केलेली आहे. परंतु, ही जी प्रिंटिंग मिस्टेक आहे ती विधान भवनाच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये झालेली आहे. माझी विनंती आहे की, ज्यांनी ही चूक केलेली आहे, या संदर्भात चौकशी करुन कारवाई करावी.

सदर प्रकरणी मी योग्य ती तपासणी करुन सोमवारपर्यंत चौकशीचा अहवाल सभागृहासमोर मांडतो, असे निदेश दिले होते.

शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर 2015 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांचा प्रश्न क्रमांक 11157 अनुक्रमांक 1 वरील प्रश्नाचे उत्तर विभागाकडून दिनांक 7 डिसेंबर, 2015 रोजी सायंकाळी 5.35 वाजता विधानमंडळ सचिवालयास प्राप्त झाले. विभागाकडून प्राप्त झालेले उत्तर जसेच्या तसे महाराष्ट्र विधानमंडळाच्या संगणक यंत्रणेवर शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर, 2015 रोजीच्या प्रश्नोत्तरांच्या यादीमध्ये समाविष्ट करुन या कार्यालयाकडून प्रश्नोत्तराची यादी बुधवार, दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजी शासकीय मुद्रणालय, नागपूर येथे् छपाईसाठी पाठविण्यात आली होती. सदर प्रश्नोत्तराची यादी शासकीय मुद्रणालयाकडून छपाई होऊन या कार्यालयात गुरुवार, दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी प्राप्त

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

झाली व शुक्रवार, दिनांक 11 डिसेंबर, 2015 रोजी विधानपरिषदेतील माननीय सदस्यांना टपाल खणाद्वारे वितरीत करण्यात आली होती.

वरील खुलाशावरुन उक्त प्रश्नाबाबतची वस्तुस्थिती लक्षात घेता या सचिवालयाकडून कोणतीही प्रिंटिंग चूक झालेली दिसून येत नाही. विभागाने पाठविलेल्या उत्तरात केवळ व्याकरणीय चूक सचिवालयाद्वारे दुरुस्त केली जाते. त्यातील आकड्यात कोणताही बदल केला जात नाही.

सदरची माहिती ही विभागाकडून आलेली असल्यामुळे यावर मंत्री महोदयांनी कार्यवाही करुन त्याबाबत मला चौकशी अहवाल पाठवावा. यात विधानमंडळ सचिवालयाकडून कोणतीही चूक झालेली नाही.

....जे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपला निर्णय मान्य आहे. आपल्या कार्यालयाची, विधिमंडळाच्या सचिवांची व कोणत्याही कर्मचाऱ्याची चूक नसताना उत्तर देताना आम्हाला शासनाकडून सांगण्यात आले की, विधिमंडळामध्ये ही चूक झालेली आहे. प्रिंटिंग मिस्टेक झाली आहे. ही गंभीर बाब आहे. शासनाकडून उत्तर विधिमंडळाला आले. आम्ही 45 दिवस ....

**सभापती** : आपण तपासून घेऊ.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी बरोबर बोलत आहे. अधिकाऱ्याने या प्रश्नाचे उत्तर दिले. कर्मचाऱ्याने, डेस्क ऑफिसरने फक्त 1 रूपया आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत दिली जाईल हे मांडले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची ही थट्टा केलेली आहे. हा गंभीर विषय आहे. संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, विधिमंडळाच्या कार्यालयाचा या उत्तराशी काही संबंध नाही हे बरोबर आहे. पण जे उत्तर तयार होते ते अधिकाऱ्यांच्या मार्फत होते, माननीय राज्यमंत्री, माननीय मंत्री हे त्याला सभागृहात जबाबदार असतात, अधिकारी नसतात. कोणत्या माननीय मंत्र्यानी त्या 1 रूपये मदतीच्या कागदपत्रांवर सही केली याबद्दल सरकारने माहिती द्यावी आणि जर माननीय मंत्र्यांनी सुध्दा हे चुकून केले असेल तर त्यांनी जाहीर माफी मागावी.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुरू होण्याच्या अगोदर हे लक्षात आले आणि त्यानंतर आपल्याला पत्रही देण्यात आले आहे. प्रश्नोत्तराच्या अगोदर माननीय सभापतींना पत्र देण्यात आले होते की, अशी प्रिंटिंग मिस्टेक आहे. ती प्रिंटिंग कुठे झाली याचा तपास आम्ही करू असे माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून सभागृह सुरू होण्याच्या आत त्यांना लेखी कळविण्यात आले होते. चूक नेमकी कोणाची आहे हे तपासून त्यावर कार्यवाही करू असे शासनाच्या माध्यमातून सभागृहात सांगण्यात आले. प्रिंटिंग मिस्टेक आहे. त्यामुळे एवढे झाले पाहिजे, तेवढे झाले पाहिजे हे बोलणे ठीक नाही. ही प्रिंटिंग मिस्टेक प्रभा राव मॅडमनी दिल्याप्रमाणे नाही. झोपडपट्ट्यांविषयी सन 1995 ऐवजी सन 2005 हे प्रिंटिंग मिस्टेकने छापले गेले, तसा हा विषय नाही. प्रिंटिंग मिस्टेक आहे. त्यामुळे हा प्रश्न येथे संपला आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर बसून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : आपण सकाळी निर्णय घेतला आहे.

श्री. गिरीश बापट : सभापती महोदय, 2 प्रस्ताव आले आणि आपण ते एकत्र केले. सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव मंगळवारी येतो आणि प्राधान्याने तो आला. नियम 289 अन्वये विरोधी पक्षाने त्याच विषयावर प्रस्ताव दिला, तो त्यामध्ये क्लब केला. पहिल्यांदा सभागृहात सत्तारूढ पक्षाचा प्रस्ताव नियम 260 अन्वये आलेला आहे. माझी विनंती आहे की, शासनातर्फे या चर्चेची सुरुवात व्हावी. आम्ही सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांचे नाव दिले आहे. तुमच्याकडे क्रम आलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनीही त्यांचे मत मांडावे, आमची त्याला काही हरकत नाही. सत्ताधारी पक्षाकडून जेव्हा प्रस्ताव येतो तेव्हा पहिल्यांदा बोलण्याचा अधिकार सत्तारूढ पक्षाचा असतो. माननीय मंत्री त्यावर उत्तर देतील.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांचे म्हणणे चुकीचे आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. गिरीश बापट यांनी सभागृहात विषय मांडताना असे सांगितले की, आजचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव मंगळवारी सत्ताधारी पक्षाने दिला होता. शोक प्रस्ताव 7 तारखेला झाला. 8 तारखेला नियम 289 अन्वये विरोधी पक्षाच्या वतीने सर्व कामकाज स्थगित करून हा विषय चर्चेला घेण्याच्या संबंधी प्रस्ताव दिला होता. आपण नियम 289 चा प्रस्ताव स्वीकारला आहे. सदर चर्चा कोणत्या माध्यमातून होईल त्याचा निर्णय आपण देणार होता, त्याप्रमाणे आजच्या कामकाजपत्रिकेत 260 अन्वये ही चर्चा विरोधी पक्षाने दिली. विरोधी पक्ष नेता म्हणून माझे नाव आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे नाव आहे. तसेच विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे नाव आहे. तसेच या प्रस्तावानंतर सत्ताधारी पक्षाचा सुध्दा नियम 260 अन्वयेचा याच विषयावरील प्रस्ताव आलेला आहे. सत्ताधारी पक्षाने अगोदर बोलण्याच्या अगोदर कर्जमाफीच देऊन टाकावी, आमचे काहीच म्हणणे नाही, मग आम्ही बोलू ना, तुम्ही बोलावे. (अडथळा) कर्जमाफी करणार असतील, राज्यातील शेतकऱ्यांचा सरसकट 7/12 कोरा करणार असतील तर काही अडचण नाही. चर्चेच्या अगोदर सरसकट 7/12 कोरा करणार असतील तर ठीक आहे. शिवसेनेची कर्जमुक्तीची मागणी आहे.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सभागृहात वारंवार सांगितले जात आहे की, निर्णय घ्या. सरकारचे जे निर्णय आहेत ते आता सांगायला तयार आहे. त्यामुळे निर्णय घेतले तर चर्चेची गरज भासणार नाही. (अडथळा) निर्णय घोषित करू द्या, मग चर्चेची गरज भासणार नाही. मी गेली 3 दिवस हेच सांगत आहे की, आम्हाला बोलू द्यावे. आमचे जे काही निर्णय असतील ते सांगू द्यावेत, मग चर्चा करण्याची आवश्यकता भासणार नाही.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. गिरीश बापट साहेबांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, मंगळवारचा प्रस्ताव सत्तारूढ पक्षाचा असतो आणि गुरुवारचा प्रस्ताव विरोधी पक्षाचा असतो. सभापती महोदय, त्या दिवशी ते प्रस्ताव चर्चेला आले नाहीत तर ते प्रस्ताव परत घेतले जात नाहीत. तो विषय घेतला जाईल, पण त्यावेळचा तो प्रस्ताव लॅप्स होतो. आज विरोधी पक्षाकडून आलेला नियम 289 चा प्रस्ताव नियम 260 अन्वये मध्ये कन्व्हर्ट केला आहे, त्याच प्रस्तावावर चर्चा सुरू झाली पाहिजे. आमची मागणी आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रस्ताव दिला आहे. शासन कर्जमाफीची घोषणा करत असेल तर आम्ही येथे एक शब्द सुध्दा, चकार बोलणार नाही. आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी करीत आहोत असे सदनाचे नेते श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी जाहीर करावे. आम्ही चर्चा थांबवितो. फक्त तुम्ही हेच म्हणणार की, आम्ही निर्णय घेऊ. तुम्ही थातुरमातुर काही तरी करणार. आम्ही 4-5 दिवसांपासून सांगत आहोत. आज बैठकीत सांगितले. कदाचित माननीय नेते श्री. एकनाथराव खडसे साहेबांना माहीत नसावे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर या गोष्टी झाल्या आहेत, त्यांनी कबूल केले आहे की, तुम्ही म्हणत आहात, ते आम्ही मान्य करीत आहोत. तुम्ही चर्चा करा. आम्ही त्याला तयार झालो आहोत आणि त्या दृष्टीने सदनात चर्चा करण्याकरिताही आम्ही तयार आहोत. परंतु जर घोषणा करायची असेल तर कर्जमाफीची करावी एवढे बोलण्याकरिता मी उभा होतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाजपत्रिकेवर 2 प्रस्ताव दाखविले आहेत. पहिला प्रस्ताव सत्ताधारी पक्षाचा आहे आणि दुसरा प्रस्ताव विरोधी पक्षाचा आहे. आमचा मंगळवारचा प्रस्ताव होता. मंगळवारचा प्रस्ताव पुढे ढकलत आजपर्यंत आला आहे. सभागृहाचे संकेत, प्रथा अशी होती की, ज्यावेळी दोन्ही पक्षांकडून सारख्या विषयाचे प्रस्ताव दिले जातात

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

त्यावेळी ते प्रस्ताव क्लब केले जातात, असे दोन प्रस्ताव कामकाजपत्रिकेवर न येता, एक प्रस्ताव येऊन दोन्ही बाजूंकडील नावे त्यामध्ये टाकली जातात. पण आज दोन्ही प्रस्ताव छापले आहेत. चित्र कसे राहणार आहे ? दोन्ही प्रस्ताव मांडले जातील की, सत्ताधारी पक्षाचा झाल्यानंतर विरोधी पक्षाचा प्रस्ताव मांडला जाईल की विरोधी पक्षाचा झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव मांडला जाईल, हे स्पष्ट झाले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विचारले की, एकदा सत्ताधाऱ्यांनी प्रस्ताव मांडायचा आणि त्याच विषयावर विरोधी पक्षाने प्रस्ताव मांडायचा का ? मी या संदर्भातील स्वत: बऱ्याच वेळा साक्षीदार आहे. मी या बाबतीत एक निर्णयच करण्याचे ठरविले आहे आणि तोच निर्णय मी वाचून दाखवित आहे.

दिनांक 08 डिसेंबर, 2015 रोजी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे तसेच माननीय नेते श्री. माणिकराव ठाकरे व इतर सन्माननीय सदस्य यांनी या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिला होता. त्याचप्रमाणे याच दिवशी सत्ताधारी पक्षाकडून आलेला म.वि.प. नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव सुध्दा कार्यक्रमपत्रिकेत समाविष्ट करण्यात आला होता. तसेच दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी विरोधी पक्षाचा सारख्याच विषयाचा प्रस्ताव कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेला होता.

यावर मी दिनांक 08 डिसेंबर, 2015 रोजी असा निर्णय दिला होता की, दोन्ही विषय सारखेच असल्याने हा विषय एकत्रित करून केव्हा चर्चेला घ्यायचा याबाबतचा निर्णय मी सर्वांशी चर्चा करून नंतर घेईन. त्यानंतर दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी विरोधी पक्षाकडून सुध्दा या विषयावर म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव प्राप्त झाला. मी सत्ताधारी पक्षाचा प्रलंबित प्रस्ताव व विरोधी पक्षाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव असे दोन्ही प्रस्ताव त्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविले होते. तथापि या विषयावर चर्चा होऊ शकली नाही.

....K

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती..........

आज दिनांक 14 डिसेंबर, 2015 रोजी ज्याप्रमाणे मी दिनांक 10 डिसेंबर, 2015 रोजी जसे दोन्ही प्रस्ताव कामकाज पत्रिकेत दाखविले होते त्याच क्रमाने आज जरी प्रस्तावाचा दिवस नसला तरी त्याचप्रमाणे मी दोन्ही प्रस्ताव कार्यक्रम पत्रिकेत दाखविले आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण पहिल्या दिवशी मंगळवारी सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव दाखविला होता. तो दिवस निघून गेला आहे. दुसऱ्या दिवशी.........

**सभापती :** आपण जे बोलत आहात, त्याबाबतच मी निर्णय देत आहे. आपण माझे जरा ऐकून घ्यावे.

यापूर्वी सुध्दा सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षाकडून एकाच विषयावर सारखेच प्रस्ताव आल्याची पूर्वोदाहरणे सुध्दा मी तपासून पाहिली. तसेच विरोधी पक्षाकडून सुध्दा दोन्ही गटांनी एकाच विषयावर दोन प्रस्ताव दिल्याची पूर्वोदाहरणे तपासून पाहिली.

या अधिवेशनात दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजीपासून सतत विरोधी पक्षाकडून राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात भीषण दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर म.वि.प.नियम 289 अन्वये नियम स्थगित करुन चर्चा घेण्यासंदर्भात सतत मागणी होत आहे. त्याचप्रमाणे सत्ताधारी पक्षाकडून सुध्दा हा विषय चर्चेला घेण्याचा आग्रह दिसून आला व त्यांनी म.वि.प.नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव सुध्दा दिलेला आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता विषय राज्याच्या दृष्टिने अत्यंत गंभीर असून यावर चर्चा होऊन सभागृहात शासनाची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे असे मला वाटते. मी जरी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव क्रमाने कार्यक्रम पत्रिकेत दाखविला असला तरी या दोन्ही प्रस्तावावर एकदा चर्चा सुरु करावी व माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या चर्चेला सुरुवात करावी, असा मी निर्णय देत आहे.

------------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती

**मु.शी.:** "राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात पडलेला भीषण दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट आणि तीव्र टंचाई यामुळे निर्माण झालेली परिस्थिती" या विषयावर ***सर्वश्री.धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, जयंत प्र.पाटील, शरद रणपिसे, सतिश चव्हाण, संजय दत्त, संदीप बाजोरिया, विक्रम काळे, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, प्रा.जोगेंद्र कवाडे, राजेंद्र मुळक, अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, अब्दुल्ला खान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स.*** यांचा प्रस्ताव

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

*"राज्यातील मराठवाडा, विदर्भासह विविध भागात भीषण दुष्काळ आणि तीव्र टंचाई निर्माण होणे, दुष्काळ व टंचाई निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही उपाययोजना करण्यात न येणे, नापिकी आणि कर्जबाजारीला कंटाळून गेल्या वर्षभरात ३१०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, माहे जानेवारी, २०१५ पासून शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात प्रचंड वाढ होणे, आत्महत्या थांबविण्यास सरकारला अपयश येणे, दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे सातत्याने खरीप व रब्बी हंगामातील पीके तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, गेल्या वर्षी २४ हजारपेक्षा जास्त गावांमध्ये टंचाई जाहीर होणे, त्यानंतर झालेला अवकाळी पाऊस व गारपीट याची शेतकऱ्यांना अत्यंत तुटपुंजी मदत करण्यात येणे, मागील वर्षीच्या जाहीर ७ हजार कोटीपैकी शेतकऱ्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाईपोटी रुपये ४८०० कोटींपैकी ८०० कोटी अद्याप शेतकऱ्यांना न मिळणे, चालू वर्षात कापूस, धान, सोयाबीन, ऊस, संत्रा यासारख्या शेतमालाला गेल्या*

...३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)*

*श्री.धनंजय मुंडे............*

***दहा वर्षातील निच्चांकी भाव मिळणे, चालू वर्षात खरीप हंगामात देखील अपुरा पाऊस होणे, १५ हजार ५४७ गावात ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर होऊनही शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही मदत न मिळणे, पाणी टंचाई व चारा टंचाई निवारणासाठी कार्यक्रम हाती न घेणे, या सर्व परिस्थितीमुळे अडचणीत आलेले शेतीचे अर्थकारण, घेतलेले कर्ज फेडू न शकल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्यात वाढ होणे, संस्थात्मक कर्ज माफ करण्यास नकार देऊन वैयक्तिक सावकारी कर्ज माफ करण्याचा निर्णय सावकारांच्याच फायद्याचा ठरणे, केंद्राकडून दुष्काळासाठी मदत मिळविण्यास राज्य सरकारला अपयश येणे, राज्याकडून मदतीबाबत साधा प्रस्तावही न पाठविण्यात येणे, बीटी कॉटन बियाणांच्या किंमती इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात अधिकच्या असणे, किटकनाशक, जैविक पीकवाढ, संजिविके (पिजीआर) व जैविक किटकनाशक यांच्या नोंदणी विक्रीत आणि किंमतीवर शासनाचे कोणतेही निर्बंध नसणे, सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकरी आणि दुष्काळग्रस्त जनतेत निर्माण झालेला प्रचंड असंतोष, शेतकऱ्यांकडे असलेले संपूर्ण कर्ज माफ करण्याची आवश्यकता, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली उपाययोजना विचारात घेण्यात यावी.***

सभापती महोदय, मागील वर्षातील नागपूरचे हिवाळी अधिवेशन हे या सरकारचे पहिले अधिवेशन होते. हे सरकार सत्तेमध्ये आल्यानंतरचे आजचे हे चवथे अधिवेशन आहे. या अधिवेशनांमध्ये राज्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना मदतीची आणि कर्जमाफीची मागणी सातत्याने केली जात आहे. खरे तर मागील चार वर्षात ज्या ज्या वेळी आम्ही कर्जमाफी संबंधी, शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधी भूमिका घेतली त्या त्या वेळी सरकारकडून काही-ना-काही घोषणा करण्यासंबंधी, निर्णय घेण्यासंबंधी या सभागृहात बोलले जात होते. या सरकारच्या वतीने 7 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा मागील अधिवेशनात झाली. या हिवाळी अधिवेशनातील, दुसऱ्या आठवड्यातील आजचा पहिला दिवस आहे. मागील आठवड्यात विधानपरिषदेमध्ये कोणतेही कामकाज होऊ शकलेले नाही. कारण, विरोधी पक्षाची ही भूमिका होती की, आता आमचा

...4....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

सरकारवर विश्वास राहिलेला नाही. किंबहुना आम्ही जे बोलत आहोत त्याप्रमाणेच या राज्यातील जनता आणि शेतकरी हे देखील या सरकारने ज्या घोषणा केल्या त्यावर आमचा विश्वास नाही, असे म्हणत आहेत. म्हणून आम्ही पहिल्या दिवसापासून सरकारकडे ही मागणी करीत आहोत की, सरकारने पुढे यावे आणि अगोदर राज्यातील सर्व शेतकऱ्यांची, त्यातल्यात्याल दुष्काळी भागातील सर्व शेतकऱ्यांची कर्ज माफी करण्याची घोषणा करावी. कापूस उत्पादक, धान उत्पादक, सोयाबीन उत्पादक, दूध उत्पादक, फळबाग उत्पादक, अशा सर्व शेतकऱ्यांना या अडचणीच्या काळात सरकार कोणती मदत करणार आहे, हे अगोदर सरकारने स्पष्ट करावे. कारण, चर्चा करुन सरकार काही मदत देत आहे, केलेल्या घोषणेप्रमाणे सरकारची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे, अशी परिस्थिती आता राहिलेली नाही.

सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनात या सरकारने केलेल्या घोषणा मी पुराव्यानिशी आपल्यासमोर मांडणार आहे. मागील अधिवेशनात मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या दोन तासांच्या भाषणात केलेल्या घोषणा मी आपल्याला वाचून दाखवितो. शाश्वत कृषी विकासासाठी 34500 कोटींचा विकास कार्यक्रम राबविणार, दरवर्षी 5 हजार गावे दुष्काळमुक्त करणार, 5 वर्षात 25000 गावे दुष्काळमुक्त करणार, विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करणार, जलयुक्त शिवार योजना राबवून गावे दुष्काळमुक्त करणार, वॉटर ऑडिट करणार, पुढील 5 वर्षात 25 लक्ष शेततळी करणार, राज्यामध्ये 5 लक्ष सोलार पंप देण्यात येतील, संपूर्ण क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणणार, विदर्भ, मराठवाड्यातील 5 लक्ष शेतकऱ्यांनी खाजगी सावकारांकडून घेतलेले संपूर्ण कर्ज राज्य सरकार माफ करणार, शेतकऱ्यांना दुष्काळाअंतर्गत मदत करण्यासाठी 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देणार, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न मॉईश्चर सिक्युरिटी देऊन वाढविणार, राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणार, अशा अनेक घोषणांचा पाऊस मागील हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहात पाडला होता. घोषणांचा पाऊस एवढा पडला की, प्रत्यक्ष पाण्याचा पाऊस या वर्षी पडलाच नाही. कधी कधी

...5....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.........

काही गोष्टींवर आपला विश्वास बसत नाही. कारण त्या गोष्टी आपण जीवनात पाळत नाही. पण काही प्रसंग आला की, त्या गोष्टींवर आपल्याला विश्वास ठेवावा की काय, असा प्रश्न निर्माण होतो.

....L-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

आज ज्या पक्षाचे सरकार सत्तेवर आहे त्याच पक्षाच्या एका केंद्रीय मंत्र्यांनी एका कार्यक्रमात सांगितले होते की, आमचे सरकार काही चांगल्या मुहूर्तावर सत्तेत आलेले नाही आणि ते स्वाभाविक आहे. सरकार कोणत्या मुहूर्तावर सत्तेत आले, तो मुहूर्त कोणता होता, हे महत्वाचे नाही. परंतु, आजही ग्रामीण भागात काही रीतीरिवाज, प्रथा, परंपरा पाळल्या जातात. आजही खेडेगावात गरीब कुटुंबात लग्न होऊन सून घरात आली आणि एखादी चांगली गोष्ट घडली तर त्या सुनेचे सासू-सासरे म्हणतात की, माझी सून चांगल्या पाऊलाची आहे. परंतु, लग्न होऊन सून घरात आली आणि एखादी वाईट गोष्ट घडली तर त्या मुलाचे आई-वडील त्या सुनेच्या बाबतीत बोलतात की, ही पांढऱ्या पायाची आहे. आज संपूर्ण राज्यातील ग्रामीण भागात ही चर्चा होत आहे. याचे कारण असे आहे की, हे सरकार सत्तेत आल्यापासून राज्यावर जी संकट आली ती मानवनिर्मित संकट नाहीत, ती नैसर्गिक संकट आहेत. स्वाभाविकपणे नैसर्गिक संकट आल्यानंतर आपण शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. आपण ज्या छत्रपतीपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन सत्तेत आलात त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपण राज्याचे भांडार रिकामे करुन वर्षभरात शेतकऱ्यांसाठी काही तरी करणे अपेक्षित होते. मी आपल्याला पुरावा देतो.

सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनात शासनाने शेतकऱ्यांना 4,800 कोटी रुपये मदत देण्याची घोषणा केली. महसूल व वन विभागाने दिनांक 7 जानेवारी, 2015 रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयामध्ये प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेली मागणी, खरीप हंगाम 2014 करीता वितरीत करावयाचे अनुदान, राज्यातील सर्व जिल्ह्यातील एकूण संख्या नमूद केलेली आहे. ती रक्कम 4,803 कोटी रुपये आहे. म्हणजे, 4803 कोटी रुपये देण्याचे शासनाने मान्य केले आणि ते एकदा मान्य केले नाही. त्यानंतर दिनांक 2 फेब्रुवारी, 2015 रोजी पुन्हा एक शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्या शासन निर्णयात देखील 4803 कोटी रुपये एवढीच रक्कम नमूद केलेली आहे. मी जबाबदारीपूर्वक बोलत आहे. राज्य शासनाने या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत एकूण किती अनुदान वाटप केले ? राज्य खासनाने एकूण 3,800 कोटी रुपये अनुदान वाटप केले. म्हणजे शासनाने मागील अधिवेशनात जे अनुदान जाहीर केले होते त्यातील 1

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

हजार कोटी रुपयांचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. मग आम्ही शासनावर कसा विश्वास ठेवावा, कशी चर्चा करावी ? 7 हजार कोटी रुपयांच्या पॅकेज नंतर सरकारने अशी पावले उचलली की, बघा आम्ही करुन दाखविले, आम्ही केले. परंतु, कोणी केले हा विषय महत्वाचा नाही. मी हा विषय यासाठी पोटतिडकीने मांडत आहे की, कर्ज मुक्तीचा विषय फार मोठा नाही. यापूर्वी काही झाले किंवा नाही झाले ? आम्ही कर्ज मुक्तीचा विषय उपस्थित केल्यानंतर शासनातर्फे सांगितले जाते की, तुम्ही 15 वर्षे सत्तेत होता, तुम्ही काय केले ? तुमच्या 15 वर्षाच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आपल्या माध्यमातून मला शासनाला एक विनंती करावयाची आहे. मी अतिशय जबाबदारीपूर्वक बोलत आहे. आम्ही 15 वर्षे सत्तेत असताना आपण कोणत्याही एका वर्षातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी काढून बघावी आणि तुम्ही सत्तेत आल्यानंतर एका वर्षातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी काढून बघावी. तुमच्या काळातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी जास्त निघाली नाही तर आम्हाला सांगावे. आम्ही एखादी मागणी केल्यानंतर आम्हाला मागील 15 वर्षातील आठवण करुन द्यावयाची ? परंतु, तवेढीच आठवण करुन देण्यापेक्षा हा विषय देखील आपल्या आठवणीत राहिला पाहिजे की, केंद्रात युपीएचे सरकार सत्तेवर असताना माननीय श्री.शरद पवार साहेब देशाचे कृषीमंत्री असताना त्यांनी देशातील शेतकऱ्यांचे 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते. हे देखील लक्षात घतले पाहिजे. हा राजकारणाचा विषय नाही. आमच्या शासनाने सन 2008 दरम्यान शेतकऱ्यांचे 20 हजार रुपयांचे कर्जमाफ केले होते, ही गोष्ट लक्षात राहावयास नको काय ? आम्ही चुकीचे वागलो म्हणून जनतेने तुम्हाला सत्तेत बसविले, असे काही ठिकाणी जनता म्हणत होती. परंतु, आज एका वर्षात तीच जनता म्हणते की, आमच्याकडून चूक झाली, आम्ही पुन्हा अशी चूक करणार नाही. हा महत्वाचा विषय आहे. राज्य शासनाला एकदा शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास काय अडचण आहे ? राज्यात सलग 4 वर्षापासून दुष्काळ पडत आहे. आज शेतकरी काय मागतो ? आज शेतकऱ्यांकडे काहीही नाही. सलग 4 वर्षापासून खरीपाचा, रब्बीचा हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून गेलेला आहे. मग अशा वेळी शासनाने आम्हाला काही तरी मदत द्यावी, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. आमच्या घरात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

काहीही राहिलेले नाही, 7/12 च्या उताऱ्यावर कर्ज लिहिण्यासाठी जागा राहिलेली नाही. शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले व्यक्तिगत कर्ज डोंगराएवढे झालेले आहे. एकीकडे मात्र तुम्ही 7 हजार कोटी रुपये प्रती वर्षी व्यापाऱ्यांसाठी महानगरपालिकेचा एलबीटी कर माफ करीत आहात. तुम्ही प्रत्येक वर्षी 7 हजार कोटी रुपये देणार आहात. म्हणजे 5 वर्षात तुम्ही 35 हजार कोटी रुपये देणार आहात. दुष्काळी भागातील ज्या गावांमध्ये आणेवारी निश्चित झालेली आहे, ज्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या जास्त आहे, या सर्व गोष्टींचा आधार घेऊन शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आपल्याला 10 हजार कोटी रुपये द्यावे लागले तर त्यासाठी काय हरकत आहे. परंतु, यांना ते द्यायचे नाहीत. हे सरकार सावकारांचे आहे, का शेतकऱ्यांचे आहे असा फरक लोक करीत आहेत. आम्ही कर्जमाफी केल्यानंतर आता सत्तेत बसलेले सर्व सदस्य म्हणत होते की, तुम्ही कर्जमाफी केली हे खरे आहे. परंतु, कर्जमाफीचा फायदा बँकांना झालेला आहे. बँक कोणाची एकट्याची आहे काय, वैयक्तिक आहे काय ? बँक ही वित्तीय संस्था आहे आणि त्या वित्तीय संस्थेला फायदा झाला म्हणून तुम्ही आमच्यावर आरोप करीत आहात. तुम्ही मागील हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्जमाफ करण्याचा जो निर्णय घेतला तो चुकीचा आहे. शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले कर्ज फेडणे हा कोणाचा फायदा आहे ? आपण या संदर्भात उत्तर दिले पाहिजे. हा सावकारांचा फायदा नाही काय ? तुम्ही फेडलेले सावकारांचे कर्ज हे शेतकऱ्यांचे आणिशेतकऱ्यांनी बँकेकडून घेतलेले 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज आम्ही फेडले तर ते बँकेचे, असा कसा फरक होऊ शकतो. यामध्ये फरक केला पाहिजे.

सभापती महोदय, आम्ही जळगाव डीसीसी बँकेचे कर्ज माफ केले. त्यावेळी ती बँक आमच्या पक्षाच्या ताब्यात होती. आज ती बँक माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांच्या पक्षाच्या ताब्यात आहे. मग आपण जर कर्ज माफ केले तर त्या बँकेचा देखील फायदाच होणार आहे. म्हणून मला आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करावयाची आहे की, तू-तू, मै-मै सोडून द्यावी. तुम्ही काय केले, आम्ही काय केले हा विषय सोडून द्यावा. आज खऱ्या अर्थाने शेतकरी अतिशय अडचणीत सापडलेला आहे. शेतकरी संकटात असताना मागील वर्षभरात शासनाने जे काही निर्णय घेतले मग

..4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

तो कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय असो किंवा इतर निर्णय असोत. कोणत्याही बँकेने कर्जाचे पुनर्गठन केलेले नाही. आपल्याकडे बँकांनी कर्जाचे पुनर्गठन केल्याचे पुरावे असतील तर आपण ते द्यावेत आणि याबाबत माझ्याकडे जे पुरावे आहेत ते मी देतो.

सभापती महोदय, मला एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. शासनाने 15,400 गावात आणेवारी कमी असल्याबाबतची घोषणा केली आणि त्यानंतर पुन्हा 3 हजार गावांची घोषणा केली. मला विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्याचे उदाहरण द्यावयाचे आहे. ज्यावेळी पहिल्यांदा सर्व्हेक्षण झाले त्यावेळी चंद्रपूर जिल्ह्यातील एकाही गावात 50 पैशापेक्षा कमी आणेवारी नव्हती, एकही गाव दृष्काळग्रस्त म्हणून घोषित झाले नव्हते. परंतु, पुर्नसर्वेक्षण केल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील 1400 गावे 50 पैशापेक्षा कमी आणेवारीत आली. म्हणजे याचा अर्थ काय होता ? प्रशासनाला जाणीवपूर्वक चंद्रपूर जिल्ह्यातील दुष्काळ दाबावयाचा होता, का फक्त माननीय वित्तमंत्री चंद्रपूर जिल्ह्यातील आहेत म्हणून पुर्नसर्वेक्षणात 1400 गावे कमी आणेवारीत आली ?

..M-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

महाराष्ट्रात काही जिल्ह्यातील काही गावांमध्ये खाण्यासाठी अन्न नाही व पिण्यासाठी पाणी नाही. परंतु ती गावे आणेवारीच्या नियमात बसविली नाहीत. अहमदनगर व बीड जिल्ह्याच्या बॉर्डरवर कर्जत-जामखेड तालुका आहे, तेथील राज्यमंत्री आहेत. हा तालुका दुष्काळाने होरपळत आहे. त्या तालुक्यात मी दोन वेळा जाऊन आलो आहे. त्या तालुक्यात पिण्यासाठी पाणी नाही, कोणतेही पीक तेथे उगवले नाही. या तालुक्यातील आणेवारी 50 पैशांच्यावर दाखविण्यात आली आहे. ही पैसेवारी जाहीर करण्यामध्ये कोणी जगलरी केली आहे. ही जगलरी सत्तेत बसलेल्या सत्ताधीशांकडून प्रशासनला सांगितली गेली होती की, प्रशासनानेच केली ही बाब या चर्चेला उत्तर देतांना स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्तेबाबत राजकारण करु नये असे सांगण्यात आले आहे. आम्हाला देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्तेबाबत राजकारण करायचे नाही. ज्या शेतकऱ्याचे पोट हाताच्या मेहनतीवर आहे, निसर्गावर अवलंबून आहे, त्या शेतकऱ्यावर आज डोंगराएवढे कर्ज झाल्यावर त्याने कोणाकडे बघावे व काय करावे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. शेतकऱ्याचा प्रेमभंग झाला म्हणून त्याने आत्महत्या केली असे केंद्रीय मंत्री महोदयांनी संसदेच्या सदनात सांगितले आहे. मला त्यांना व कोणालाही दोष द्यावयाचा नाही. शेतकरी आत्महत्या का करतो, तो दहावीत नापास झाला म्हणून आत्महत्या करतो काय ? त्याचे एका मुलीवर प्रेम झाले व ते भंग झाले म्हणून तो आत्महत्या करतो काय ? शेतकऱ्याने शेती पिकविण्यासाठी जे कर्ज घेतले आहे त्या कर्जाची परतफेड होऊ शकत नाही. कर्ज व्यक्तीगत असेल किंवा संस्थेचे असेल या कर्जाचा तगादा लावल्यामुळे व त्याच्या घरातील मुले-मुली लग्नाच्या वयाची आहेत, त्यांची जबाबदारी आपण व्यवस्थित पार पाडू शकत नाही या निराशेपोटी शेतकरी आत्महत्या करीत आहे. या वर्षभरात 70 ते 80 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यांच्या घरी जाऊन मी सात्वंन केले आहे ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, शेतकरी प्रेम करतो हे खरे आहे, शेतकरी प्रेम करतो आपल्या काळ्या मातीवर, शेतकरी प्रेम करतो आपल्या शेतातील पिकावर, शेतकरी प्रेम करतो आपल्या गोठ्यातील

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

जनावरांवर, या प्रेमाचा भंग निसर्ग कोपल्यावर होतो. काळ्या मातीवर प्रेम करतो त्यातून काहीच न पिकल्यामुळे गोठ्यातील जनावरांना मुठभरा चारा देखील खाऊ घालू शकत नाही. वयात आलेल्या मुला-मुलींचे शेतकरी लग्न करु शकत नाही, या प्रेमभंगापोटी व निराशेपोटी शेतकरी आत्महत्या करतो. शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. अच्छे दिन चे स्वप्न आम्ही दाखविले होते काय ? अच्छे दिन चे स्वप्न दाखविण्यासाठी आम्ही महाराष्ट्रात फिरलो होतो काय ?

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील हर्णी तालुक्यातील दाभाडी येथे माननीय प्रधानमंत्री यांची "चाय पे चर्चा" झाली होती. या कार्यक्रमात माननीय प्रधानमंत्री यांनी देशातील व विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना जे स्वप्न दाखविले ते मी सांगत आहे, मी जे सांगतो ते चुकीचे असेल तर मंत्री महोदय श्री.एकनाथराव खडसे मी उठबशा काढीन. माननीय पंतप्रधान यांनी सांगितले होते की, शेती माल उत्पादनासाठी जितका खर्च येतो त्यावर 50 टक्के फायदा ठेऊन आम्ही शेतीमालाचा भाव देऊ व शेतकऱ्यांच्या जीवनात अच्छे दिन आणू. "मित्रहो, मेरे किसान भाईओ", हे स्वप्न आम्ही दाखविले होते काय ? ते स्वप्न ज्यांनी दाखविले त्या व्यक्तीवर लोकांनी विश्वास ठेवला. एक व्यक्ती संपूर्ण देशभर फिरुन देशात परिवर्तनाची लाट निर्माण होत असताना आपल्या जीवनात देखील अच्छे दिन आणण्याबाबत सांगत आहे त्यावर विश्वास ठेवला पाहिजे, त्यांनी दाखविलेले स्वप्न खरे होईल या अपेक्षेने शेतकरी आपल्या शेतात राबू लागला आहे. यासंदर्भातील वास्तव केंद्र सरकारचे 17 महिने व राज्य सरकारचे एक वर्षे पूर्ण झाले तेव्हा कळले आहे. अद्यापही शेतकऱ्यांच्या जीवनात अच्छे दिन आले नाही. या गोष्टीचे वाईट वाटते. थोडी तरी जनाची नाही तर मनाची कोठे तरी या सरकारला वाटली पाहिजे. तुम्ही रस्त्यावर उभे राहून सत्तेत नसताना कापसाला साडेसहा हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळावा म्हणून संघर्ष केला. हे आम्ही केले काय हे स्वप्न आम्ही दाखविले होते काय ? आता आपले सरकार असताना साडेसहा हजार रुपये कापसाला भाव मिळाला काय ? त्यावेळी शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळत होता, तेव्हा शेतकऱ्यांचे अच्छे दिन होते ते अच्छे दिन देखील आता गेले आहेत. आज कापसाचा 3800 रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. सोयाबीनला भाव मिळावा म्हणून आपण विरोधात असताना बेंबीच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

देठापासून ओरडून सांगत होता की, सोयाबीनला इतका भाव मिळाला पाहिजे. आज सोयाबीनला काय भाव मिळत आहे. दोन शेतकऱ्यानी बाजारात सोयाबीन विकले आहे, त्याच्या पावत्या मी आपणाला देतो. सात एकर सोयाबीन त्या शेतकऱ्यांनी पेरले होते. सात एकरात त्या शेतकऱ्याला 70 हजार रुपये खर्च आला आहे. पिकविलेले सोयाबीन शेतकऱ्याने विकले असून त्याला 42,000 रुपये मिळाले आहेत, त्याच्या पावत्या माझ्याकडे आहेत. एका शेतकऱ्याची व्यथा मी या सभागृहात मांडत आहे.

सदनाची कोंडी फोडण्यासाठी माननीय सभापती महोदयांनी पुढाकार घेतला व पाच दिवस जी कोंडी चालली होती ती फुटावी म्हणून सभापती महोदयांनी सरकारला विनंती केली. सरकारने सांगितले की, तुम्ही जे विचार मांडणार आहात, त्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. याबाबत सरकारने आणखी सकारात्मक व्हावे. शेतकऱ्यांची व्यथा आम्ही राजकारणापोटी मांडत आहोत असे आपण समजू नका. त्या शेतकऱ्याचा आवाज लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही विरोधी बाकावरुन मांडत आहोत. सरकारला थोडा तरी पाझर फुटू द्यावा. या मंत्रिमंडळात कोण शेतकरी आहे याची मला माहिती नाही. मागच्या पावसाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, पाच पिढ्यांचा मी शेतकरी आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे सांगतात की, मी बांधावरचा शेतकरी आहे. आज महाराष्ट्रातील शेतकरी सरकारला विचारत आहे की, शेतकरी हा आपला बाप आहे, तो अडचणीत येत असताना त्या मुलाला शेतकऱ्याकडे बघायला वेळ मिळत नसेल तर कोण खरे शेतकरी आहे, असा प्रश्न महाराष्ट्रातील शेतकरी या सरकारला विचारत आहे. मी सरकारकडे पहिली मागणी अशी करतो की, शेतकऱ्यांची कर्जमाफी या सरकारने करावी. सरकारची कर्ज घेण्याची ऐपत आहे, शेतकऱ्यांसाठी 10 ते 15 हजार कोटी कर्ज घेण्याची गरज लागत असेल व सरकारची ऐपत असेल तितके कर्ज घ्यावे. विरोधी पक्षाच्या बाकावरुन मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने सांगतो की, यासरकारने कर्ज का काढला असा आम्ही आरोप करणार नाही. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले व त्यासाठी सरकारला कर्ज काढावे लागले तर आम्ही सरकारचे अभिनंदन करु, सरकारचे आभार मानू. सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकरी संकटात आला त्या शेतकऱ्याला सरकारने मदत केली पाहिजे.

....4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, सावकारी कर्ज माफ करण्याची घोषणा मागील हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे करण्यात आली होती. घोषणा केल्यानंतर एप्रिल महिन्यात जी.आर.काढण्यात आला तरी देखील मागील महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. औरंगाबाद विभागाची माहिती माझ्याकडे आहे. या संदर्भातील पुरावे मी आपणाकडे देतो. औरंगाबाद विभागातील, वैजापूर, सिल्लोड, सोयगांव, फुलंब्री, गंगापूर, पैठण या तालुक्यातील एकूण 10 सावकारांकडून 716 शेतकऱ्यांनी जे कर्ज घेतले होते, त्या शेतकऱ्यांचे कर्ज फक्त आतापर्यंत माफ करण्यात आले आहे.

....N-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

आज तुम्ही ही जाहीर केलेली योजना यशस्वी व्हावी यासाठी तुमचे काय प्रयत्न चालले आहेत? सावकारांची नावे सुध्दा मी आपल्याकडे देतो, हे सावकार कोणत्या पक्षाशी निगडित आहेत हे सभागृहाने पहावे. बीड जिल्हयामध्ये आष्टी तालुक्यातील कडा गावातील एका सावकाराकडे एका शेतकऱ्याने सोने गहाण टाकून शेतीच्या कामासाठी कर्ज घेतले. आज या शेतकऱ्यांना शासनाच्या योजनेचा फायदा होण्यासाठी शेतीचे कर्ज असो वा नसो, काही सावकार स्वतःहून पुढे येऊन प्रयत्न करु लागले आहेत. एकीकडे सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडण्यासाठी किडनी विकणारे शेतकरी आहेत, दुसरीकडे शासनाची योजना जाहीर होऊन एक वर्ष झाले तरी या योजनेंतर्गत शेतकऱ्यांचा एकत्रितपणे एक ते दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त फायदा झालेला नाही. ही कर्जमाफीची योजना शेतकऱ्यांचा फायदा करुन देण्यासाठी आहे की सावकारांचा फायदा करण्यासाठी आहे? शासन म्हणत असेल की, कर्जमाफी केल्यानंतर बँकांचा फायदा होणार आहे तर आम्ही सुध्दा म्हणतो की, ही योजना सावकारांचा फायदा होण्यासाठी लागू केलेली आहे. या कर्जमाफीला काही अर्थ नाही. तुम्ही सामान्य जनतेला जो विश्वास आणि शब्द दिला होता त्या शब्दापासून शासन दूर जात आहे. कर्जमाफीला तुम्ही कर्जमुक्ती म्हणा. शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करु म्हणा. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे शेत जमिनीशी जुडलेले आहेत. दुष्काळाच्या संकटात शेतकरी सापडलेला असताना माननीय राज्यमंत्री श्री.संजय राठोड यांच्या मतदारसंघातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची जमीन त्यांनी पेरुन दिली, ते चित्र पाहून आमचा उर भरुन आला होता. आज असे असंख्य शेतकरी आहेत, ज्यांच्या घरात खायला अन्न नाही. त्यांच्या बाबतीत थोडी तरी संवेदना दाखविणार की नाही? सत्तेत असताना आपण शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करण्याची घोषणा करुनही ती अंमलात आणणार नसाल तर आम्ही काय करायचे? या संदर्भात माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी स्वतः सभागृहात भूमिका मांडली पाहिजे. आज राज्यात कापूस, सोयाबीन, धान आणि संत्रा या कृषी उत्पादनाने निचांक गाठला आहे. शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाच्या हमी भावात बदल व्हावेत म्हणून राज्य सरकारने राज्य कृषी मूल्य आयोगाची स्थापना केली. राज्य कृषी मूल्य आयोग कशासाठी स्थापन केला हे माननीय कृषी मंत्री स्पष्टपणे सांगू शकतील. राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी मालाला उत्पादनाशी निगडित जो खर्च येतो तो व काही प्रमाणात नफा गृहित धरुन हमी भाव जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य कृषी मूल्य आयोगाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N.2

SGB/ AKN/ ST/ 15:10

श्री.धनंजय मुंडे.....

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे प्रस्ताव पाठवायचा असून त्यानंतर हमी भाव जाहीर होणार आहेत. मागील 9 महिन्याच्या काळात राज्य कृषी मूल्य आयोगाची काय अवस्था झाली आहे? शेतकऱ्यांनी तुम्हाला सत्तेवर बसविले आहे. त्या शेतकऱ्यांना विसरुन चालणार नाही. तुम्ही त्यांना दाखविलेली स्वप्ने पूर्ण होतील या आशेने त्यांनी तुम्हाला भरभरुन मतदान केले. त्या शेतकऱ्यांच्या जीवनात काहीही बदल झालेला नाही. 10-10 क्विंटल शेतीमाल पिकविणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतात आज काहीही पिकलेले नाही. अन्यथा त्याने तुमच्याकडे कर्जमाफीची मागणी केली नसती. महाराष्ट्रातील कापूस, सोयाबीन, धान आणि संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मनगटात ताकद आहे. कर्जमाफीसाठी तो हात पसरणार नाही. परंतु निसर्गाच्या अवकृपेमुळे क्विंटलने कापसाची विक्री करणारा शेतकरी आज किलोच्या प्रमाणात कापूस विकत आहे. त्याचे कापसाचे उत्पादन घटले आहे.

मध्यंतरीच्या काळात पावसाने उघडीप दिली. त्यामुळे रब्बीचे पीक हाती आले नाही. आज दुष्काळाचा विचार करीत असताना सरकारने स्वत: पुढाकार घेतला पाहिजे. चाय पे चर्चा करताना विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला 50 टक्के हमी भाव देण्याचे देशाचे विद्यमान पंतप्रधान यांनी जाहीर केले होते. आज केंद्र सरकारने शेतकऱ्यांचा अवमान केला आहे. शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे. उलट केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात शपथपत्र दाखल केले आहे. त्यात 50 टक्के भाव आम्ही देऊ शकत नाही, हमी भाव ठरवू शकत नाही अशा प्रकारचा उल्लेख त्या शपथपत्रात केला आहे. मी आपल्याला त्या शपथपत्रातील काही महत्वाचा भाग वाचून दाखवितो. "It is reiterated that MSP is recommended by CACP on objective criteria considering variety of relevant factors. Hence, prescribing an increase of at least 50 per cent on cost may distort the market. A mechanical linkage between the MSP and cost of production may be counter-productive in some cases." का विश्वास दिला होता, शपथपत्रात 'may be' असा उल्लेख करणे योग्य आहे का? आम्ही प्रत्येक वेळी म्हणतो की, नवसाने झाले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

15 वर्षानी तुम्ही सत्तेवर आला आहात. ज्या विश्वासाने राज्यातील जनतेने तुम्हाला सत्ता बहाल केली त्या भोळ्या भाबड्या जनतेच्या विश्वासाला तुम्ही तडा दिला आहे. चाय पे चर्चा करताना

...3....

14-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N.3

SGB/ AKN/ ST/ 15:10

श्री.धनंजय मुंडे.....

विश्वास दिला आणि दुसरीकडे सुप्रीम कोर्टात शपथपत्र दाखल करता, याचा अर्थ जोपर्यंत भारतीय जनता पक्षाचे सरकार देशात आणि राज्यात सत्तेवर आहे तोपर्यंत शेतकऱ्यांच्या जीवनात कधीही अच्छे दिन येऊ शकत नाही, हे स्पष्ट होते. आत तुम्ही सत्तेत असताना शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणे तुम्हाला सोपे वाटू शकते. परंतु जोपर्यंत शेतकरी रुमणे हातात घेत नाही तोपर्यंत तुम्हाला कळणार नाही.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार योजनेबाबत सांगू इच्छितो. दुष्काळ आणि त्याच्या नियोजनाबाबत हे सरकार करते एक आणि होते दुसरे याचे एक उदाहरण देतो. माझ्या कार्यालयाने औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयाकडून बीड जिल्हयात टँकर सुरु आहेत का याबाबतची माहिती मागविली होती. विभागीय आयुक्त कार्यालयाने असे कळविले की, बीड जिल्हयात सप्टेंबर महिन्यापासून टँकरचे पैसे दिलेले नाहीत. बीड जिल्हयात टँकर खूप उपलब्ध आहेत, परंतु पिण्याच्या पाण्याची अवस्था अत्यंत दयनीय आहे. गावात टँकर जात नाहीत. कारण कॉन्ट्रॅक्टरकडे डिझेल भरण्यासाठी पैसे नाहीत.

सभापती महोदय, एवढ्या गहन विषयावर सभागृहात चर्चा होत असताना आम्हाला ही अपेक्षा होती की, ज्यांच्याकडे पाहून आम्ही लहानाचे मोठे झालो, ज्यांच्याकडे पाहून सामान्य माणसाच्या वेदना काय आहेत, संवेदना काय आहेत हे आम्हाला कळते, त्यांच्या व्यथा मांडताना या विषयामध्ये मी कोणतेही राजकारण करणार नाही. टँकरसाठी निधी मिळत नाही हे सांगण्यामध्ये राजकारण आहे का, हा विषय मांडून मला सभागृहाच्या नेत्यांना बदनाम करायचे आहे का? हा त्यांचा दोष नसून अधिकाऱ्यांचा दोष आहे हे सभागृहामध्ये मांडले तर ते चुकीचे होणार नाही. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत माननीय मुख्यमंत्र्यांनी पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील वेल्हे गावातील निकृष्ट कामाची दिनांक 11.6.2015 रोजी पाहणी दौरा केला त्याचा अहवाल माझ्याकडे आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ओ.1....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

अशी जलयुक्त शिवार अभियानाची असंख्य कामे आहेत. त्यावर मी स्वतंत्रपणे बोलणार आहे. जलयुक्त शिवार अभियानाद्वारे आपण 24 टीएमसी पाणी मिळेल असे सांगत असाल तर आपणास हेही सांगावे लागेल की, गेल्या 10 वर्षांपासून किती गावांना टँकर आहेत, त्यातील किती गावे जलयुक्त शिवार अभियानामुळे टँकर मुक्त झाली आहेत ? असे काहीच झालेले नाही. पण काहीही सांगायचे, पण वाजवून सांगायचे हा स्वाभाविक स्वभाव ज्या विचारांचा पक्ष आहे त्यांचा आहे. त्यामुळे मी हे समजू शकतो. माझी एवढीच माफक अपेक्षा आहे की, चाऱ्यांच्या छावणीबाबत आज काय होत आहे ? मी एका जिल्ह्याचे उदाहरण देतो. बीड म्हटले की, राजकारण आणत आहे असे आपण म्हणाल. एका ग्रामपंचायतील एक छावणी द्यावी. एक ग्रुप ग्रामपंचायत आहे. तिला पाच छावण्या दिल्या आहेत. तीन गावे आहेत तिला पाच छावण्या दिल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी बीडच्या एका छावणीला भेट दिली. ती माहिती मी पुराव्यानिशी देतो. त्या एका छावणीमध्ये 48 शेतकऱ्यांची 3500 जनावरे कशी हे मला देखील कळले नाही. आमचे म्हणणे आहे की, जे झाले ते पुढे होऊ नये. ....(अडथळा).... असे प्रकार छावण्यांच्याबाबतीत चालले आहेत.

सभापती महोदय, गोवंश हत्येसंबंधी आपण निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी आम्हाला चर्चा करावयाची नाही. भाकड जनावरांचे आपण काय करणार आहात ? आपण म्हणाला होता की, भाकड जनावरे शेतकऱ्यांना सांभाळायला होत नसतील तर ती आमच्याकडे आणून द्यावीत. ती कुठे कुठे आणून द्यायची त्याचे पत्ते आम्हाला सांगावेत. तेथे आपण जनावरे आणून देतो. कारण काही शेतकरी आमच्या प्रेमा पोटी किंवा आमच्या सोबत राजकारण करायचे म्हणून काही भाकड जनावरे आमच्या दाराला बांधण्यासाठी आणत आहेत. या सगळ्या गंभीर परिस्थितीचा निर्णय सरकारला करावा लागेल. या ठिकाणी काही तरी निर्णय होईल. आज आपण बोललात, माननीय सभापती महोदयांनी आम्हाला विश्वास दिला म्हणून येथे चर्चा सुरू झाली. या चर्चेच्या निमित्ताने मला सरकारकडे एवढीच मागणी करावयाची आहे की, एकदाच या राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे. आम्ही म्हणतो म्हणून करावे, आपली इच्छा आहे म्हणून करावे. पण आज अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा निर्णय घेऊन आपण आधार द्यावा. आज आपण सत्तेत आहात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

आज कर्जमाफी झाली नाही आणि उद्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा आवाज एकवटला तर त्याचे गंभीर परिणाम आपल्याला भोगावे लागतील. कारण त्या शेतकऱ्यांनी आम्हाला आस्मान दाखविले आहे. ते शेतकरी आपणास आस्मान दाखवायला कमी करणार नाहीत तेव्हा कर्जमाफीची माझी माफक अपेक्षा सरकारकडून आहे.

सभापती महोदय, भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये व प्रचार सभांमधून उत्पन्नाच्या खर्चाच्या पन्नास टक्के भाव शेतकऱ्यांना असे सांगितले होते. तेव्हा तो भाव आपण द्यावा. यात कोणती अडचण आहे ? काही झाले की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे उदाहरण देतात. कापसाला दर कमी का आले अशी विचारणा केली तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे कारण पुढे केले जाते. मग आपण पेट्रोल, डिझेलचे दर कमी का करीत नाही ? क्रूड ऑईलचे भाव कमी आले आहेत. मग आपण देशातील भाव का कमी करीत नाही ? दुष्काळ निवारण्यासाठी पेट्रोलवर अतिरिक्त कर लावण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे. असे कधीच झाले नव्हते. या महाराष्ट्राने 1972 साली गंभीर दुष्काळ बघितला आहे. त्यापेक्षा यंदाचा गंभीर दुष्काळ आहे. दुष्काळाचे नाव पुढे करून एलबीटीसाठी पैसा गोळा करण्याचे काम आपण करीत आहात. संपूर्ण राज्याला पेट्रोल, डिझेलवर अतिरिक्त कर लावून महागाईच्या खाईत एलबीटीसाठी ढकलून देण्यात येत आहे. व्यापाऱ्यांना फायदा देत असताना आपण शेतकऱ्यांना कसे काय विसरत आहात ? आज शेतकरी भयंकर अडचणीत आहेत. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. माझी माननीय महसूल मंत्र्यांकडून फार मोठी अपेक्षा आहे. आपली केंद्रामध्ये तेवढी किंमत सुद्धा आहे. काही करून हे दिलेले प्रतिज्ञापत्र आपण मागे घ्यावे. आपण ते परत घेतले नाही तर शेतकऱ्यांना ठरवून सुद्धा, आम्ही मागणी करून सुद्धा हमी भाव त्या पद्धतीने देऊ शकणार नाही. आपण हे स्वप्न शेतकऱ्यांना दाखविले आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, हे प्रतिज्ञापत्र मागे घेण्यासंबंधी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवून द्यावा. एकीकडे शेतमालाचे भाव सातत्याने कमी होत चालले आहेत, तर दुसरी उत्पादन खर्च वाढत आहे. यामुळे शेतीचे अर्थशास्त्र कोलमडून पडले असून शेतकरी व शेती डबघाईस आली आहे. असे असताना आज कापूस

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

उत्पादक शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाले आहे. सोयीबीन, धान उत्पादकांचे संपूर्ण पीक उद्ध्वस्त झालेले आहे. नागपूर संत्रा नगरी म्हणून ओळखली जाते. त्या संत्र्यांचा भाव देखील आज एकदम खाली आलेला आहे. आज संत्रा विकण्याच्या परिस्थितीत शेतकरी नाही. आज शेतकरी संत्रा रस्त्यावर टाकून देत आहे ही उदाहरणे आपण पहात आहोत. या सर्व शेतकऱ्यांना आपण आर्थिक मदत करणार आहात काय ? म्हणून माझी आज मागणी आहे की, कापूस उत्पादक, धान उत्पादक, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार इतकी आर्थिक मदत करावी. ही मदत केली तरच पुढच्या वर्षी शेतकरी काही तरी करू शकेल. त्याच्याकडे आज काहीच राहिलेले नाही. स्वतःच्या शरिरातील अवयव विकण्याच्या पलिकडे काहीच राहिलेले नाही. शेतकऱ्याच्या बायोकोकडे, त्याच्या पोरा-बाळाकडे स्वतःचे अवयव विकण्या खेरीज काहीच राहिलेले नाही. पुढच्या वर्षी पाऊस चांगला झाला तर त्याने पेरण्या कशा करायच्या ? त्यासाठी आपण काही तरी तरतूद केली पाहिजे. मायबाप सरकार म्हणून आमची माफक अपेक्षा आहे. शेतकऱ्यांची व्यथा आम्ही येथे मांडत आहोत. आज या परिस्थितीला सर्वात जालीम उपाय करावयाचा असेल, शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर कर्ज माफी द्यावी. सेनेच्या शब्दात मुक्ती द्यावी. आम्ही शेतकऱ्यांच्यावतीने जमले तर सरकारमधील सर्व माननीय मंत्र्यांचा, सरकारमधील सर्व आमदारांचा येथे भव्य सत्कार करू. आज येथे कर्जमाफीची घोषणा या सरकारन करावी अशी कळकळीची विनंती करतो आणि थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** अवकाळी पाऊस,गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट

**मु.शी.:** अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांच्या झालेल्या हानीमुळे राज्यातील शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट या विषयावर श्री.पांडुरंग फुंडकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.गोपीकिशन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री विजय गिरकर, महादेव जानकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो:-

"राज्यात माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ व माहे फेब्रुवारी-मार्च २०१५ मध्ये झालेला अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे खरीप व रब्बी पिकांची झालेली हानी, त्यामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेले आर्थिक संकट त्याचप्रमाणे मोठया प्रमाणात झालेली जिवीत व वित्तहानी, सर्वेक्षणाअंती शासनाने आपद्‌ग्रस्त शेतकऱ्यांना विशेष दराने दिलेली मदत व सवलती, त्यासाठी ५०० कोटीचे आर्थिक सहाय्य देणे, माहे एप्रिल, मे, जून २०१५ या कालावधीत गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीबाबत आपदग्रस्तांना आर्थिक मदत देण्याची कार्यवाही, राज्यातील बहुसंख्य भागात मोसमी पावसाच्या आगमनानंतर बराच खंड पडणे, अपुऱ्या पावसामुळे दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण होणे, पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होणे, चाऱ्याचा अभाव निर्माण होणे, कृषि क्षेत्रात रोजगार उपलब्ध करुन देणे, यासाठी शासनाकडून उपाययोजना करणे, यासाठी आर्थिक सहाय्य देणे त्यासाठी वाटप सुरु करणे, केंद्राकडून निधीची आवश्यकता असल्याने त्यादृष्टीने राज्य शासनाकडून सुरु केलेले प्रयत्न, राज्यात सातत्याने उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवर कायमस्वरुपी उपाययोजना करणे, शेतीविषयक सुधारित पीक विमा योजना लागू करणे, शेतकऱ्यांच्या जमीन आरोग्य पत्रिकांची अंमलबजावणी करणे,ठिबक सिंचन पध्दतीची प्रभावी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

अंमलबजावणी करण्यासाठी अनुदान वाढविणे, शेतकऱ्यांना बी-बियाणे व खतांचा पुरवठा नियमित व नियंत्रित दराने करणे, कृषि पंपासाठी वीज जोडणी देणे, कर्जाचे पुनर्गठन करणे, ग्रामिण नागरी भागात टंचाई निवारण कार्यक्रमासाठी प्रभावी उपाययोजना राबविणे, त्यासाठी निधी उपलब्ध करणे, दुष्काळग्रस्त भागात पर्जन्यवाढीसाठी क्लाऊड सिडींगचा प्रयोग करण्यासाठी निधी उपलब्ध करणे, टंचाईसदृष्य भागात चारा टंचाई निवारणार्थ तातडीने उपाययोजना करणे, आत्महत्या व आत्महत्या प्रवण क्षेत्रासाठी विशेष मदत व सहाय्य करणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाच्या विविध विभागांनी सर्वंकष सहभाग घेणे, अन्न सुरक्षा योजनेचा लाभ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील सर्व शेतक-यांना देणे, शेतमजूर, जे अन्न सुरक्षा योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, त्यांना समाविष्ट करणे, आरोग्य सुरक्षा सर्व शेतक-यांना उपलब्ध करणे, आत्महत्याग्रस्त क्षेत्रासाठी जिल्हास्तरीय / ग्रामस्तरीय समित्या गठीत करणे, बळीराजा चेतना अभियान यशस्वीपणे राबविणे, राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी नियोजन करण्याची, जलयुक्तशिवार अभियानाची तसेच कृषी सौरपंप शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे, इत्यादी सुविधा शासनाने देण्याची आवश्यकता व शासनाने केलेली उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

माननीय सभापती महोदय, आज सभागृहामध्ये विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्ष यांच्याकडून दोन प्रस्ताव आले होते. हे दोन्ही प्रस्ताव एकत्र करून माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी एकत्रित प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे. या प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे खरे आहे की, मागच्या वर्षी या राज्यामध्ये दुष्काळ पडला होता. यंदाच्या वर्षी आपल्या राज्यात पाऊस कमी झाला. पावसाळा सुरू झाला, खरीपाची पेरणी सुरू झाली. मग पावसाने उघाड दिला. त्यामुळे पेरलेले खरीपाचे संपूर्ण पीक जळून गेले. 40 ते 42 दिवसांची गॅप झाल्यानंतर काही शेतकऱ्यांनी दुबार पेरण्या केल्या. काही शेतकऱ्यांनी रब्बीची वाट पाहिली. पुन्हा पाऊस झाल्यानंतर रब्बीची पेरणी केल्यानंतर पावसाने पुन्हा गॅप दिला. त्यामुळे या राज्यात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली. राज्यात सरासरी 538.08 मिलीमिटर इतका पाऊस झाला. जवळपास 22 जिल्हे व 69 तालुक्यांमध्ये दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. यात जवळपास 50 लाख शेतकरी यात सापडलेले आहेत.

..6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांचे भाषण अतिशय मन:पूर्वक ऐकत होतो. श्री.धनंजय मुंडे सारखा विरोधी पक्ष नेता एका शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आलेला आहे. त्यामुळे सकारात्मक अशा प्रकारची दिशा सरकारला देण्याचा प्रयत्न ते त्यांच्या भाषणातून करतील अशी मला अपेक्षा होती. विरोधासाठी विरोध करणार नाही असे त्यांनी म्हटले. पण त्यांनी जे आरोप केले त्या सर्वांना हे सरकारच जबाबदार आहे असे नमूद केले आहे. महाराष्ट्रावर हे जे संकट आले आहे त्याला हे सव्वा वर्षाचे सरकारच जबाबदार आहे या अविर्भावात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे बोलत होते.

P-1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय,मी गेल्या 10-12 वर्षापासून या सभागृहाचा सदस्य आहे. आम्ही विरोधी पक्षात असताना दुष्काळाचे प्रसंग अनेकवेळा आले होते. विरोधी पक्षाच्या बाकावर बसून अशा प्रकारची भाषणे आम्ही देखील केली होती. परंतु ज्या वेळी राज्यावर अस्मानी संकट येते त्यावेळेस सत्ताधारी आणि विरोधी पक्षाने मिळून या राज्यातील जनतेला दिलासा देण्याचे काम करावयाचे असते. केवळ विरोधाला विरोध करुन चालणार नाही. आमचे सरकार सत्तेवर आल्याबरोबर राज्यावर दुष्काळाचे संकट आले. सत्तेचा कारभार सुरु करताच संकट आले. आपल्या राज्यावर 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. अशा परिस्थितीत सरकारला दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे याची कल्पना विरोधी पक्ष नेत्यांना सुध्दा आहे. असे असतानाही आमचे सरकार डगमगले नाही. आमच्या सरकारने दुष्काळापासून पळून जाण्याची भूमिका कधीही घेतली नाही. महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेला दिलासा आणि हिंमत देण्याचे काम युती शासनाने केलेले आहे. माननीय श्री.एकनाथराव खडसे सारखा नेता शेतकऱ्याच्या घरी जन्मला असून ते या राज्याचे महसूल आणि पुनर्वसन मंत्र्यांचे काम समर्थपणे सांभाळत आहेत. (अडथळा) माननीय खडसे साहेबांना शेतीचे संपूर्ण ज्ञान आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, मागच्या हिवाळी अधिवेशनात 4800 कोटी रुपयांचे पॅकेज शासनाने जाहीर केले व त्यातील 1000 कोटी रुपये दिलेच नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मागच्या हिवाळी अधिवेशनात 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज आणि आतापर्यंत शेतकऱ्यांना 8.5 हजार कोटी रुपयांची मदत दिलेली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मला सांगावयाचे आहे की, या शासनाने शेतकऱ्यांसाठी जे अनुदान जाहीर केले होते त्या अनुदानाच्या बाबतीत मी विचार मांडले होते. अनुदानाचे प्रस्ताव 4800 कोटी रुपयांचे होते व त्याचे पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत. सरकारने जे 3800 कोटी रुपयांचे वाटप केले आहे त्याचे देखील माझ्याकडे पुरावे आहेत. माझ्याकडे जे पुरावे आहेत ते सरकारकडूनच आलेले आहेत. चुकीचे रेकॉर्डवर जाऊ नये एवढीच माझी या प्रसंगी विनंती आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 3 हजार कोटीच्या व्यतिरिक्त आमच्या सरकारने शेतकऱ्यांना जो लाभ दिला तसेच केंद्र आणि राज्य सरकार म्हणून शेतकऱ्यांना जो काही लाभ दिला आहे त्याची माहिती मी या ठिकाणी देत आहे. यावर्षी शासनाने 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेल्या 14,608 गावामध्ये दुष्काळाची घोषणा केलेली आहे.

(**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील** )

सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी जामखेडच्या संदर्भात आरोप केलेला आहे. आणेवारी काढण्याची काही पध्दती आहेत. आणेवारीच्या संदर्भात गावाची समिती असते त्यामध्ये सरपंच,गावातील सोसायटीचा अध्यक्ष,पटवारी अशांची समिती तहसिलदार, कृषी अधीक्षकांना आणेवारीच्या संदर्भात शिफारस करते व ही शिफारस जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारला पाठवली जाते व त्यावेळेस राज्य शासन आणेवारी घोषित करीत असते. राज्य शासन ठरावीक गावांची किंवा तालुक्यांची आणेवारी कमी काढावी अशा प्रकारचे आदेश कधीही देत नसते. त्यामुळे अशा प्रकारचे आरोप करुन आणेवारी कमी करण्यासाठी प्रशासनाने दबाव आणला असे आजपर्यंत तरी आपल्या महाराष्ट्रात घडलेले नाही. राज्यातील 14 हजार गावात शासनाने दुष्काळ घोषित केलेला आहे.

ज्या ज्या गोष्टी शासनाला निर्णयाप्रमाणे करावयाच्या असतात त्या त्या गोष्टी प्राधान्याने केल्या जात असतात. आजचा विरोधी पक्ष जेव्हा सत्तेमध्ये होता तेव्हा त्यांनीही हेच केले होते. शेतकऱ्यांना फायदा व्हावा म्हणून या शासनाने काही घोषणा ताबडतोब केल्या आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांची फी माफी असेल,शेतसारा माफी असेल, कर्जाचे पुनर्रगठन असेल, ओबीसीची सवलत असेल, वीज बिलात 33 टक्के सवलत असेल अशा प्रकारच्या घोषणा शासनाने करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्या त्या प्रकारचे शासन निर्णय काढण्यात आले. या सवलती शासनाने दुष्काळ घोषित झाल्याबरोबर ताबडतोब लागू केल्या होत्या.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. आम्हाला या विषयावर आमचे विचार मांडावयाचे आहेत.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित .....

परंतु सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. मंत्री महोदय ज्या प्रकारे उत्तर देतात त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेब उत्तर देत आहेत. मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठी काही तरी राहू द्यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी चर्चेला उत्तर देत नसून आमच्या सरकारने केलेल्या कामांची माहिती मी या ठिकाणी देत आहे. आम्ही सत्तेमध्ये आहोत त्यामुळे आम्ही तुमच्या सारखे सरकारवर आरोप करावयाचे काय ?

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील** ) : सन्माननीय सदस्यांना त्यांचे भाषण पूर्ण करु द्यावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या विषयावरील चर्चेला मी परवा उत्तर देणार आहे. विधानसभेत पुरवणी मागण्यावर उत्तर देण्यासाठी आपली परवानगी असेल तर मी जाऊ शकतो काय ?

**तालिका सभापती :** ठीक आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : आमच्या सरकारने दुष्काळाच्या संदर्भात कोणकोणती कामे केलेली आहेत त्याची माहिती ठरावात असून त्यानुसार मी माझे विचार व्यक्त करीत आहे. (अडथळा) सरकारने जे जे निर्णय घेतले त्याची माहिती ठरावात असून ती माहिती मी देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय सदस्य श्री.फुंडकर साहेब ठरावात उल्लेख असल्यामुळे मी माहिती देत आहेत असे सांगत आहेत परंतु ठरावात अशा प्रकारची कोणतीही माहिती नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सरकाने जे जे निर्णय घेतले आहेत त्याची माहिती मी या ठिकाणी देत आहे. आमच्या सरकारने कर्जाचे पुनर्रगठन केलेले आहे. (अडथळा)

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंगजी फुंडकर दुष्काळाच्या विषयावर आपले विचार व्यक्त करीत असून त्यांना आपले विचार व्यक्त करताना अडवू नये. (अडथळा) सन्माननीय सदस्यांना त्यांचे विचार मांडू द्यावेत, सर्वांनी शिस्तीचे पालन करावे एवढीच माझी आपल्या सर्वांना विनंती आहे.

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही सत्तेमध्ये बसलो आहोत, आम्ही आपल्या सारखे सरकारवर आरोप करावयाचे काय ? ठरावात जे आहे तेच मी या ठिकाणी मांडत आहे. (अडथळा) विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यास मंत्री महोदय समर्थ आहेत. दुष्काळाच्या परिस्थितीत शासनाने कोणकोणती कामे केली त्याची माहिती आम्ही या ठिकाणी द्यावयाची नाही काय ? अशा प्रकारे आम्हाला बोलू दिले जात नसेल तर मी खाली बसतो. आमच्या सरकारने वर्षभरात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जे जे निर्णय घेतले ते आम्ही सांगावयाचे नाही काय ?

Q-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

शेतकऱ्यांच्या आत्महत्या आपल्या सरकारच्या काळातही झालेल्या आहेत. मला त्याबद्दल बोलायला लावू नका. मी शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल कितीही बोलू शकतो. आपण आम्हाला कशाला सांगता ?

सभापती महोदय, शेतकऱ्यांवर अशी वेळ येण्याचे कारण काय, याचा विचार येथे झाला पाहिजे. पण् त्याबाबत विचार होत नाही. या ठिकाणी आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. नागपूरच्या अधिवेशनात अशाच प्रकारच्या चर्चा होतात, आरोप प्रत्यारोप केले जातात. देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाल्यानंतर देखील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले नाही, त्यांना वीज मिळाली नाही, त्याच्या शेतमालाला भाव मिळाला नाही. त्यांच्यासाठी मार्केटींगची व्यवस्था झालेली नाही, यावर कोणीही बोलत नाही. या सरकारने कार्यक्रम हाती घेतला आहे(अडथळा).. आपण काहीही बोलले तरी चालते काय, आपण कोणाही वर टीका केली तर चालते का ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी जे बोललो ते पुराव्यानिशी बोललो, त्याचे पुरावे आपल्याकडे दिलेले आहेत. मी दिलेले पुरावे चुकीचे असतील तर आपण मला जी शिक्षा द्याल, ती शिक्षा घेण्यास मी तयार आहे. मी येथे उपस्थित केलेले मुद्दे सरकारने खोडावेत. सन्माननीय सदस्यांना माझे मुद्दे खोडायचे असतील तर त्यांनी ते जरूर खोडावेत. सन्माननीय सदस्य हे देखील शेतकऱ्यांच्या चळवळीतून आलेले आहेत. आपण देखील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडाव्यात अशी आमची अपेक्षा आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 चा जो प्रस्ताव येतो त्यामध्ये सरकारकडून काय अपुरेपणा पडलेला आहे हे दोन्ही बाजुने मांडण्याचा प्रयत्न होतो. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी सत्ताधारी पक्षाच्या बाजूने प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावामध्ये काय करायला पाहिजे ते दिलेले आहे. मी त्यातील सर्व मजकूर वाचत बसलो तर आणखी वेळ जाईल आणि सन्माननीय सदस्यांच्या भाषणाची लिंक देखील तुटेल. मी याठिकाणी निश्चितपणे सांगतो की, सरकार काय करणार आहे हे सांगण्याचा अधिकार सन्माननीय सदस्यांना नाही. त्याबाबत सरकार सांगू शकते. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून अतिशय प्रभावीपणे काम केलेले आहे. सरकारने जे काम केले असेल तर ते अजून चांगले केले पाहिजे. जे झालेले आहे ते आम्हाला माहीत आहे. आपण आमदार म्हणून त्या योजना राबवित असतो. आपण मराठवाड्याच्या जवळ राहता. मी स्वतः राज्यात फिरत आहे ते मी माझ्या भाषणात सांगेन. आपल्याकडून महाराष्ट्राच्या वेगळ्या अपेक्षा आहेत. सरकारला या योजनांची अंमलबजावणी आणखी कशाप्रकारे प्रभावीपणे करता येईल हे आपण सत्ताधारी पक्षाच्या ठरावामध्ये मांडू शकता.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. सन्माननीय सदस्य भाषण करीत आहेत. आपण अशाचप्रकारे एक-दुसऱ्यांबद्दल बोलत राहिलो तर ही चर्चा संपणार नाही. प्रत्येकाला बोलण्यासाठी वेळ दिला पाहिजे. अजून काँग्रेस पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, आपण देखील यावर बोलणार आहात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण हा विषय क्लब केलेला आहे.

**तालिका सभापती :** माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी विषयावर चर्चा करावी. आपण कशासाठी आपसात डिबेट करीत आहात ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी माझ्या बोलण्याचा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. मला बोलण्याचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आम्ही अशा अशा पद्धतीने बोलावे, याचा अर्थ आम्ही सरकारवर टीका करायची काय ? हे सरकार वर्षभर जे काम करीत आहेत ते आम्ही मांडायचे नाही काय ?

सभापती महोदय, मागील वर्षीप्रमाणे या वर्षी देखील भयानक दुष्काळ पडलेला आहे. जवळपास 22 जिल्ह्यांतील 69 तालुक्यांतील 14 हजार गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. दुष्काळ पडल्यानंतर सरकारला ज्या ज्या उपायोजना करावयाच्या असतात त्या उपाययोजना सरकार करीत असते. कोणतेही सरकार सत्तेवर असले तरी घोषणा होत असतात. मग त्यामध्ये विद्यार्थ्यांची फी माफी असेल, शेतसारा माफी असेल, कर्जाचे पुनर्गठन असेल, विद्युत बिलात सवलत असेल, व्याजमाफी असेल अशाप्रकारच्या घोषणा होत असतात. पण या घोषणा तात्पुरत्या स्वरुपाच्या असतात. दुष्काळावर कायम स्वरुपी उपाय योजना करुन महाराष्ट्राला

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

दुष्काळाच्या छायेतून बाहेर काढले पाहिजे आणि अश्ा पद्धतीची चर्चा येथे झाली पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी होत आहे. सन 2007-2008 मध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली. ही कर्जमाफी कशा पद्धतीने झाली हे आपणास माहीत आहे. मराठवाड्यामध्ये किती कर्ज माफ झाले, विदर्भात किती कर्ज माफ झाले आणि पश्चिम महाराष्ट्रात किती कर्ज माफ झाले याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडीत बोलले होते. आपण 70 हजार कोटी रुपयांचा आकडा सांगता. त्यावेळी महाराष्ट्राच्या वाट्याला फक्त 7 हजार कोटी रुपये आले. हे सात हजार कोटी रुपये वाटत असताना दोन हेक्टरच्यावरील शेतकऱ्यांला कर्जमाफी मिळणार नाही अशाप्रकारची अट टाकण्यात आले. विदर्भामध्ये छोट्या तुकड्यांची शेती फार कमी आहे. विदर्भातील शेतकरी हे मध्यम स्वरुपातील शेतकरी आहेत. त्या ठिकाणी 10 एकर 20 एकराची शेती होती. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश शेतकरी हे दोन हेक्टरच्या आत शेती असणारे शेतकरी आहेत. तेथील शेतकऱ्यांचे 10 लाख रुपयांचे कर्ज माफ झाले आणि विदर्भातील शेतकऱ्यांचे फक्त पाच हजार, दहा हजार रुपयांचे कर्जमाफ झाले. या कर्जमाफीतून शेतकऱ्यांनी काय मिळविले ? आज दोन-चार वर्षानंतरही शेतकऱ्यांची परिस्थित् तशीच आहे. कर्जमाफी करुन शेतकरी सुखी होईल हे मान्य करणारा मी कार्यकर्ता नाही. आपणास शेतकऱ्यांना सुखी करायचे असेल तर शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे, त्याला वीज मिळाली पाहिजे, त्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पहिजे आणि त्याच्यासाठी मार्केटींगची योग्य व्यवस्था केली पाहिजे. या चार गोष्टी सरकारने केल्या तर सरकार कोणत्याही पक्षाचे असो शेतकऱ्यांवर कर्जमाफीची मागणी करण्याची पाळी कधीही येणार नाही. या सरकारने तसा विचार करण्यास सुरुवात केली. या सरकारने शाश्वत स्वरुपाच्या शेतीची कल्पना मांडली. पूर्वी सुद्धा पाणलोट क्षेत्र होते, सिमेंट बंधारे होते, सिंचनाच्या व्यवस्था होत्या. मागील 15 वर्षात सिंचनावर 70 हजार कोटी रुपये खर्च झाले. परंतु फक्त एक टक्का सिंचन झाले. असे जर होत असेल तर शेतकरी सक्षम कसा होईल ? या सरकारने जलयुक्त शिवार योजना आणली. या योजनेमध्ये 25 हजार गावांचे

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

टार्गेट ठेवण्यात आले आह. या योजनेमध्ये दरवर्षी पाच हजार गावे घेण्यात येतील. त्यानुसार पाच हजार गावांमध्ये कार्यक्रम सुरु करण्यात आला. नमुन्यादाखल काही बंधारे बांधले गेले.शेततळे बांधण्यात आले, पाणलोट क्षेत्राची कामे झाली. या कामामध्ये लोकांचा सहभाग घेण्यात आला. लोकांना पाण्याचे महत्व पटवून देण्यात आले. "पाणी अडवा, पाणी जिरवा" हे महत्व लोकांना पटवून देण्यामध्ये हे सरकार यशस्वी झाले. या योजनेमध्ये लोकांनी 250 ते 300 कोटी रुपये खर्च केले अशाप्रकारे जलयुक्त शिवार योजनेस सुरुवात झाली. जलयुक्त शिवार योजनेचा आढावा घेण्यात आला त्यावेळी 24 टीएमसी पाणी अडविण्यात आल्याचे दिसून आले. राज्यामध्ये असंख्य बोअर काढण्यात आल्यामुळे पाण्याची पातळी 700 फूट खाली गेली होती. ज्या ठिकाणी जलयुक्त शिवार योजनेचा कार्यक्रम हाती घेण्यात आला त्या ठिकाणी पाण्याची पातळी वर येऊन 20 ते 25 फूटावर पाणी लागत आहे. त्यामुळे आज शेतकरी सिंचन करायला लागला आहे.

यानंतर R-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी चुकीचे बोलणार नाही. आमच्या सरकारने ज्या ज्या गावात ही योजना राबविली त्या गावांमध्ये पाण्याची पातळी वाढलेली आहे. आमच्या भागात सुध्दा ही योजना राबविल्यामुळे पाण्याच्या पातळीत वाढ झालेली आहे. त्यामुळे हा कार्यक्रम राज्य सरकार मोठ्या प्रमाणावर राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्य सरकारने अशाचप्रकारे हा कार्यक्रम राबविला तर राज्यातील किमान 25 हजार गावातील दुष्काळ दूर करण्याचा कार्यक्रम निश्चितपणे यशस्वी होईल.

सभापती महोदय, अगोदरच्या सरकारने 2011 पासून शेतकऱ्यांना वीज कनेक्शन दिले नाही. अगोदरच्या सरकारच्या काळातील लाखो कनेक्शन पेंडींग होते. परंतु आमचे सरकार आल्यानंतर ही परिस्थिती बदलली. आमच्या सरकारकडून 2014 पर्यंतचे कनेक्शन देण्याचे काम जवळजवळ पूर्ण केले आहे. मागच्या सरकारने चुकीचे आणि जळालेले ट्रान्सफॉर्मर खरेदी केले होते. त्या संदर्भात आमच्याकडून आरोप सुध्दा झाला होता. एवढेच नव्हे तर चौकशीची मागणी सुध्दा झाली. परंतु एवढे सर्व होऊन सुध्दा त्या सरकारने या विषयी चौकशी केली नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर अशा पध्दतीने आरोप करीत असतील तर ते योग्य नाही. अगोदरच्या सरकारने जळालेले ट्रान्सफॉर्मर खरेदी केले असे जर ते सांगत असतील तर ते कदापि योग्य नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. या खरेदीबाबत सभागृहात अनेक आरोप झाला होता. चौकशीची मागणी सुध्दा करण्यात आली होती. मी पुन्हा सांगतो की, जळालेले ट्रान्सफॉर्मर डेपोमध्ये आले होते.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या ठिकाणी रेकॉर्डवर चुकीचे येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, या सभागृहात आरोप झाला होता आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयी चौकशीची सुध्दा मागणी केली होती. आपण चौकशी केली काय ?

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, संबंधित एजन्सीकडून एखादा ट्रान्सफॉर्मर फ्रिक्वेंट फेल्युअरमध्ये आला आणि तो परत गेला असेल तर ते सरकारने केले असे कसे म्हणता येईल ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, बहुतांश ट्रान्सफॉर्मर जळालेले आले होते. आम्ही चौकशीची मागणी केली होती आणि सरकारने



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सुध्दा चौकशी मान्य केली. त्या चौकशीचे पुढे काय झाले ? सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित मला वाटते आपण जे खरे आहे ते मान्य करावयास पाहिजे.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, सन्माननीय सदस्य हे प्रस्तावाचा विषय सोडून बोलत आहेत. मला वाटते त्यांनी प्रस्तावावर बोलावयास पाहिजे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कृपया आपण शांत बसावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या काळात ट्रान्सफॉर्मरच्या खरेदीसंदर्भात चौकशीची मागणी झाली होती. या विषयी आरोप सुध्दा झालेले होते. त्यामुळेच मी तो विषय या ठिकाणी मांडला. सभापती महोदय, मागेल त्या शेतकऱ्याला विजेचे कनेक्शन दिले पाहिजे. पूर्वीच्या सरकारच्या काळातील 2011 पासूनचे विजेचे कनेक्शन प्रलंबित होते हे खरे नाही काय ? शेतकऱ्यांनी 2011 पासून वीज कनेक्शनचे पैसे भरले होते. त्यांनी पैसे भरुन सुध्दा त्यांना कनेक्शन का दिले नाही ? परंतु आमच्या सरकारने 2011 सालापासूनचा अनुशेष दूर करीत करीत तो अनुशेष 2014 पर्यंत आणला आहे. या बाबी आम्ही सांगावयास नको काय ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय,....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सदस्य जर मला बोलूच देणार नसतील तर मी खाली बसतो. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सरकारवर जे काही आरोप करतील त्याला आमचे मंत्री महोदय उत्तर देतील. शेतकऱ्यांना ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या देण्याचा आमचे सरकार प्रयत्न करीत आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, दुष्काळावर मात करण्यासाठी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाने एकत्रित येऊन सर्वंकष कार्यक्रम तयार केला तर महाराष्ट्रावर पुढे येणारे संकट कमी होऊ शकते.

श्री.अमरसिंह पंडित : आपण सरकारच्या अभिनंदनाचा ठराव मांडा ना.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जर मला बोलूच द्यावयाचे नसेल तर मी खाली बसतो. अगोदरच्या सरकारने जी कामे केली होती ती तुम्ही सांगितली आणि आम्ही सुध्दा ती ऐकली. आमच्या सरकारने जे काम केले ते मी सांगत आहे. परंतु सन्माननीय सदस्य वारंवार माझ्या भाषणात व्यत्यय आणत आहे. त्यामुळे मला वाटते मी खाली बसणेच योग्य राहील.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सभागृहातील ज्येष्ठ सदस्य प्रस्तावावर आपले विचार मांडत आहेत. सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलणे योग्य नाही. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य बोलत असताना आपण अशाप्रकारे मध्ये मध्ये बोलणे योग्य नाही. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, कृपया त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी कोणत्याही विषयात वारंवार हस्तक्षेप करुन बोलणारा नाही. पक्षाने संधी दिली तरच मी बोलतो. मी या सभागृहात गेल्या 13 वर्षांपासून सदस्य म्हणून काम करीत आहे. आमच्या सरकारने जे काम केले आहे ते अशा वेळी मांडणार नाही तर मग कधी मांडणार, आम्ही आमच्या सरकारच्या विरोधात बोलणार काय ? काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार असताना सुध्दा त्या त्या पक्षाचे सन्माननीय सदस्य सरकारने केलेली कामे सभागृहाच्या निदर्शनास आणून देत होते. परंतु आम्ही त्यावेळी अशा प्रकारचा व्यत्यय आणत नव्हतो. सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सदस्य वारंवार माझ्या भाषणात व्यत्यय आणत असल्यामुळे मी खाली बसतो. मी आता बोलणार नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना विनंती आहे की, आपले विचार आम्हाला खूप महत्त्वाचे वाटतात. त्यामुळे आपण या प्रस्तावावर जरुर बोलावे. या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने सर्व प्रश्नाकडे बघण्याचा आपला जो दृष्टिकोन आहे त्याचा शासनालाच फायदाच होईल हे आम्हाला मान्य आहे. त्यामुळे आपण आपले भाषण थांबविता कामा नये. आपण आपले भाषण पुढे सुरु ठेवावे. आपल्या भाषणात आम्ही अडथळा आणणार नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य बोलत असताना विरोधी पक्षाकडून मध्ये मध्ये बोलले जाते. पूर्वी सुध्दा असेच होत होते. त्यामुळे त्यांनी ही बाब मनावर न घेता आपले भाषण पुढे सुरु करावे. शिवाय सन्माननीय सदस्य ज्या भागात शेतकरी सर्वात जास्त आत्महत्या करतात त्या भागातील आहेत. ते ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यामुळे त्यांनी बोलताना केवळ शासनाची बाजू न मांडता दोन्ही बाजूने विचार मांडावेत, अशी माझी विनंती आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा सीमित आहे. सदरहू चर्चा दुष्काळावरील आहे, आत्महत्येवरील आहे, शेतकऱ्यांच्या जमिनीबाबतची आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींच्या बाहेर जाऊन चर्चा करण्याची आवश्यकता नाही. मोदी चाय किंवा अच्छे दिन-बुरे दिन, यावर चर्चा होता कामा नये. नाही तर आम्हाला सुध्दा असे अनेक विषय मांडता येतील. जर विरोधी पक्षाच्या सदस्यांना खरोखरच राज्यातील दुष्काळाचे गांभीर्य असेल तर या विषयावरील चर्चा गांभीर्यानेच झाली पाहिजे.

सभापती महोदय, हा देश कृषी प्रधान देश आहे. या देशातील महाराष्ट्र हे एक राज्य आहे. महाराष्ट्र राज्यात सुध्दा 70 टक्के लोक हे शेती करतात. प्रत्येक जण शेतकऱ्याचा मुलगा असल्याचा दावा करतो. आम्ही सुध्दा शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलो आहोत. आम्ही गेल्या 50 वर्षांपासून शेतकऱ्यांचे दु:ख पाहत आहोत. परंतु अजूनपर्यंत या शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा का होऊ शकली नाही, या बाबत मी अनेक वेळा विचार करीत असतो. मी स्वतः कोरडवाहू शेतकरी आहे. माझ्याकडे बागायती शेती नाही. माझी शेती खारपाण पट्ट्यातील आहे. शेतकऱ्यांचे मूळ दुखणे काय आहे, हे मला चांगलेच माहीत आहे. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या गेल्या 15 वर्षातच वाढल्या काय ? नाही. पूर्वी सुध्दा आत्महत्या होत होत्या. परंतु त्यावेळी ते समजत नव्हते. कृषी प्रधान देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिले प्राधान्य हे शेतीला द्यावयास पाहिजे होते, असे माझे व्यक्तिगत मत आहे. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचा विचार करावयास पाहिजे होता, त्यांच्या विजेचा विचार करावयास पाहिजे होता. एवढेच नव्हे तर शेती मालाच्या भावाचा आणि बाजारपेठेच्या व्यवस्थेचा विचार करावयास पाहिजे होता. परंतु दुर्दैवाने या देशात गेल्या 65 वर्षात या बाबींचा कोणीच विचार केला नाही. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून योजना आखल्या गेल्या नाहीत. त्यामुळेच आज ही परिस्थिती निर्माण झाली. परिणामी, शेतकरी आत्महत्या करीत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे दु:ख केवळ विरोधी पक्षाच्या सदस्यांना आहे आणि आम्हाला नाही, असे नाही. आम्हाला सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे दु:ख आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयावर आम्ही आणि माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब तासनतास भाषण करीत होतो. या बाबत आम्ही अनेक उदाहरणे आणि पुरावे देत होतो. आम्ही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी जात होतो. पूर्वी आत्महत्येची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

कारणे शोधण्यासाठी समित्या गठीत केल्या गेल्या. त्या समित्यांनी आपापले अहवाल दिले. परंतु तरी सुध्दा आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्यास तयार नाहीत. त्यामुळे शेतकरी नेमके कशामुळे आत्महत्या करतात याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. तसेच या आत्महत्या थांबविण्यासाठी उपाय सुध्दा शोधण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील सिंचनाच्या व्यवस्थेची टक्केवारी देशाच्या तुलनेत खूपच कमी आहे. त्यामुळे सर्वप्रथम या राज्यातील सिंचनाची टक्केवारी वाढविली पहिजे.

..एस..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

मग त्यासाठी प्रलंबित असलेली धरणे पूर्ण झाली पाहिजेत. आमच्या विदर्भातील गोसीखुर्द सारखा प्रकल्प वर्षांनुवर्षे सुरूआहे, तो पूर्ण होण्यास तयार नाही. आमच्या विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील जीगाव प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली त्यावेळी त्याची किंमत 300 कोटी रूपये होती. आज त्याची किंमत 6 हजार कोटी रूपये झाली आहे. प्रकल्प अजून 20 टक्के सुध्दा पूर्ण झालेला नाही. धरणे बांधली गेली नाहीत. त्यामुळे विदर्भातील, मराठवाड्यातील, खानदेशातील सिंचन वाढले नाही. सिंचन न वाढल्यामुळे शेतकऱ्याला निसर्गाच्या भरवश्यावर अवलंबून रहावे लागले. निसर्गाच्या भरवशावर शेती करावी लागली. सिंचनाबरोबर विद्युत पुरवठाही झाला नाही. उत्पादन वाढवायचे असेल तर पाणी पाहिजे. काही ठिकाणी विहिरीत पाणी आहे. पण शेतकऱ्यांच्या पंपाला वीज कनेक्शन नाही. वीज कनेक्शन सन 2011 पासून आहे. दुबार पीक घेण्याचा शेतकरी प्रयत्न करीत आहे. पण वीज कनेक्शन नसल्यामुळे तो शेतीला पाणी देऊ शकत नाही, पीक काढू शकत नाही. त्यामुळे शासन त्या दृष्टीने प्रयत्नाला लागले आहे. मी काही पुन्हा निर्णय जाहीर करणार नाही. पण प्रयत्न आहे हे तरी मला सांगता येईल का ? माननीय मुख्यमंत्री सांगत आहेत, माननीय महसूल मंत्री सांगत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी संकल्प केला आहे. आता आम्हाला आशा करायला काही हरकत नाही. इतके दिवस झाले नाही. सन 2015 पर्यंत किमान जो मागेल त्याला वीज कनेक्शन मिळेल ही आनंदाची गोष्ट आहे. जल शिवार योजनेच्या माध्यमातून संकल्प झाला आहे, तो पूर्ण झाला तर खूप चांगले होईल. मी निश्चितपणे सांगतो की, सुकथनकर समितीचा अहवाल दिला होता, त्यातील 87 तालुक्यांतील दुष्काळाची स्थितीसुध्दा दूर होऊ शकते, अशा पध्दतीचा एक महत्वकांक्षी कार्यक्रम राज्यात जाहीर केला आहे. अंमलबजावणी झाली पाहिजे. सत्ताधारी व विरोधी दोघांनी मिळून अंमलबजावणी केली पाहिजे. आज आमचे राज्य आहे, उद्या तुमचे येईल, परवा आमचे येईल. राज्याला सुजलाम-सुफलाम करायचे असेल तर निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. त्यामुळे ती अंमलबजावणी झाली पाहिजे. मी पुन्हा सांगतो की, नुसती कर्जमाफी करून शेतकऱ्यांचे भले होईल हे मानणाऱ्यांपैकी मी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

शासनाने सर्व पैसा एकत्र करून कर्जमाफी करून टाकली, बाकी काही केले नाही तर चालणार आहे का, दुष्काळात शेतकरी जगेल का ? शेतमजुराच्या हाताला कामे नाहीत. जनावरांना चारा नाही. जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था झाली पाहिजे, चारा छावण्या उघडल्या पाहिजेत, जेथे चाऱ्याची तीव्र टंचाई आहे तेथे छावणीची व्यवस्था झाली पाहिजे.

सभापती महोदय, मनरेगाच्या कामाला आता अधिक गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मी यावर समाधानी नाही. मनरेगाचा पैसा जसाच्या तसा प्रत्येक जिल्ह्याला पडून आहे. कोणताही अधिकारी मनरेगाचे काम करण्यास उत्सुक नाही अशा प्रकारची स्थिती ग्रामीण भागात दिसत आहे. मनरेगाच्या पैशातून विकास, जल शिवार योनजेच्या माध्यमातून कामांची जोड मिळाली तर विकास चांगला होईल. पाणी अडवा, पाणी जिरवा या पध्दतीने सर्व बाजूंनी शेतकऱ्याला केंद्र बिंदू मानले पाहिजे आणि सर्व योजना शेतकऱ्याला केंद्रीत करून राबविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे आणि तोच प्रयत्न शासन करण्यास निघाले आहे. मला अपेक्षा आशा आहे. मी काही फार बोलणार नाही. शासनाने 3 गोष्टी केल्या पाहिजेत की, शेतकऱ्याला पाणी दिले पाहिजे, वीज दिली पाहिजे आणि शेतकऱ्याच्या मालाला भाव दिला पाहिजे. कापसाचा भाव 3800 रुपये आहे. मी सन 1995-96 मध्ये कॉटन फेडरेशनचा अध्यक्ष होतो. त्यावेळी कापसाचा भाव 1400 रुपये होता. त्यावेळी आदरणीय, वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी राज्याला निवडणुकीमध्ये शब्द दिला होता की, आमचे सरकार आले तर शेतकऱ्याला 2100 रुपये भाव देऊ. सरकार आले. कॉटन फेडरेशनची खरेदी सुरू झाली. मी त्यावेळी कॉटन फेडरेशनचा अध्यक्ष होतो. सरकारने 1400 रुपये भाव काढला. मी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहरपंत जोशी आणि गोपीनाथ मुंडे साहेबांना सांगितले आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या कानावर टाकले की, आपण राज्यातील जनतेला शब्द दिलेला आहे. त्यामुळे कापसाला 2100 रुपये भाव द्या. 700 रुपये बोनस ॲडव्हान्स देऊन त्यावेळी 2100 रुपयांत आम्ही कापूस खरेदी केला. दीड कोटी क्विंटल कापसाची खरेदी आम्ही पहिल्या वर्षी त्यावेळी केली होती. कापसाच्या भावाची तफावत असेल. मला असे वाटते की, आज सीसीआय कापूस खरेदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3

श्री. पांडुरंग फुंडकर ....

करत आहे. 3800 रुपये मार्केटमधील भाव आहे. राज्यात सीसीआय 4100 रुपयांनी कापूस खरेदी करीत आहे. फेडरेशन खरेदी करीत आहे. हे खरे आहे की, उत्पादन खर्चावर तो भाव नाही. सांगितले जाते की, कापसाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये मंदी असल्यामुळे कापूस चढ्या भावाने कोणी घेऊ शकत नाही आणि घ्यायचा असेल तर शेतकऱ्याला सरकारकडून त्याचे अनुदान देऊन त्या भावाची पूर्तता केली पाहिजे. शासन दुष्काळाशी सामना करीत आहे त्याप्रमाणे इतर गोष्टीशीही सामना करत आहे. शासन विचार करत आहे की, कापसाला काही भाव वाढवून दिला पाहिजे. सोयाबीन किंवा अन्य पिकेही असतील. राज्यात दुष्काळाला दुसरा पर्याय असू शकत नाही. शासनाने त्या दृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. शासन तसे चालत आहे. 60 वर्षांचे पाप दीड वर्षांत धुतले जाईल अशी अपेक्षा असेल तर ती काढून टाकावी. मोदी चाय पे चर्चावर बोलले. मोदींना 5 वर्षे द्या. एका वर्षात सर्व अपेक्षा पूर्ण होणार नाहीत. मोदीजींनी एका वर्षातच सर्व केले पाहिजे हे वारंवार मांडत जाऊ नका. 5 वर्षे वाट पहा. तुम्हाला पुन्हा तक्रार करण्याची संधी मिळणार नाही. तुम्ही पुन्हा मोदींवर बोलण्याचाही कधी प्रयत्न करणार नाही. सरकारने अनेक घोषणा केल्या. मला अडविले नाही तर मी तासभर शासनाने काय केले हे सांगू शकलो असतो. सन्माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे, पुढील वेळी हे मी लक्षात ठेवणार आहे की, तुम्ही सुध्दा सरकारबद्दल काय बोलणार आहे. मी तुमच्या भाषणावर लक्ष ठेवणार आहे. मी अडविणार आहे. शासन या पध्दतीने पुढे चालले आहे. सरकार अतिशय चांगल्या पध्दतीने पावले टाकत आहे. सरकारने राज्यातील जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. मी सरकारचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज संपूर्ण् राज्यातील शेतकऱ्यांच्या अत्यंत महत्त्वाच्या, जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा होत आहे. आम्ही सदनात नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव अधिवेशनाच्या पहिल्या दिवसांपासून सातत्याने सदनामध्ये मंडत आहोत. संपूर्ण राज्यात विशेषत: विदर्भ, मराठवाडा, खानदेश येथे शेतकऱ्यांवर प्रचंड आपत्ती आलेली आहे. विदर्भात नागपूरला अधिवेशन होत या महत्त्वाच्या प्रश्नावर सर्वप्रथम चर्चा झाली पाहिजे. मागील वेळी 2-3 दिवस चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी व विधानपरिषदेच्या माननीय नेत्यांनी अंतिम उत्तर दिले, त्यामधून कोणत्याही सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही, शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे यावेळी सातत्याने आम्ही मागणी करत होतो की, आपण सर्वप्रथम आपली भूमिका जाहीर केली पाहिजे, शेतकऱ्यांना काय मदत देणार आहात या संदर्भात सूतोवाच केले पाहिजे. कर्जमाफीच्या संदर्भात भूमिका जाहीर केली पाहिजे. मात्र शासनाकडून त्यावेळी उत्तर मिळत नव्हते. त्यामुळे नाईलाजाने 4-5 दिवस सदनातील कामकाज थांबवावे लागले. शेतकऱ्यांचा अत्यंत महत्त्वाचा, जीवनमरणाचा विषय असल्यामुळे या संदर्भात 5 दिवस सदनाचे कामकाज होऊ शकले नाही. परंतु आज विधानपरिषदेचे माननीय सभापती यांनी बैठक बोलाविली आणि त्यामध्ये शासनाने सुध्दा विरोधी पक्षाची मागणी आहे त्या संदर्भात सकारात्मक असावे, त्याला उत्तर त्या पध्दतीने द्यावे असे सांगून आज चर्चेला सुरुवात झाली. आम्ही मोठ्या अपेक्षेने चर्चेला सुरुवात केली आहे.

....T

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.........

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपल्या भाषणात नाराजी व्यक्त केली. आम्हाला ज्यावेळी असे वाटले की, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे एकतर्फी बोलत आहेत, त्यावेळी आमच्यातील काही सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला. खरे पाहिले तर सन्माननीय सदस्य श्री.फुंडकर यांना नाराज होण्याचे काही कारण नव्हते. परंतु, त्यांनी त्यांच्या भाषणाच्या शेवटी असे सांगितले की, ज्यावेळी आपले सरकार सत्तेवर येईल तेव्हा आम्ही देखील अशाच प्रकारचे प्रश्न विचारू.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी असे बोललो नाही.

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** हे वक्तव्य मी तपासून घेईन.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य तपासून घ्यावे आणि ते तसेच असेल तर सन्माननीय सदस्यांनाही सांगावे.

सभापती महोदय, प्रत्येक सदस्य आपल्या विभागातील माहिती गोळा करीत असतो आणि ती सभागृहासमोर ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. या राज्याचा विचार केला, भौगोलिक परिस्थितीचा विचार केला, राज्यातील शेतीमालाच्या उत्पादनाचा विचार केला तर प्रत्येक भागाची परिस्थिती वेगळी आहे, वातावरण वेगळे आहे आणि त्यामुळे त्या भागात शेतकऱ्याला उत्पन्न का मिळाले नाही, त्याची अशी हलाखीची परिस्थिती का निर्माण झाली, याचा सर्वंकष अभ्यास होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, आमचे सरकार लाँग टर्म प्रोग्रॅम तयार करीत आहे. निश्चितपणे येणाऱ्या पिढीला त्याचा फायदा होईल. सरकारने भविष्याचा विचार करून एखादा चांगला कार्यक्रम हाती घेतला असेल तर त्याबाबत वेगळे मत असण्याचे काही कारण नाही. परंतु, ज्यावेळी राज्यावर आपत्ती येते, राज्यात दुष्काळ पडतो, आर्थिक परिस्थिती हलाखीची झाल्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी आत्महत्या करतात, त्यावेळी सरकारची ही जबाबदारी असते की, माझ्या राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहे, त्याची झळ मला पोहोचत आहे, त्याला काय मदत हवी आहे, कशाची गरज आहे, हे लक्षात घेऊन मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आजच्या परिस्थितीत असा हात पुढे करण्याची गरज असताना लाँग टर्म

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

प्लॅनचे स्वप्न आपण त्यांना दाखवित आहोत. गुड गव्हर्नन्सच्या नावाखाली हे सरकार सत्तेवर आले. परंतु, आज प्रशासनाचे जे धिंडवडे निघत आहेत, ते बघितले तर त्यावर आपण या सभागृहात वेगळी चर्चा करु शकू. मला असे विचारावयाचे आहे की, या शेतकऱ्यांना आपण आणखी किती दिवस अशी स्वप्ने दाखविणार आहात ? आपण लाँग टर्म प्लॅन तयार करीत आहोत, तुम्ही काळजी करु नका, असे सांगून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत पोहोचू शकणार नाही. आम्ही हे मान्य करतो की, शासनाने लाँग टर्म प्रोग्रॅम हाती घेतला आहे, आमचे त्यांना सहकार्य आहे, आमच्या आमदारांनीही गावे दत्तक घेतली आहेत. परंतु, मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, आम्ही तुम्हाला 15-20 वर्षांनी पाणी देणार आहोत, असे स्वप्न तुम्ही बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दाखवा आणि त्यांचा विश्वास बसतो का, ते आम्हाला सांगा. तुम्ही, आम्ही विदर्भामध्ये रहात आहोत. दुर्दैवाने या ठिकाणी कापूस आणि सोयाबीन पिकविणाऱ्या भागातील कोणी मंत्री नाही. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना कोणी मंत्री केले नाही. या मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री आणि मंत्री कोणत्या भागातील आहेत ? या सभागृहाचे सन्माननीय सभागृह नेते जळगाव जिल्ह्यातील आहेत. त्या ठिकाणी कापूस पिकतो, केळी पिकते. पण कोरडवाहू शेती त्यांनी पाहिली आहे का, हे त्यांना विचारा. केळी बागायतदार, कापूस उत्पादक यांच्यावर कधीही कोरडवाहू शेतीची झळ पोहोचली आहे, असे वाटत नाही. मुख्यमंत्री महोदय नागपूर शहरामधील आहेत. शहरातील समस्या ते अत्यंत प्रभावीपणे मांडतात. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्या आहेत. मागील अधिवेशनात त्यांनी फार मोठ्या घोषणा केल्या, ज्याचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणात केला आहे. त्यांनी घोषणा भरपूर केल्या असल्या तरी त्या घोषणा पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून पावले टाकली गेली आहेत का ? शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्याच्या संदर्भात या सरकारने काही ठोस पावले टाकली आहेत, असा विश्वास या राज्यातील जनतेला आणि शेतकऱ्यांना राहिलेला नाही.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, आम्हाला याचीही जाणीव आहे की, आता पडलेल्या दुष्काळाची तीव्रता फार मोठी आहे. सन 1972 मध्ये 84 तालुक्यांमध्ये दुष्काळ पडता होता. यावेळी मात्र राज्यातील 123 तालुके दुष्काळात सापडली आहेत. या दुष्काळाची व्याप्ती फार मोठी आहे. सन 1972 च्या दुष्काळात जेवढी मदत केली गेली होती त्यापेक्षा किती तरी अधिक मदत करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, आत्महत्यांसंदर्भात सांगावयाचे झाले तर राज्यात कधी नव्हे एवढ्या आत्महत्या झाल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी असे सांगितले की, मागील सरकारच्या काळातही आत्महत्या झाल्या होत्या. ते आम्ही मान्य करतो. परंतु, आता आत्महत्या कशा पध्दतीने झाल्या, कोणत्या पध्दतीने शेतकऱ्याने स्वत:ला संपविले आहे, हे पाहिले तर विदारक दृष्य आपल्यासमोर येते. आपण आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना भेटतो त्यावेळी हे लक्षात येते की, संपूर्ण वाताहत झाल्यामुळे शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागत आहे. आज शासकीय आकडेवारीप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या 3 हजारावर गेलेली आहे. या राज्यामध्ये 3500 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. अद्याप शासकीय आकडेवारीत समाविष्ट न झालेली संख्या लक्षात घेतली तर ती संख्या आणखी वाढणार आहे. अमरावती विभागात वर्धा जिल्हा धरून 6 जिल्ह्यात 1400 आत्महत्या झाल्या आहेत. या आत्महत्यांबाबत वेगवेगळ्या प्रकारे बोलले जात आहे. उदाहरण म्हणून मी सांगू इच्छितो की, यवतमाळ जिल्ह्यात मागील वेळी वर्षभरामध्ये डिसेंबरपर्यंत 266 आत्महत्या झाल्या होत्या. या वर्षी 375 आत्महत्या झाल्या आहेत. अद्याप डिसेंबर महिना पूर्ण व्हायचा आहे. आपल्याला यामध्ये काही फरक जाणवतो की नाही ? पश्चिम विदर्भामध्ये वर्धा जिल्हा धरून आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. विशिष्ट भागात फार मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. माझ्याकडे शासकीय आकडेवारी आहे. पाहिजे तर मी जिल्हानिहाय आकडेवारी येथे सांगू शकेल. जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे पत्र माझ्याकडे आहे. अशा प्रकारे विशिष्ट भागात मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होतात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-4

SRR/ AKN/ ST/ 16:10

श्री.माणिकराव ठाकरे........

त्यावेळी त्या भागात शेतकरी कोणते उत्पादन घेत आहेत, त्यांच्यावर कशाचा परिणाम झाला आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, गेल्या 50-60 वर्षात सिंचनाच्या व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झालाच नाही, असे नाही. तथापि, सर्व ठिकाणी पूर्णपणे सिंचन व्यवस्था उभ्या राहू शकल्या नाहीत, हे देखील मान्य करावे लागेल. आज त्या भागात गेल्या दोन-तीन वर्षात नापिकी आहे. अपुरा पाऊस, अतिपाऊस, शेतीमालावर आलेली कीड यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला आहे. कापूस, सोयाबीन, धान पिकविणारा शेतकरी अडचणीत आला आहे. कांदा आणि संत्रा पिकविणारा शेतकरी देखील आज मदत मागत आहे.

सभापती महोदय, कापूस आणि सोयाबीनचे उत्पादन होणाऱ्या भागात मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. परंतु, सरकारचे याकडे लक्ष नाही. या सरकारने 50 कोटी रूपयांचे अनुदान मागील वेळी देण्याचा प्रयत्न केला. यवतमाळ जिल्ह्याला 50 कोटी रूपयांचे अनुदान देण्यात आले. हे 50 कोटी रूपये घ्या, शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध योजना राबवा, आमच्याकडून पॅकेज दिले गेले आहे, आता शेतकरी जाणो आणि तुम्ही जाणो, असा या शासनाचा कारभार आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...U-1.........

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, आपण दुष्काळच्या संदर्भात माहिती घ्यावी. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील गरीब शेतकरी कुटुंबे आता स्थलांतर करीत आहेत. त्यांना रोजगार मिळत नाही. ते कर्ज बाजारी झालेले आहेत. त्यांना वर्षभर शेतीवर उपजीविका करता येणार नाही म्हणून ते मुंबई, ठाणे या सारख्या ठिकाणी स्थलांतर करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे सभागृहात उपस्थित आहेत. ठाणे जिल्ह्यात किती लोक आलेले आहेत याची त्यांनी माहिती घ्यावी. राज्यातून मुंबई, चेंबूर, ठाणे, बांद्रा, कुर्ला अशा ठिकाणी लोक स्थलांतर करीत आहेत. एवढेच नाही तर अनेक लोकांनी नवी मुंबईतील खारघर येथे देखील स्थलांतर केलेले आहे. आपण या संदर्भात माहिती घेतली तर आपल्या लक्षात येईल की, हजारो नाही तर लाखो शेतकरी मुंबई, पुणे, नाशिक सारख्या ठिकाणी रोजगार मिळविण्यासाठी गेलेले आहेत. आपल्या लहान मुलांना घेऊन ते पुलाखाली, फुटपाथवर किंवा ज्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था आहे अशा ठिकाणी राहून उपजीविका करीत आहेत. हे विदारक दृश्य आहे. एकीकडेशेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. आज शेतकऱ्यांची कुटुंबे उद्धवस्त झालेली आहेत. शेतकरी आपल्या कुटुंबासह मुंबई सारख्या ठिकाणी जाऊन पुलाखाली आश्रय घेऊन राहत आहेत. त्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत ते शासनाकडून तत्काळ मदतीची अपेक्षा करणार नाही तर आणखी काय करणार आहेत ? शासन जलयुक्त शिवार योजना राबवित आहे. त्यामुळे आता तुमच्या शेताला पाणी मिळेल, तुम्हाला फळबाग लागवड करता येईल, धान्य पिकतविता येईल आणि त्यावर तुम्ही उदरनिर्वाह करु शकता, असे आपण त्यांना सांगू शकता काय ? त्यांना आज मदतीची गरज आहे. आज पर्यंत अशी परिस्थिती कधीही निर्माण झाली नव्हती. आपण याचा अभ्यास करावा. आपल्याला याची संपूर्ण माहिती आहे. त्या त्या वेळी अशी परिस्थिती निर्माण झाली असेल. परंतु, शेतकऱ्यांची अशा प्रकारची दुर्दशा कधीही झाली नव्हती. यावर्षी शेतकऱ्यांची दुर्दशा झालेली आहे.

सभापती महोदय, आम्ही नेहमी सांगतो की, शासन या विषयाच्या बाबतीत गंभीर नाही. आम्ही मोर्चा काढला. त्या मार्चात लोक लाखोच्या संख्येने सहभागी झाले होते. कारण, आज लोकांच्या मनात आग धगधगत आहे की, आमच्या समोर मोठ्या समस्या निर्माण झालेल्या आहेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

आमच्या समोर जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या संदर्भात शासन काय करणार आहे ? सत्ताधारी पक्षाच्या एखाद्या सन्माननीय सदस्याने जरी मोर्चा काढावयाचे म्हटले तरी हजारो नव्हे तर लाखोच्या संख्येने लोक मोर्चात सहभागी होतील. कारण आज राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. आम्ही चर्चा करतो. शासन उत्तर देते. आम्ही शासनावर विश्वास ठेवतो. शासन शेतकऱ्यांना मदत करणार आहे अशा बातम्या वर्तमानपत्रात छापून येतात. जनता खूप आशेने आपल्याकडे बघत असते.

सभापती महोदय, माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी मागील हिवाळी अधिवेशनात जे भाषण केले त्यातील किती मुद्यांची पूर्तता झाली ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, विरोधी पक्षाला आणेवारी काढण्याची पद्धत माहीत नाही काय ? गावामध्ये समती असते, तहसीलदार पीक पाहणी करतात. त्यानंतर जिल्हाधिकारी ती आणेवारी जाहीर करतात. त्यावर लोकांच्या हरकती व सूचना मागवितात आणि आपला अहवाल शासनाला सादर करतात. त्यानंतर शासनाकडून संपूर्ण राज्याची आणेवारी जाहीर केली जाते. माननीय सभागृह नेत्यांनी मागील वेळी काय सांगितले होते ? त्यांनी सांगितले होते की, आम्ही पुण्याचे आयुक्त श्री.विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करु आणि त्या समितीचा अहवाल तीन महिन्यात आल्याशिवाय राहणार नाही. आम्ही ताबडतोब आणेवारी काढण्याची पद्धत बदलण्याचा निर्णय घेऊ आणि लोकांना न्याय देऊ. त्या घोषणेचे काय झाले ? आजही लोकांकडून सांगितले जाते की, आणेवारी चुकीच्या पद्धतीने काढलेली आहे. 15 हजार गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यातील गावागावांमधून ओरड होत आहे की, आणेवारी चुकीच्या पद्धतीने काढलेली आहे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांनी जाहीर केले होते की, आता 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असण्याची आवश्यकता राहणार नाही. आम्ही ती 30 टक्क्यांपर्यंत खाली आणणार आहोत. म्हणजे 70-80 टक्के जरी उत्पन्न मिळाले तरी आणेवारी कमी आहे असे समजून आम्ही त्या शेतकऱ्यांना मदत करु. या संदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला ? आणेवारी काढझ्याची पद्धत बदलण्याबाबत सातत्याने मागणी केली

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

जाते. परंतु, शासन दुष्काळ घोषित करीत नाही. माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी सांगितले की, 15 डिसेंबर रोजी अंतिम आणेवारी घोषित झाल्यानंतरच केंद्र शासन मदत करीत असते. लातूर येथे केंद्र शासनाचे पथक आले. त्या पथकाचे जे डायरेक्टर आहेत त्यांचे नाव मी विसरलो. त्यांनी लातूर येथे सांगितले होते की, सरकारने दुष्काळ जाहीर करण्यास उशीर केल्यामुळे राज्याला मदत मिळू शकली नाही आणि माननीय सभागृह नेत्यांनी सांगितले की, राज्यात दुष्काळ आहे असे आम्हाला 15 डिसेंबरच्या अगोदर केंद्र शासनाला कळविता येत नाही. त्या ठिकाणी 6 वेळा केंद्र शासनाचे पथक आले आणि पाहणी करुन गेले.

सभापती महोदय, पश्चिम विदर्भात 1400 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री विदर्भातील असताना केंद्र शासनाचे एखादे पथक विदर्भात पाहणी करण्यासाठी बोलवावे असे त्यांना वाटले नाही. ज्यावेळी राज्यात विशेषत: विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या त्यावेळी आम्ही आवाज उठविला होता. त्यावेळी स्व.विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री होते. त्यांनी 1600 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्यावेळी माननीय पंतप्रधानांना कळविण्यात आले की, राज्यात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. माननीय पंतप्रधान स्वत: यवतमाळ जिल्ह्यात आले होते. आज राज्यात 3500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असताना माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांना महाराष्ट्रात येण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यांच्या परदेश वाऱ्या संपत नाहीत. ते एकीकडे सांगतात की, शेतकऱ्यांना 50 टक्के नफा मिळाला पाहिजे. मागील वर्षी सोयाबीन पिकाला प्रती क्विंटल 3,500 रुपये भाव होता. माननीय श्री.नरेंद्र मोदी साहेबांनी त्यांच्या भाषणात सांगितले होते की, सोयाबीन पिकाला प्रती क्विंटल फक्त 3,500 रुपये भाव मिळत असेल तर मग शेतकरी आत्महत्या का करणार नाहीत ? अशा प्रकारची विधाने करुन जनतेची दिशाभूल केली. आपण निवडणुकीत जी आवश्वासने दिली होती ती पूर्ण करावीत असे तुम्हाला वाटत नाही आणि त्या दृष्टीनेच तुमची वाटचाल सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेब आम्ही चर्चेला केव्हाही तयार आहोत. आम्हाला या विषयावर चर्चा करावयाची नाही असे नव्हते. परंतु,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

माननीय कृषी मंत्र्यांनी मागील अधिवेशनात जी उत्तरे दिली आणि त्यानंतर कोणते रिझल्ट आले याची माहिती आपण घ्यावी. तीन महिन्यात आणेवारी काढ्याची पद्धत बदलण्यात येईल, असे आम्हाला सांगण्यात आले. परंतु, या संदर्भात काय झाले हे आपल्या सर्वांना माहीत आहे. त्यांनी सांगितले की, केंद्राची समिती 8 दिवसात येईल आणि आम्ही केंद्र शासनाकडे 4 हजार कोटी रुपयांची मागणी करु. त्यांनी घोषणा केल्यानंतर केंद्राची समिती लवकर आली नाही. ती समिती दोन-तीन महिन्यांनी राज्यात आली. राज्य शासनाची 3,900 कोटी रुपयांची मागणी केव्हाची होती ? राज्य शासनाने डिसेंबर महिन्यात मागणी केली होती. नंतर वर्तमानपत्रात बातम्या छापून आल्या की, या संदर्भातील फाईलच अद्याप तयार झालेली नाही, ती फाईल मंत्री महोदयांकडे पडून आहे. त्यामुळे ती मागणी केंद्राकडे पोहोचली नाही. आपण विश्वास ठेऊन ज्या अविर्भावात सांगत होता की, आता केंद्रात आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आलेले आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस जे सांगतील ते केंद्रात ऐकले जाते. परंतु, आज पर्यंत कोणतीही मदत न दिल्यामुळे केंद्रात काय पत राहिलेली आहे हे उघड झालेले आहे, हे मी मुद्दाम सांगू इच्छितो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, यासंदर्भात महसूल मंत्री महोदयांनी सांगितले होते की, मनरेगाचे 60:40 चे निकष आहेत, ते निकष आम्ही प्रस्ताव पाठवून आठ दिवसात मान्यता घेऊन बदलून आणल्याशिवाय राहणार नाही. असे त्यांनी मोठ्या अविर्भावात सांगितले होते. त्यांचे मागील रेकॉर्ड काढून पहावे, त्यांनी भाषणात असा उल्लेख केला आहे किंवा नाही ते आपणाला दिसून येईल. 8 दिवसात रोजगार हमी योजनेचा रेशो बदलून आणण्याचा उल्लेख केला होता. ज्या भागात दुष्काळ आहे, तेथील मनरेगाच्या कामाचा रेशो आजपर्यंत देखील बदलण्यात आलेला नाही. मागील शासनाने ज्या विहिरी दिल्या होत्या त्याचा फक्त रेशो बदलण्यात आला आहे. त्यामध्ये जी कामे राहिली होती, त्याबाबत 49:51 चा रेशो होतो तो 50:50 चा करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त भागात मनरेगाची कामे मिळाली पाहिजेत अशा पध्दतीने रेशो बदलण्यात आलेला नाही, ही बाब अत्यंत स्पष्ट आहे.

सभापती महोदय, सौर ऊर्जेवर पाच लाख शेतीपंप देण्यात येतील असे सांगण्यात आले होते. सर्वांना असे वाटले होते की, ज्या ठिकाणी वीज मिळत नाही किंवा सरकार जेथे वीज देऊ शकत नाही अशा ठिकाणी सौर ऊर्जेवर चालणारे पाच लाख शेतीपंप दिल्यामुळे शेतीला पाणी देता येईल व त्यातून काही तरी उत्पन्न काढता येईल. अशा प्रकारे पाच लाख कुटुंबीयांना दिलासा देण्याबाबत महसूल मंत्री महोदयांनी सांगितले होते. याबाबत शासनाने कोणतीही प्रगती केलेली नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आपणाला देखील ही बाब माहिती आहे.

सभापती महोदय, दुसरी घोषणा अशी केली होती की, शेतकऱ्यांनी सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ करण्यात येईल. ही घोषणा कशी काय करण्यात आली याची माहिती नाही. माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे त्यांच्या जवळचे काही व्यापारी त्यांना भेटले होते. त्यातून त्यांना अशी कल्पना सुचली की, सावकारांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज माफ करावे. याबाबत सरकारला असे दाखवायचे होते की, 400 कोटी रुपयांचे कर्ज सावकारांच्यामार्फत आम्ही शेतकऱ्यांचे माफ करणार आहोत. यासाठी 375 कोटी रुपये आम्ही राखून ठेवत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर माझा प्रत्येक शब्द आपण लिहून घ्यावा. सावकारांच्या संदर्भातील विषय

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

मागील नागपूर अधिवेशनात उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतर बजेट अधिवेशन मार्च महिन्यात मुंबई येथे सुरु झाले होते. त्यावेळी शासनाने जी.आर. काढलेला नव्हता. सन्माननीय सदस्यांनी मागणी केली तेव्हा शासनाने दुसऱ्या दिवशी जी.आर. काढला होता. त्यावेळी 375 कोटी रुपयांवरुन फक्त 180 कोटी रुपये सावकारांचे आहेत ते देण्यात येतील यासंदर्भात जी.आर.काढण्यात आला. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला की, एका जिल्ह्यातील 500 ते 600 लोकांना त्याचा फायदा झाला आहे. माझ्या माहितीप्रमाणे ही बाब देखील खरी नाही. आज त्या शेतकऱ्यांना जाऊन विचारा की, तुम्हाला पैसे मिळाले आहेत काय ? ते सांगतील की, आम्हाला पैसे मिळाले नाहीत. त्याचे कारण असे आहे की, यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले असून त्यांना मदत करण्यासाठी काही कोटी रुपयांची गरज आहे. डीडीआर यांनी फक्त 70 लाख रुपयांची प्रकरणे तयार केली आहेत. यामध्ये 200 लोकांना मदत मिळेल असे त्यांनी सांगितले आहे. यासंदर्भात सावकारांकडून जी माहिती पाहिजे ती गेल्या तीन महिन्यांपासून त्यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. त्यामुळे एकाही शेतकऱ्याची सावकाराच्या माध्यमातून कर्जमाफी झालेली नाही. ही बाब चुकीची असेल तर आपण चौकशी करावी. सावकारांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची कर्जमाफी करतो ही कल्पना कशी काय सुचली हे मला कळत नाही. आता 400 कोटी रुपयांवरुन ही रक्कम 200 कोटी रुपयांवर आलेली आहे. यवतमाळ जिल्ह्यात 70 लाख रुपयांचे वाटप सरकार करु शकत नाही. एकीकडे सरकार असे सांगते की, आम्ही सावकरांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कर्जमाफी केली, परंतु वस्तुस्थिती अत्यंत वेगळी आहे. या सरकारला शेतकऱ्यांचे दुखणे काय आहे, त्यांना काय मदत करायला पाहिजे, हे कळत नाही. शेतकरी आज गावागावत चर्चा करीत आहे की, नोंदणीकृत सावकाराकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले जात नाही. नोकरी व व्यवसाय करणारे लोक सावकारी करतात ही सावकारी वेगळ्या पध्दतीने या चाकोरीत कशी आणता येईल हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. कर्ज माफीच्या संदर्भात सरकार सावकारांना मदत करु शकत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, शेतकऱ्यांना आता बँकेकडून कर्ज मिळणे बंद झाले आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढलेला आहे, तो कर्जाचा भार कमी केल्याशिवाय तो शेतकरी मूळ प्रवाहात येऊ शकणार नाही. जो शेतकरी बँकेकडून कर्ज काढतो त्यालाच पुन्हा कर्ज द्यावयाचे अशा प्रकारे मागील कर्ज माफीनंतर ही संख्या हळूहळू कमी होत चालली आहे. आज ती संख्या 20 ते 25 टक्क्यांपर्यंत आलेली आहे. सरकारने कर्जमाफीची घोषणा केली नाही तर मी खात्रीने सांगतो की, पुढील वर्षी 10 टक्के शेतकऱ्यांना देखील बँकेकडून कर्ज मिळू शकणार नाही. त्यावेळी हे सरकार असे म्हणेल की, आमच्या राज्यात शेतकरी सुखी झाला आहे, तो बँकेचे कर्ज घेण्यास देखील तयार नाही व आता शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची गरज राहिली नाही, अशा अविर्भावात सरकारचे मंत्री सांगतील. काल परवा मी वर्तमानपत्रात वाचले की, यवतमाळ येथील उदाहरण घेऊन माननीय श्री.एकनाथराव खडसे, महसूल मंत्री यांनी असे सांगितले की, 26 टक्के लोकांनी बँकेकडून कर्ज घेतले आहे व 70 टक्के लोक बँकेकडे फिरकत नाहीत. अत्यंत चुकीचे, बेजबाबदारपणाचे शेतकऱ्यांच्या बाबतीतील हे वक्तव्य आहे. शेतकरी कर्जबाजारी झालेला असल्यामुळे तो बँकेकडे कर्ज मागण्यासाठी जाऊ शकत नाही. 70 टक्क्यामधील 45 टक्के शेतकरी कर्जबाजारी असल्यामुळे त्यांना कर्ज मिळू शकत नाही. यवतमाळ जिल्ह्यात 2 लाख 10 हजार लोकांचे बँक कर्ज थकित झाल्यामुळे ते कर्ज मागण्यासाठी बँकेकडे जाऊ शकत नाहीत. पुढील काळात ही संख्या वाढत जाणार आहे. सरकार एका बाजूला असे सांगते की, शेतकरी कर्ज घेण्यासाठी बँकेकडे जात नाही. त्यांना कर्ज घेण्याची गरज राहिली नाही. आज हा शेतकरी सावकाराकडे जातो व त्यांच्याकडून दामदुप्पटीचे कर्ज घेतो, त्या कर्जाची परतफेड झाली नाही तर त्यांच्या घरासमोर सावकाराची माणसे येतात व मुलाबाळांना पैसे मागतात. बाहेर दुकानावर मुलगी व बायको गेली असेल तर दुकानदार त्यांना सांगतो की, मी तुझ्या नवऱ्याला पैसे दिले आहेत ते पैसे पहिल्यांदा परत कर. अशा प्रकारची अवस्था गावागावात झालेली आहे. याबाबत सरकारला कोणतीही चिंता असल्याचे दिसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4...

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, आजूबाजूच्या कोणत्याही राज्यातील कापूस उत्पादक परिसरात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात या सरकारची भूमिका अन्यायकारक आहे. निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांना जी आश्वासने दिली तेवढीच आपण पूर्ण करावीत. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर राज्य स्तरावरील कमिटीमध्ये आपण आहात किंवा नाही याची मला माहिती नाही. भारतीय जनता पक्षाच्या कमिटीवर आपण असावे. भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्यावेळी काय घोषणा केल्या होत्या याची जाणीव देखील आपणाला असायला पाहिजे. भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्यावेळी जाहीरनामा प्रसिध्द केला होता. या जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले होते की, "दीर्घकाळाच्या थकित कर्जातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यात येईल. त्या दृष्टीकोनातून तत्काळ पावले उचलली जातील", ही मागणी आम्ही केलेली नाही. मते घेतांना ही आश्वासने आपण लोकांना दिली आहेत. जी आश्वासने दिली ती सरकारने पूर्ण केली पाहिजेत अशी आमची मागणी आहे. यापेक्षा कोणतीही वेगळी मागणी आम्ही करीत नाही. आपले सरकार बोलते वेगळे व वागते वेगळे यासंदर्भात सरकारची भूमिका स्थिर नाही, त्यामुळे हे राज्य कशा प्रकारे चालले आहे, राज्य कारभार कशा प्रकारे रेटला जाणार हे यावरुन स्पष्टपणे दिसून येत आहे.

सभापती महोदय, शिवसेना पक्षाची भूमिका कशी आहे, ती आपण सर्व पाहत आहोत. माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी मराठवाड्यातील जाहीर सभेत असे सांगितले होते की, शेतकऱ्यांना कर्जमाफी दिलीच पाहिजे, ही बाब मी मान्य करतो. त्या ठिकाणी घोषणा केल्यामुळे त्यांना राजकीय फायदा होईल. एकीकडे सरकारमध्ये राहायचे, सत्ता भोगायची आणि दुसरीकडे कोठे तरी राजकीय फायदा मिळाला पाहिजे या भूमिकेतून अशा प्रकारचे स्टेटमेंट करीत रहायचे. आम्ही कसे नामनिराळे आहोत, आम्हाला सरकारशी काही देणे घेणे नाही. कर्जमाफी झाली पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत.

....W-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

दुष्काळग्रस्त भागामध्ये मदत पोहोचविली जाईल असे आम्हाला वाटले होते. तुम्ही सरकारमध्ये आहात, कॅबिनेटमध्ये बसण्याचे तुम्हाला अधिकार प्राप्त झालेले आहेत. शिवसेना पक्षाच्या मताप्रमाणे कॅबिनेटमध्ये निर्णय होत नसतील तर तुम्हाला कॅबिनेटमध्ये राहण्याचा अधिकार नाही. तुम्ही कॅबिनेटमधून बाहेर का पडत नाही? आम्ही विरोधी पक्षात आहोत म्हणून बोलतो असे नाही. शिवसेना पक्षाने निवडणूक जाहिरनाम्यात जे म्हटले होते ते मी सभागृहाला सांगू इच्छितो. राज्यात ओला किंवा सुका दुष्काळ पडणे, पिकांवर कीड किंवा रोगाची लागण होणे, पशुमुळे धान्याचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरुन देण्यासाठी इरमा म्हणजे शेती उत्पादनातून जोखमीचे व्यवस्थापन सत्तेवर आल्यास तातडीने लागू करण्याचे जाहीर केले होते. याची अंमलबजावणी करण्यासाठी आणखी किती कालावधी पाहिजे? आपले सरकार सत्तेवर आल्यामुळे जाहीर केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची नसून सत्ताधारी पक्षाची आहे. म्हणजे सत्ताधारी पक्षांचा निवडणूक जाहिरनामा थोतांड होता. जनतेची मते मिळविण्याचा प्रयत्न होता, सत्तेवर येण्यासाठी केलेला तो प्रयत्न होता. या संदर्भात सरकार कोणताही निर्णय घेत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. आज राज्यातील मंत्र्यांचे नातेवाईक सुध्दा आत्महत्या करीत आहेत. हे सरकार कोणालाही दिलासा देऊ शकत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी असा उल्लेख केला की, मंत्र्यांच्या नातेवाईकांनी आत्महत्या केली. संबंधित मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण दिले आहे की, त्यांच्या नातेवाईकांनी केलेली आत्महत्या ही शेतकरी आत्महत्या नाही. ते बागायतदार होते. घरगुती कारणामुळे त्यांनी आत्महत्या केली अशा प्रकारचा खुलासा मंत्री महोदयांनी केला असल्यामुळे माननीय सदस्यांचे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढण्यात यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या संदर्भात जी काही शहानिशा करावयाची असेल ती सरकारने करावी. सर्व जनतेला याची माहिती आहे. आम्ही म्हणतो शेतकरी आत्महत्या आहे, सरकार मान्य करायला तयार नाही. सरकारने याची चौकशी करावी. आम्हाला जी माहिती मिळाली ती सभागृहाला देण्याचा मी प्रयत्न केला आहे.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दुष्काळाच्या गंभीर विषयावर सभागृहामध्ये चर्चा सुरु असताना कृषी, महसूल, सहकार या विभागाचे मंत्री सभागृहात अनुपस्थित आहेत. सरकारला या विषयाचे गांभीर्य आहे की नाही?

**तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) :** माननीय कृषी मंत्री श्री.एकनाथ खडसे हे विधानसभा सभागृहात पुरवणी मागण्यांच्या चर्चेला उत्तर देण्यासाठी माझी अनुमती घेऊन गेले आहेत.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत असून त्या मुद्यांबाबत उत्तरे दिली जातील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दुष्काळाशी संबंधित विभागाचे सचिव देखील गॅलरीमध्ये उपस्थित नाहीत.

श्री.हेमंत टकले : या परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे योग्य होणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : या सरकारला सभागृहात चर्चा करायला जमत नाही. सरकारला शेतकऱ्यांच्या दृष्टीने मदत जाहीर करायला जमत नाही. हे सरकार शेतकऱ्यांचे दुष्मन आहे का हे तरी कळू द्या. किमान संबंधित विभागाचे राज्यमंत्री सभागृहात उपस्थित असणे अपेक्षित आहे. किमान मदत व पुनर्वसन, महसूल, कृषी विभागाच्या राज्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक नाही का? अधिकारी देखील गॅलरीमध्ये उपस्थित नाहीत. हे सरकार शिवसेना पक्षाच्या मंत्र्यांकडील विभागांना पैसे द्यायला तयार नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभागृहाची बैठक तहकूब करुन संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना सभागृहात तातडीने उपस्थित राहण्याबाबत आपण सूचना द्यावी.

श्री.धनंजय मुंडे : सरकारची दुष्काळाबद्दलची भावना स्पष्ट होते. या सरकारला राज्यातील शेतकऱ्यांना काहीही द्यायचे नाही.

श्री.गिरीश बापट : माननीय कृषी मंत्री विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देत आहेत. सभागृहात मी स्वत:, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे, माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर उपस्थित आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करावी.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.गिरीश बापट : माननीय कृषी मंत्री विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देत आहेत. सभागृहात माननीय सदस्यांकडून जे मुद्दे मांडले गेले त्याची नोंद घेण्यात आली असून त्या मुद्यांना उत्तरे दिली जातील.

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य वेलमध्ये येतात)

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक पाच मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.48 ते 4.53 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आमची एवढीच विनंती होती की, सभागृहामध्ये गंभीर विषयावर चर्चा सुरू असताना संबंधित खात्याच्या माननीय राज्यमंत्र्यांनी कमीतकमी उपस्थित राहणे आवश्यक होते. सभागृहाता आता अन्य खात्याचे कॅबिनेट मंत्री आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधान सभेच्या सभागृहात पुरवणी मागण्यांवर माननीय महसूल मंत्री उत्तर देत आहेत. ही चर्चा आज आपल्या सभागृहात नाही. मला देखील चिठ्ठी आली होती म्हणून मी तेथे गेलो होतो. माननीय महसूल मंत्र्यांना पुरवणी मागण्यांना विधान सभेच्या सभागृहामध्ये उत्तर द्यावयाचे असल्यामुळे ते येथून गेलेले आहेत. त्यामुळे आपण समजून घ्यावे.

**तालिका सभापती :** आता आपण चर्चेला सुरूवात करू या.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे बोलत असताना मंत्र्यांच्या नातेवाईकांनी आत्महत्या केल्याचे सांगितले. त्यांनी कोणाचेही नाव घेतले नाही. त्यांनी नाव घेतले असते तर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर म्हणाले असते की, आपण नोटीस दिली आहे काय ? ते मला मान्य होते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी कोणाचेही नाव घेतले नाही. त्यावर त्यांनी वेगळा खुलासा केला. आपल्या सभागृहाची परंपरा आहे की, सदस्य सभागृहात जे बोलतात ते सत्य समजले जाते. आपला या गोष्टीवर अविश्वास असेल तर त्याची आपण चौकशी करावी. पण सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यामध्ये अडथळा आणायचा, बोलू द्यायचे नाही हे योग्य नाही. सन्माननीय सदस्य ज्यावेळी भाजप आणि शिवसेनेचा जाहीरनामा दाखवतात ..... (अडथळा)...... जाहीरनामा हा छापीलच आहे. तो दाखविला जातो त्यावेळी हे नाही असे म्हणतात. सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये बोलत असताना अडथळा आणून त्यांचे भाषण काढून टाकावे असे जे सांगत आहेत. असे जर केले तर ती चुकीची प्रथा होईल. त्यामुळे त्यांच्या भाषणातील कोणताही भाग वगळू नये हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती :** आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी भाषणास सुरूवात करावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भामध्ये म्हण आहे. "लबाडाचे आवतण जेवल्याशिवाय काही खरे नाही." आपल्याकडे या म्हणीचा उल्लेख केला जातो की नाही हे माहीत नाही. पण आमच्याकडे केला जातो. यात दोन्ही पक्षाचा शासनात आल्यानंतरचा लबाडपणा उघडकीस पडलेला आहे. मी जाहीरनाम्याचा उल्लेख केला तेव्हा सन्माननीय सदस्यांनी हा कागदावरच दिसत आहे असा उल्लेख केला. पण आपण हा जाहीरनामा कोणाचा आहे ते पाहू शकता. "चला, उठा महाराष्ट्र घडवूया" या नावाने वचननामा आहे. भाजपावाल्याचे तर वेगळेच नाव आहे. त्यांच्या जाहीरनाम्याचे नाव "समृद्ध महाराष्ट्राची हमी देणारे दृष्टिपत्र" असे आहे. त्यामध्ये उल्लेख केला आहे की, शेतकऱ्यांची कर्जमाफी आम्ही करू. हा उल्लेख आपल्या जाहीरनाम्यामध्ये आहे. शिवसेनेच्या जाहीरनाम्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख आहे की, ज्या ज्या वेळी शेतकऱ्याच्या मालावर आपत्ती येईल त्या त्यावेळी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याकरिता लागलीच तशा प्रकारची समिती आम्ही स्थापन करू आणि ती नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देण्यात येईल.

**तालिका सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण 45 मिनिटे बोलत आहात. या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आपण आपल्या मुद्यावर यावे. जेणे करून अन्य सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करता येतील. आपण माननीय विरोधी पक्ष नेत्यांपेक्षा जास्त वेळ बोलला आहात. मी आपल्याला वेळ देतो पण आपण मुद्यावर यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी मुद्दा सोडून बोलल्याचा एक मुद्दा आपण मला सांगावा. त्यांनी जाहीरनाम्यामध्ये जे सांगितले होते, जे आश्वासन दिले होते तेच सांगत आहे. नवीन काय करावे तेही मी सांगत आहे. राज्यात काय स्थिती निर्माण झाली आहे ते मी सांगत आहे. मी या मुद्यांच्या बाहेर कुठेही गेलेलो नाही. मी कोणावरही वेगळे असे आरोप केलेले नाहीत. मी येथे शिवसेना व बीजेपीच्या जाहीरनाम्यामध्ये काय आहे याचा उल्लेख केला आहे. ओला, गार,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

दुष्काळ, किडा, पशुहल्ले काही झाले तरी नुकसान भरपाई देण्यात येईल असे शिवसेनेच्या जाहीरनाम्यामध्ये आहे. भाजपाच्या दृष्टिपत्रात कांदा, कापूस, टोमॅटो यांचे भाव कोसळले तर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल. म्हणजे मालाला नुकसान भरपाई आम्ही देऊ असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच कर्जमाफी देखील देऊन असे त्यांच्याच जाहीरनाम्यामध्ये आहे. आपण येथे आपल्या कर्तृत्वाने बसलेला नाहीत. आपण लोकांना खोटी-नाटी स्वप्ने दाखवून बसला आहात. त्या खोट्या नाट्या स्वप्नांवर लोकांनी विश्वास ठेवला आणि आपण येथे सत्तेमध्ये बसला आहात. पण आज खऱ्या अर्थाने आपणाला सत्तेमध्ये बसण्याचा नैतिक अधिकार नाही.

येथे दाभाडीचा उल्लेख करण्यात आला आहे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी निवडणुकीपूर्वी येथे आले. चाय पे चर्चा म्हणून त्यांनी चर्चा केली. त्यांनी दोन वाक्ये उच्चारली होती. 50 टक्के नफा शेतकऱ्यांना मिळेल, अशा प्रकारची व्यवस्था मी या राज्यामध्ये आणेन. 50 टक्के नफा तर सोडून द्यावा. पूर्वी कापसाचे भाव प्रति क्विंटल रूपये 7000/- गेले होते. पण आता तोच भाव प्रति क्विंटलमागे रूपये 4000/- च्या आत आहे. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केला आहे. आज कापसाला प्रति क्विंटल रूपये 3800/- इतका भाव मिळतो आहे हे खरे आहे.

Y-1.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, सीसीआय कापसाला जास्त भाव देत नाही. आज सीसीआय कापसाला केवळ 4200 रुपये भाव देत आहे. सीसीआय तोटयाने कापूस खरेदी करणारी संस्था नाही. केंद्र सरकारची नाफेड संस्था फक्त आधारभूत किमतीने कोणत्याही राज्यात जाऊन माल खरेदी करीत असते. मिल मालकांना चांगल्या प्रकारचा कापूस मिळावा यासाठी रजिस्टर झालेली केंद्रशासनाची ही एक व्यवस्था आहे. आपण सीसीआयला जबरदस्ती करुन दिवाळीपूर्वी 14 कापूस खरेदी केंद्र सुरु करावयास लावले. परंतु तोपर्यंत व्यापाऱ्यांच्या घशात 25 टक्के कापूस गेला होता. कापूस खरेदी केल्यानंतर 24 तासात शेतकऱ्यांना कापसाचे पैसे द्यावेत यासंदर्भात पणन महासंघाचा कायदा आहे. 24 तास सोडा परंतु एक महिना उलटून गेल्यानंतर 14 केंद्रावर ज्या शेतकऱ्यांनी कापूस विकला होता त्या शेतकऱ्यांना थोडे पैसा मिळाले. व्यापाऱ्यांच्या घशात कापूस घातल्यामुळे शेतकऱ्यांना जो फायदा व्हावयास पाहिजे होता तो शेतकऱ्यांना मिळू शकला नाही. आज शेतकऱ्यांमध्ये विदारक परिस्थिती निर्माण झालेली आहे. दाभाडी गावात माननीय पंतप्रधान गेल्यानंतर या गावात दुसऱ्याच दिवशी विठ्ठल राठोड नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली होती. उत्पादन खर्चाच्या 50 टक्के भाव देण्याचे सोडा परंतु पंतप्रधान ज्या गावी जातात त्याच्या दुसऱ्याच घदिवशी त्या गावातील शेतकरी आत्महत्या करतो हे कशाचे द्योतक आहे ? खरे म्हणजेशासनाकडून दिलासा मिळेल असा विश्वास शेतकऱ्याला न राहिल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यवतमाळ जिल्हयातील पिंपरी गावात गेले असताना ते ज्यांच्या घरी थांबले होते त्याच्या शेजारच्या घरातील शेतकऱ्याने आत्महत्या केली होती. नापिकीमुळे पुढील वर्षी शेतामध्ये पेरणीसाठी पैसे नसल्यामुळे या शेतकऱ्याने आत्महत्या केली होती. दिलासा देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री गावात गेले असतांना ज्या घरातील पुरुषाने आत्महत्या केली होती त्याच घरातील मयत शेतकऱ्याच्या पत्नीने म्हणजे शांताबाई ताजने यांनी 8-15 दिवसानंतर आत्महत्या केली. शासनाकडून आम्हाला कोणतीही मदत मिळाली नसल्यामुळे मी आत्महत्या करीत आहे असे सांगून या महिलेने आत्महत्या केली होती. मुख्यमंत्र्यांनी त्या गावात जी आश्वासने दिली होती त्यातील एकही आश्वासन अद्यापपर्यंत पाळले गेले नाही. शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे .....

मुख्यंत्री त्या कुटुंबाला भेट देण्यासाठी जातात परंतु 8-15 दिवसानंतर त्याच घरातील महिलेने आत्महत्या करावी हे योग्य नाही. मुख्यमंत्र्यांकडे सर्वात जास्त अधिकार असतात. मुख्यमंत्री आल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी धावत गेले पाहिजे.

**तालिका सभापती** (श्री. नरेंद्र पाटील ) : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले भाषण लवकर आटोपते घ्यावे.

श्री. माणिकराव ठाकरे : काँग्रेस पक्षाला या विषयावर बोलण्यासाठी एकंदर किती वेळ देण्यात आलेला आहे ?

**तालिका सभापती :** या विषयावर 22 सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. आपल्या पक्षातील अजून काही सदस्यांना या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : माझ्या पक्षाला जो वेळ देण्यात आलेला आहे त्यामध्ये मला जो वेळ देण्यात आलेला आहे त्यातील उरलेला वेळ माझ्या पक्षातील सन्माननीय सदस्यांना देण्यात यावा. या विषयावर रात्री 8 वाजेपर्यंत चर्चा सुरु राहणार होती.

श्री. भाई गिरकर : माझा पॉईंट ऑफ ऑर्डरचा मुद्दा आहे. मी सन्माननीय विरोधी पक्षाला विनंती करतो की, चर्चा करताना विरोधी पक्षाला व सत्ताधारी पक्षाला एकंदर किती वेळ दिला जाणार आहे हे अगोदर ठरवून घेतले पाहिजे. ही चर्चा सुरु होऊन 3 तास झाले असून आतापर्यंत केवळ 3 वक्त्यांनी या चर्चेत भाग घेतलेला आहे. त्यामुळे या चर्चेवर एकंदर किती सदस्य भाग घेणार आहेत व त्यांना एकंदर किती वेळ दिला जाणार आहे याची माहिती आम्हाला मिळाली तर बरे होईल. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य भरपूर बोलतात परंतु नंतर सत्ताधारी पक्षाला वेळ कमी मिळतो. वेगळा पायंडा पाडू नये एवढेच मला सांगावयाचे आहे. त्यामुळे कोणत्या पक्षाला किती वेळ दिला जाणार आहे याची आखणी करणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती :** या चर्चेवर एकंदर 22 सदस्यांना विचार मांडावयाचे असून 3 तासामध्ये फक्त 3 सदस्यांनाच विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. सभागृहाची वेळ वाढवावयाची असेल तर त्यासाठी मला माननीय सभापती महोदयांची अनुमती घ्यावी लागणार आहे. सदस्यांनी वेळेत भाषण पूर्ण केले तर सर्व सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळू शकेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती .....**

इतर सन्माननीय सदस्यांनाही या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपले विचार लवकरात लवकर मांडून पूर्ण करावेत अशी माझी त्यांना विनंती आहे. सभागृहाची वेळ किती वाजेपर्यंत वाढवण्यात यावी याबाबत माननीय सभापती महोदयांना मी चिठ्ठी पाठवली असून त्यासंदर्भातील निरोप लवकरच येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा आहे. दुष्काळाची चर्चा सुरु होऊन 3 तास होऊन गेले असून आतापर्यंत केवळ 3 सदस्यांनाच या चर्चेमध्ये भाग घेता आलेला आहे. या चर्चेवर एकंदर 22 सदस्य बोलणार आहेत. दुष्काळावर चर्चा असून शासनावर विरोधी पक्षाकडून आरोप केले जात आहे त्यामुळे चर्चेसाठी वेळ वाढवून देण्यात यावा. ही चर्चा उद्याही सुरु ठेवली तर आम्हाला या चर्चेत भाग घेता येईल.

**तालिका सभापती :**सन्माननीय सदस्यांच्या भावना मी माननीय सभापती महोदयांना कळविलेल्या असून माननीय सभापती महोदयांकडून निरोप आल्यानंतर तो सभागृहाला अवगत केला जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने माझे माननीय सभापती महोदयांबरोबर चर्चा झाली आहे. या चर्चेचा विषय गंभीर असून अशा प्रकारच्या चर्चा एका दिवसात कधीही संपल्या नाहीत. आज दुपारी 2 वाजून 42 मिनिटांनी या चर्चेला सुरुवात झाली असून नियमानुसार ही चर्चा 2 तास 40 मिनिटांत पूर्ण करावयाची असते. परंतु सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या दोन्ही बाजूने नियम 260 अन्वयेचे प्रस्ताव दिलेले असल्यामुळे दोन्ही बाजूंची वेळ विचारात घेतली तर या चर्चेवर 5 तास 20 मिनिटे आपल्याला चर्चा करता येणार आहे. या चर्चेला यापेक्षाही जास्त वेळ लागणार असेल तर उद्याही ही चर्चा सुरु ठेवली तर त्याला काही अडचण येणार नाही.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विधानसभेत दुष्काळाच्या चर्चेवर सदस्यांना विचार मांडण्यासाठी जास्त वेळ मिळावा अशी चर्चा झाली होती. त्यामुळे विधानसभेत उद्याही या चर्चेवर सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार असून उद्या दुपारी 4.00 वाजेपर्यंत ही चर्चा सुरु राहणार आहे. हा प्रस्ताव महत्वाचा असल्यामुळे या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांना

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे......

उद्याही बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे. गेल्या पाच दिवसापासून याच विषयावर दोन्ही सभागृहाचे कामकाज होऊ शकले नव्हते. त्यामुळे ही चर्चा उद्याही सुरु ठेवण्यास काही हरकत नसावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी सांगितल्यानुसार ही चर्चा महत्वाची आहे. त्यामुळे या चर्चेला पुरेसा वेळ देण्यात यावा. ही चर्चा उद्याही सुरु ठेवण्यात यावी अशी सदनातील सन्माननीय सदस्यांची भावना असून सन्माननीय सदस्यांची भावना माननीय सभापती महोदयांना सांगितली तर त्यामध्ये काही अडचण येणार नाही.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणात जाहीरनाम्याचा उल्लेख केलेला आहे. या सभागृहात अत्यंत महत्वाची चर्चा सुरु असून या चर्चेसाठी सदनाचे नेते उपस्थित राहतील असे मला वाटले होते परंतु विधानभेत पुरवणी मागण्या असल्यामुळे ते या सभागृहात काही वेळासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. माननीय श्री. एकनाथराव खडसे हे कृषी मंत्री असून ते या सदनाचे नेते आहेत. आजची चर्चा ही अतिशय महत्वाची असून ती शेतकऱ्यांच्या मदतीच्या संदर्भातील, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भातील आहे. आज मी या चर्चेच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात विचार मांडले असून त्यांनी मी मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात माहिती घेऊन माझ्या मुद्याच्या संदर्भात उत्तरामध्ये उल्लेख केला तर आम्हाला निश्चितपणे समाधान मिळेल.

Z-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, भाजपा आणि शिवसेना पक्षाने निवडणुकीच्या काळात जी आश्वासने दिली त्याची पूर्तता करावी यापेक्षा वेगळी मागणी मी सभागृहात केलेली नाही. मग ही आश्वासने कर्जमाफीच्या संदर्भात असेल, शेतकऱ्यांना मदत करण्याच्या संदर्भात असेल, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात असेल, संस्था स्थापन करण्याच्या संदर्भात असेल, या सर्व आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने पावले टाकलेली आहेत काय ? आम्ही फक्त विरोधी पक्ष म्हणून आपणास आठवण करुन देत आहोत एवढाच उल्लेख मी करु इच्छितो.

सभापती महोदय, मी या ठिकाणी दाभाडीचा उल्ल्ेख केला. माननीय पंतप्रधान दाभाडी येथे गेले होते. त्यानंतर आठव्या दिवशी त्या भागातील एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. माननीय मुख्यमंत्री पिंपरी गावात मुक्काम करुन आले. ज्या शेतकऱ्याने आत्महत्या केली होती त्यांच्या कुटुंबाला भेटले. त्याच कुटुंबातील मयत झालेल्या शेतकऱ्याच्या पत्नीने पंधरा दिवसात आत्महत्या केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी गावामध्ये जी आश्वासने दिली होती त्या आश्वासनांची पूर्तता करण्यात आली नाही. त्या ठिकाणी एकही अधिकारी गेला नाही. आत्महत्या झाल्यानंतर मी दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी गेल्यावर सर्व यंत्रणा आली. नंतर अनेक पक्षाचे नेते आले आणि त्यांनी मदत देण्याची घोषणा केली. परंतु काँग्रेस पक्षाने पिंपरी गावातील 13 आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत केली. त्या 13 कुटुंबावर जिल्हा बँकेचे कर्ज होते ते संपूर्ण कर्ज जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने फेडण्यात आले. परंतु शासनाकडून त्यांना कोणत्याही प्रकारची मदत मिळालेली नाही. दाभाडी येथे सांगण्यात आले होते की, एक समिती स्थापन करण्यात येईल. ते गाव दत्तक घेण्यात येईल. परंतु यापैकी कोणतेही काम झालेले नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सोलापूर जिल्ह्यातील कुरणूर गावातील दुष्काळी भागाची पाहणी करण्याकरिता गेले होते. परंतु दुसऱ्या दिवशी त्या भागातील एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. माननीय मुख्यमंत्री हे राज्याचे प्रमुख आहेत. माननीय मुख्यमंत्री ज्या भागात जातात त्या भागातील जनतेला दिलासा मिळाला पाहिजे. मुख्यमंत्री आमच्या गावात येऊन गेल्यामुळे आम्हाला आता कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही, आमच्या सर्व अडचणी दूर होतील अशाप्रकारचा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला पाहिजे. परंतु तसे काही झालेले नाही. उलट मुख्यमंत्री महोदयांनी भेट दिल्यानंतर त्या गावातील एका शेतकऱ्याने आत्महत्या केली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, राज्यामध्ये केंद्रीय पथक पाहणी करण्यासाठी आले. केंद्रीय पथकासमोर एका शेतकऱ्याने आपले दु:ख अनावर झाले म्हणून स्वत:ला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय पथक पाहणीसाठी येते, परंतु ते शेतकऱ्यांना दिलासा देऊ शकत नाही. माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्री पाहणी करण्यासाठी जातात, ते शेतकऱ्यांना विश्वास देऊ शकत नाही. या सरकारकडून फक्त खोटी आश्वासने दिली जात आहेत. या सरकारकडून शेतकऱ्यांची अत्यंत घोर निराशा झालेली आहे.

सभापती महोदय, हे सरकार शेतकऱ्यांना कोणती मदत देणार आहे, शेतकऱ्यांचे कर्जमाफ करणार आहे की नाही, शेतमालाला भाव देणार आहे की नाही असे प्रश्न निर्माण झालेले आहेत. सन 2004 ते 2014 या काळात आघाडी सरकारने गव्हाची किंमत 626 रुपयांवरुन 1400 रुपयांवर नेली.

**तालिका सभापती :** माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले भाषण लवकर पूर्ण करावे. कारण सर्व सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी वेळ देणे आवश्यक आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी ही चर्चा उद्या देखील सुरु ठेवावी, असे सांगितलेले असले तरी अजून 22 सन्माननीय सदस्यांना आपली मते मांडावयाची आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आमच्या गट नेत्यांनी सांगितलेले आहे की, माझे भाषण पूर्ण होईपर्यंत आमच्या पक्षातील इतर सदस्यांचा वेळ मला देण्यात यावा. हे सांगितल्यानंतरही आपण मला भाषण संपविण्यास सांगत आहात.

**तालिका सभापती :** आपल्या पक्षाकडून पाच सदस्यांची नावे आलेली आहेत. आपण पाच मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, पाच मिनिटामध्ये माझे भाषण पूर्ण होणार नाही. आपण मला वेळ द्यावा अन्यथा मी बोलत नाही. हा विषय पाच मिनिटांमध्ये मांडून होणार नाही.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यामध्ये नापिकी झाल्यामुळे एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

शेतकऱ्याला आपल्या मुलाच्या शाळेची फी देता आली नाही, शिक्षणासाठी पुस्तके विकत घेता आली नाही म्हणून शाळेत जाणाऱ्या मुलाने आत्महत्या केली. राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. आज शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. शेतीचे उत्पन्न झालेले नाही. दुष्काळग्रस्त भागातील दुष्काळ निवारण्यासाठी सरकारकडून पावले उचलली जात नाहीत. दुष्काळग्रस्त भागामध्ये मोठ्या प्रमाणावर मदतीची आवश्यकता निर्माण झालेली आहे. परंतु ती मदत मिळत नाही याबाबत सरकारकडून उत्तर मिळणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रत्येक गावामध्ये एक समिती स्थापन करावी असे सरकारकडून सांगण्यात आले. त्या गावातील सरपंच हे त्या समितीचे प्रमुख असतील. त्या समितीमध्ये इतर दहाजण असतील. या समितीने शेतकऱ्यांचे ब्रेनमॅपिंग करायचे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत या संदर्भात आम्ही जिल्हा स्तरावर बैठक बोलाविली होती...(बेल वाजविण्यात येते ) आपण आल्या बरोबर मला वॉर्निंग दिली.

**उप सभापती :** मी आपणास वॉर्निंग दिलेली नाही. आपणास विनंती केलेली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, कोण शेतकरी आत्महत्या करणार आहे याची तपासणी करावी. त्याचे डोके तपासावे. जर तो आत्महत्या करण्याच्या मन:स्थित्‌मध्ये असेल तर त्याला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करावे. शासनाने सर्व शेतकऱ्यांचे डोके तपासण्याचे काम हातामध्ये घेतले यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते ? शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी त्यांचे डोके तपासण्याचे काम घेतले आहे. मला वाटते शासनाचे डोके प्रथम तपासले पाहिजे. शेतकरी शुद्धीवर आहेत, परंतु त्यांना मदत मिळत नसल्यामुळे ते आत्महत्या करीत आहेत आणि ही वास्तविकता पाठीमागे घालण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जात आहे. या संदर्भात काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. शासन जे काही करीत आहे ते जनतेसमोर आहे. जनतेचा रोष काय आहे हे शासनाला माहीत आहे. या संदर्भात तत्काळ काही निर्णय घेण्याची आवश्यकता आहे म्हणून आम्ही नागपूर अधिवेशनात मोर्चा आणला होता. या मोर्चामध्ये आम्ही शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे अशी मागणी केली होती. कापूस, सोयाबीन, धान आणि संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यात यावी अशी मागणी केली होती. तसेच कांदा उत्पादक

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

शेतकऱ्यांना तीन हजार रुपये भाव मिळाला पाहिजे अशाप्रकारची मागणी केली होती. त्याशिवाय संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडलेला असल्यामुळे दुष्काळ निवारण्यासाठी ठोस उपाययोजना करावी अशी मागणी केली होती. तसेच पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना बी-बियाणे, औषधे आणि खतांची मदत करावी अश्‍ीही मागणी आम्ही केलेली आहे. शेतीच्या मशागतीची कामे रोजगार हमी योजनेतून घ्यावीत अशी देखील मागणी आम्ही केलेली आहे.

........AA-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

या सरकारने काय करावे आणि काय करु नये यावर मी भाष्य करणार नाही. परंतु मागच्याप्रमाणे शेतकऱ्यांना मदत करण्याबाबतची घोषणा करायची आणि नंतर काहीच लागू करायचे नाही असे केले तर ती जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होईल. या निमित्ताने आम्ही मागणी करतो की, कापसाला दर एकरी 25 हजार रुपये, सोयाबीनला दर एकरी 20 हजार रुपये, धानाला दर एकरी 20 हजार रुपये आणि संत्र्याला दर एकरी 75 हजार रुपये मदत द्यावी. किंबहुना, अशा प्रकारची मदत घोषित करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, कर्जाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, जे शेतकरी कर्जबाजारी आहेत ते बँकेपर्यंत पोहचू शकलेले नाहीत. जोपर्यंत त्यांच्या डोक्यावरील कर्ज काढून घेतले जात नाही तोपर्यंत ते बँकेत जाऊन कर्ज घेऊ शकणार नाहीत. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब आपण यवतमाळ जिल्ह्याचे उदाहरण दिले होते. आपण सांगितले की, गेली अनेक वर्षे यवतमाळ जिल्ह्यात केवळ 27 टक्के लोक बँकेची पायरी चढतात आणि उर्वरित 70 टक्के लोक बँकेची पायरी चढत नाहीत. मी जिल्हाधिकाऱ्यांकडून या संदर्भातील आकडेवारी घेतली. सर्व अभ्यास केला असता माझ्या निदर्शनास आले की, लोकांच्या डोक्यावर कर्ज असल्यामुळे ते बँकेपर्यंत पोहचू शकले नाहीत. 3 लाख 25 हजार लोकांपैकी 2 लाख 10 हजार लोक असे आहेत की, त्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा असल्यामुळे ते बँकेपर्यंत जात नाहीत. उर्वरित 70 हजार शेतकरी असे आहेत की, ते बँकेत जात नाहीत. यापैकी कोणाची जमीन पडीक असेल, कोणाला कर्ज घेण्याची आवश्यकता नसेल. जिल्ह्यामध्ये 4.5 लाख शेतकऱ्यांपैकी केवळ 60-70 हजार लोक असे आहेत की, ते बँकेत जात नाहीत. त्यामुळे या सरकारकडून 70 टक्के लोक बँकेत जात नाहीत असा प्रचार माननीय कृषी तथा महसूल मंत्र्यांनी करणे योग्य नाही. माननीय मंत्र्यांपर्यंत वस्तुस्थितीदर्शक माहिती का पोहचत नाही हे मला समजत नाही. मला वाटते खालचे अधिकारी माननीय मंत्र्यांना व्यवस्थित माहिती देत नाहीत, अशी शंका येते.

सभापती महोदय, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आजच्या घडीला खरोखरच मदतीची आणि कर्जमाफीची गरज आहे. कापूस एकाधिकार योजनेचे काय झाले याची माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना माहिती आहे. कापसाचे सर्वात जास्त उत्पादन घेणारा यवतमाळ



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

आणि परभणी जिल्हा होता. हे दोन्ही जिल्हे कापूस उत्पादनात पहिल्या-दुसऱ्या क्रमांकावर असायचे. परंतु आता सर्वात जास्त कापूस उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यामध्ये जळगाव जिल्ह्याचा नंबर लागतो. पूर्वी जळगाव जिल्ह्यात केळीची शेती मोठ्या प्रमाणावर होत होती. परंतु केळीचे उत्पादन घ्यायचे झाल्यास त्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागत होते. पूर्वी त्या भागात पाण्याची उपलब्धता होती. परंतु आता परिस्थिती बदलली. माननीय महसूल मंत्री हे जळगाव जिल्ह्यातील आहेत. आता जळगाव जिल्ह्यात केळी ऐवजी कापसाचे उत्पादन घेण्यास सुरुवात झाली आहे. त्या जिल्ह्यातील शेतकरी ठिबक सिंचनावर कापसाचे पीक घेत आहेत. या माध्यमातून त्या जिल्ह्यात कापसाचे चांगल्या प्रकारे उत्पादन घेतले जात आहे. मध्यंतरी त्या ठिकाणी कापसाच्या उत्पादनाची सरासरी खाली घसरली नव्हती. मागच्या वर्षी विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि इतर कोरडवाहू भागातील शेतीची सरासरी लक्षात घेतली तर ती अत्यंत कमी आलेली आहे. सरकारकडून सांगितले जात होते की, कापसाच्या उत्पादनामुळे खर्चाची भरपाई होत नाही म्हणून सोयाबीनसारख्या पिकाचे उत्पादन घ्यावे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीनचे पीक घेण्यास सुरुवात केली. सोयाबीन पिकाचे उत्पादन घेतल्यामुळे शेतकऱ्यांना दोन-तीन वर्षे चांगली मदत झाली. वाशिम, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यामध्ये 40 ते 60 टक्के क्षेत्रात सोयाबीनचा पेरा करण्यात आला. परंतु मागच्या तीन वर्षात सोयाबीन पिकाने पूर्णतः धोका दिला. मागच्या वर्षी उपादन आले नाही. जेवढ्या किमतीचे बियाणे टाकले तेवढ्या रकमेचे सुध्दा उत्पादन आले नाही. त्या भागात शेती उत्पादनावरील खर्च मोठ्या प्रमाणावर आला. कापूस वेचण्यासाठी 500 रुपये मजुरी दिली जाते. सध्या अशी परिस्थिती आहे की, कापूस वेचायला कोणी जात नाही. अशी अनेक कारणे आहे की, ज्यामुळे शेती उत्पादनाच्या खर्चात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. शेतीचा वाढलेला खर्च आणि पिकाचे कमी झालेले भाव बघता शेतकरी फार अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांना जर आपला कापूस 3800-4000 रुपये क्विंटलने विकावा लागत असेल तर त्यातून त्यांचा पेरणी आणि मजुरीचा खर्च सुध्दा निघू शकत नाही. परंतु आज ही परिस्थिती शेतकऱ्यांवर आलेली आहे. कापूस एकाधिकार योजना 1972 साली सुरु करण्यात आली. 2001 मध्ये ती बंद झाली. नंतर 2002 मध्ये व्यापारी आणि फेडरेशनच्या माध्यमातून कापसाची खरेदी करण्यास सुरुवात झाली. ही

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

व्यवस्था 2008 पर्यंत होती. परंतु फेडरेशनच्या तुलनेत व्यापारी हे शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव देत होते. त्यामुळे फेडरेशनमध्ये कोणीही कापूस विकत नव्हते. कारण शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडून क्विंटलमागे 5 हजार रुपये, 6 हजार रुपये, 7 हजार रुपये असा बऱ्यापैकी भाव मिळत होता. परंतु मागील दोन वर्षांपासून कापसाचे भाव प्रचंड खाली आलेले आहेत. शेतकऱ्यांच्या कापसाला प्रती क्विंटल 3800-4000 पर्यंत भाव मिळू लागला आहे. त्यातल्या त्यात फेडरेशनने पुरेशा प्रमाणात कापूस खरेदी केंद्र उघडले नाही. दिवाळीपूर्वी संपूर्ण राज्यात केवळ 14 खरेदी केंद्र उपलब्ध करुन देण्यात आले. त्यावेळी शेतकऱ्यांचा केवळ 25 टक्के कापूस खरेदी करण्यात आला. आता संपूर्ण राज्यात केवळ 57 केंद्र उपलब्ध करुन दिलेले आहेत. आज राज्यात जागोजागी मागणी आहे की, आमच्या भागामध्ये कापूस खरेदी केंद्र उपलब्ध करुन द्यावे. परंतु त्या अनुषंगाने काहीही कार्यवाही होत नाही. तसेच दुसऱ्या बाजूला व्यापारी हे शेतकऱ्यांची पिळवणूक करीत आहेत. एका बाजूला शेतीमध्ये उत्पादन आले नाही आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्या मालाला भाव मिळत नाही. शेतकऱ्यांना एका क्विंटलमागे तीन ते पाच हजार रुपयांपेक्षा जास्त तोटा आलेला आहे. या शेतकऱ्यांनी कर्ज कोठून भरायचे ? पुढील वर्षी काय परिस्थिती निर्माण होईल या बाबत माननीय महसूल तथा कृषी मंत्र्यांना माहिती नाही असे नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला नाही तर राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, सरकारच्या वतीने नद्या जोड कार्यक्रम घेण्यात येणार आहे. तसेच सौर उर्जेवरील 5 लाख पंप बसविण्यात येणार आहेत. शिवाय जलयुक्त शिवार अभियान योजना राबविल्यानंतर मोठ्या प्रमाणावर सिंचन होणार आहे. मी सांगू इच्छितो की, सरकारला दीर्घकालीन योजना करावयाच्या असतील तर अवश्य करा, त्यास आमची संमती आहे किंवा तसे करणे ही गरज आहे. परंतु गेल्या दोन-तीन वर्षांपासून शेतकऱ्यांच्या ढासळलेल्या आर्थिक परिस्थितीचा सुध्दा विचार केला पाहिजे. या काळात कापसाचे उत्पादन झाले नाही, त्यांच्या कापसाला भाव मिळत नाही. सोयाबीनचे उत्पादन झाले नाही, सोयाबीनला सुध्दा भाव मिळत नाही. अशा परिस्थितीत त्यांना मदत केल्याशिवाय दुसरा

श्री.माणिकराव ठाकरे....

कोणताही मार्ग असू शकत नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार नेमके काय करणार आहे हे आपण सांगितले पाहिजे. सरकार भविष्यात काय करणार आहे सांगता कामा नये. जलयुक्त शिवार अभियानामुळे किती पाणी साचले हे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले. त्यांनी असेही सांगितले की, ते पाणी शेतीपर्यंत जाणार आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी आता शेतीमध्ये विहिरी घ्याव्यात. शेतीमध्ये विहीर घेतल्याने शेतकऱ्यांच्या जीवनात संपन्नता येईल, असे त्यांनी सांगितले. परंतु या गोष्टी इतक्या सरळ आणि सोप्या नाहीत. आम्ही या सिंचनाच्या योजना अतिशय जवळून बघितल्या आहेत. ज्यावेळी मराठवाड्यात दुष्काळ पडला त्यावेळी त्या भागात शिरपूर पॅटर्न राबविला. तसेच पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा अनेक प्रकल्प घेण्यात आले. त्या योजनेची व्याप्ती वाढविली ही चांगली गोष्ट आहे. या योजनेची व्याप्ती आणखी वेगाने वाढविली पाहिजे याबद्दल दुमत नाही. कापूस एकाधिकार योजना बंद झाल्यानंतर सर्वात कमी भाव हा अलीकडच्या काळात मिळत आहे. गेल्या दोन वर्षात कमी भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती मोठ्या प्रमाणावर खालावली आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शिवसेना पक्षाचे नेते सन्माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांनी ज्या गोष्टी सांगितल्या त्या मला समजत नाहीत. त्यांचा पक्ष सरकारमध्ये आहे की सरकारच्या बाहेर आहे असा प्रश्न मला पडतो. ते दुष्काळग्रस्त भागात जाऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 10-10 हजार रुपये देत आहेत. राज्य शासन भिकारी झाले म्हणून त्यांना स्वत:ला जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन पैसे वाटावे लागत आहेत काय, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाच्या तिजोरीत पैसा नाही काय, त्यांचा पक्ष मंत्रिमंडळात नाही काय, त्यांचा पक्ष सरकारमध्ये सहभागी नाही काय ? सभापती महोदय, मी विचारु इच्छितो की, अशा प्रकारची नाटके करण्याची काय गरज आहे ?

..2बी..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

उद्या माननीय मुख्यमंत्र्यांना सांगायचे की, तुम्ही शेतकऱ्यांना मदत करत नसाल तर आम्ही मंत्रिमंडळामध्ये राहणार नाही, बाहेर पडतो. तुमच्यात ही हिंमत आहे का ? मंत्रिमंडळात कशा पध्दतीने जावे याकरिता तुमचे प्रयत्न सुरुआहेत. जास्तीचा वाटा मिळणे यासाठी प्रयत्न सुरुआहेत. लोकांना शंका येते. तुम्ही शासनामध्ये आहात आणि काय बोलत आहात ? (अडथळा) ताईच्या देखील काही वेगळ्या भावना नाहीत. आपण "दैनिक सामना" या वृत्तपत्रातून त्या पाहिल्या आहेत की, शासनाला त्यांनी काय काय म्हटले आहे. सत्तेसाठी सर्व मिळण्याचा प्रयत्न भाजपच्या शासनाकडूनही होत आहे आणि शिवसेना तर सातत्याने दोन्ही भूमिका मांडत आहे, विरोधी पक्षाचेही काम करत आहे आणि सत्ताही उपभोगत आहे. शिवसेनेने या दोन्ही भूमिका हातामध्ये घेतलेल्या आहेत. अनेक विषय आहेत. पण आपण या ठिकाणी आला आहात. मला माहीत आहे की, आपण येथे आल्यानंतर मला भाषण जास्त काही लांबवता येणार नाही. मला सविस्तरपणे बोलता येणार नाही.

**उप सभापती** : आपण माझ्यावर हेत्वारोप करत आहात. आपले आडनाव ठाकरे आहे. आपण मघाशी त्यांचाही उल्लेख केला म्हणून म्हणतो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण इशारा केला म्हणून मी म्हटले. माझी माननीय कृषी मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांना विनंती आहे की, त्यांनी कापसाच्या संदर्भात लक्ष दिले पाहिजे. मागच्या वर्षी कापूस फेडरेशनकडूनही पूर्ण खरेदी झाली नाही. त्यावेळी फेडरेशनकडून 26 लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला होता. जवळजवळ 88 लाख क्विंटल कापूस व्यापाऱ्यांकडूनच खरेदी करण्यात आला. सीसीआयने सुध्दा 60-70 लाख क्विंटल कापूस खरेदी केला. परंतु खेडा खरेदी मोठ्या प्रमाणात झाली. व्यापाऱ्यांकडे कापूस आला आणि त्यानंतर फेडरेशनला विकला. शासनाचे किंवा फेडरेशनचे याही वेळेला कापूस खरेदीचे कोणतेही नियोजन नाही. फक्त काही ठिकाणी कापूस खरेदी केंद्रे सुरु केली आहे. नियोजन केले आहे, सर्व शेतकऱ्यांचा कापूस घेत आहोत अशा प्रकारची परिस्थती फेडरेशनच्या संदर्भात नाही. त्यामुळे या दृष्टीनेही लक्ष दिले पाहिजे. आमची महत्त्वाची मागणी आहे. जनता सातत्याने लक्ष देऊन आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

आम्ही जी मागणी करत आहोत, ती आपल्याच जाहीरनाम्यात आहे, मी काही वेगळे सांगत नाही. आपण स्पष्टपणे म्हटले आहे की, आमचे सरकार आल्यानंतर आम्ही शेतकऱ्यांचे पूर्ण कर्ज थांबवू. आपण हे म्हटले आहे. ज्या शेती मालाचे नुकसान झाले आहे, त्याला नुकसानभरपाई देऊ असे आपण म्हटले आहे. मदत असे म्हटलेले नाही. दोन्ही पक्षाच्या जाहिरनाम्यात मदत नव्हे तर नुकसानभरपाई असे म्हटले आहे. आमच्या या दोन प्रमुख मागण्या आहेत की, सर्व उत्पादनाला म्हणजे् कापसाला, सोयाबीनला, धानाला, कांद्याला, संत्र्याला एकरी मदतीची घोषणा करावी आणि राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज पूर्ण माफ करावे . एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, दुष्काळ व शेतकऱ्यांना दिलासा देणे या संदर्भातील सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव आम्ही गेल्याच आठवड्यात दिलेला होता. विरोधी पक्षाचाही अधिकार असतो. अनेक वर्षांपासून सदनाची परंपरा, पध्दती, नियम आहेत. सत्ताधारी पक्षाकडून सुध्दा प्रस्ताव दर आठवड्यात दिले जात असतात. आठवड्यातील एक दिवस सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव असतो आणि त्यानंतर विरोधी पक्षाचा प्रस्ताव असतो. मी नम्रपणे रेकॉर्डवर आणू इच्छिते की, जुलैच्या अधिवेशनात सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाला वेळच मिळाला नाही. आम्ही पहिल्या आठवड्यापासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भातील प्रस्ताव दिला होता. परंतु त्या प्रस्तावाला वेळ मिळाला नाही. पाणी टंचाईवर प्रस्ताव दिला होता. परंतु त्याला वेळ मिळाला नाही. मला असे वाटते की, अनेक विषयांवर प्रत्येकाचे मतभेद जरी असले तरी, सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव केवळ प्रचारासाठी नसतो तर त्यामध्ये, सरकारमध्ये लोकशाही पध्दतीने सुधारणा घडविणे हे प्रत्येकाचे काम असते. सर्व सन्माननीय सदस्यांना आठवण असेल. पण मला मुद्दाम परत एकदा आठवण करून दिली पाहिजे की, ज्यावेळी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सरकारमध्ये होते, त्यावेळी आता विरोधी पक्षात बसणारे सर्व सन्माननीय सदस्य भूमिका मांडत होते, प्रश्न विचारत होते, सभागृहात लक्षवेधी सूचना लावत होते, शासनाकडून प्रस्ताव येत असताना सूचना करीत होते, याचा अर्थ त्यांचा हेतू, सरकार पाडायचा किंवा सरकारमधून कधी बाहेर पडत आहोत याची वाट पाहत बसायची असा नव्हता, हे योग्य नाही. मला वाटते की, आपण लोकशाहीची व्याख्या फार संकुचितपणे करीत आहोत. आपण ज्यावेळी सुप्रशासन म्हणतो त्यावेळी अर्थातच सरकारमधील चांगल्या गोष्टींचे कौतुक, प्रशंसा करणे, त्या लोकांपर्यंत पोहचविणे हे अपेक्षित असते, त्याचबरोबर तशा दुरूस्त्या किंवा सुधारणा करणे हे सुध्दा लोकशाहीमधील काम असते. आपण नेहमी म्हणतो की, दुष्काळी परिस्थिती आहे. येथे मघापासून अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणे झाली. सर्व ज्येष्ठ सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांच्या भाषणातील सर्व मुद्दे मी ऐकले नाहीत.

सभापती महोदय, सातत्याने होणारी नापिकी आणि याचा हवामान बदलाशी असणारा संबंध या संदर्भात फार काही बोलले गेले नाही असे मला वाटते. सरकारची धोरणे ही बदलली गेलीच पाहिजेत. संपूर्ण जगात सातत्याने हवामान बदलाचे विपरित परिणाम होत आहेत, त्या संदर्भात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

राज्य शासनाने दखल घेतली तरी आपल्याकडे त्याचे उत्तर काय आहे ? आज जवळजवळ उत्तर नाही. जी उत्तरे आहेत ती सर्व लाँग टर्म उत्तरे आहेत, त्यामध्ये सुध्दा भारत सरकारने स्वत:चा सहभाग दिला आहे. कृत्रिम पाऊस पडावा यासाठी आपण प्रयत्न केले. आमच्या माहितीप्रमाणे स्वत: माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी कृत्रिम पावसासाठी चालना दिली. सरकारचे दोष आहेत, नाहीत या संदर्भात प्रत्येक जण आपले म्हणणे मांडणारच आहे. पण "हवामान बदल" या विषयाकडे मी मुद्दाम लक्ष वेधू इच्छिते. शरद जोशी शेतकरी संघटनेचे नेते यांचे दु:खद निधन झाले आहे, उद्या त्यांच्यावर अंत्यसंस्कार आहेत. शेती मालाला भाव मिळावा, तसेच त्यांच्या मागण्यांच्या संदर्भात जवळजवळ 3 दशके त्यांनी शेतकऱ्यांना एक वेगळी परिभाषा मिळवून दिली. मला वाटते की, पक्षाच्या पलीकडे जाऊन, शरद जोशी यांच्याशी जरी थोडे फार प्रत्येकाचे मतभेद असतील तरी, त्यांनी जी तांडणी केली या संदर्भात विचार केला पाहिजे. कारण त्या आधारे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात जन चळवळ उभी राहिली. मला मुद्दाम उल्लेख केला पाहिजे की, शेत मालाच्या भावाच्या संदर्भात ज्या प्रकारचे बदल अपेक्षित आहेत ते होण्यासाठी अजून काही काळ लागेल. आमचे सन्माननीय सहकारी श्री. पाशा पटेल यांनी या सभागृहात बसून विरोधी पक्षात असताना गेली 5 वर्षे सातत्याने शासनाकडे मागणी केली की, आणेवारीची पध्दत बदलावी. मला येथे मुद्दाम उल्लेख केला पाहिजे की, राज्य शासनाने आणेवारीच्या पध्दतीमध्ये बदल करण्यासाठी विभागीय कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मांडलेला अहवाल स्वीकारला आहे. मी समितीच्या प्रत्येक सूचनांमध्ये जाणार नाही. मला महत्त्वाची सूचना अशी वाटते की, मागील 5 वर्षांचे सरासरी उत्पादन प्रमाण उत्पादन समजण्यात यावे. शासनाने स्वीकारलेल्या शिफारशीमुळे महसूल यंत्रणेमध्ये मूलगामी स्वरूपाचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. आपण गृहीत धरतो की, प्रत्येकाचा या दुष्काळ प्रश्नाशी सबंध आहे का ? सन 1972 ला दुष्काळ पडला होता, त्यावेळी मुंबईला "दैनिक महाराष्ट्र टाईम्स"मध्ये एक बातमी छापून आली होती आणि ती सत्यस्थिती होती. त्यावेळची बातमी आहे, मला कोणाची बदनामी करायची नाही. मराठवाड्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात मुंबईत आले होते. मुंबईते शेतकरी कुटुंबातील गोरगरीब लोक आले होते, फलाटावर थांबले होते, त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

कुटुंबातील महिलांकडून मुंबईतील सराफा बाजारात 1 लाख मंगळसुत्रे विकली गेली होती. ही भयंकर परिस्थिती सन 1972 च्या दुष्काळात होती. नंतरच्या काळात सरकारने रोजगार हमी योजना सुरू केली. शिवसेना पक्ष प्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांनी आम्हाला सांगितले की, शिवसैनिकांनी सरकार आणि शेतकरी यांमध्ये दुवा म्हणून काम केले पाहिजे. ते स्वतः बीडला आले होते. गेल्या वर्षी आम्ही दुष्काळासाठी दौरा केला होता. शिवसेनेचे आमदार मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र येथून निवडून आले. विदर्भातून संख्या थोडी कमी आहे. परंतु चांगल्या संख्येने निवडून आले.

....2C

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..........

पूर्वीपेक्षा आमची ताकद वाढली आहे. मी स्वतः नुकतीच औरंगाबाद जिल्ह्यात गेले होते आणि गेल्या तीन महिन्यात नगर जिल्ह्यातील पाथर्डी, लातूर जिल्ह्यातील औसा, औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, पुणे जिल्ह्यातील भोर, मुळशी आणि माण, खटाव या भागात वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने मी स्वतः जाऊन आले. या भेटीत आम्ही वेगवेगळी निरिक्षणे नोंदविली असून अहवाल तयार केले आहेत व ते मी आपल्यासमोर सूत्रबध्द पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे सभागृहात उपस्थित आहेत. ते मघाशी सभागृहात उपस्थित नव्हते. ते उपस्थित नसल्यामुळे विरोधी पक्षाला निरूत्साह आला होता. आता मंत्री महोदयांसमोर मुद्दे मांडणे, हे मी माझे कर्तव्य समजते.

सभापती महोदय, सुमारे 70 आमदार मराठवाड्यात आले होते. प्रत्येक तालुक्यात एक आमदार याप्रमाणे आम्ही 5-5 ठिकाणी भेटी दिल्या. त्यामध्ये रेशन दुकाने, रोजगार हमी योजनेची कामे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची भेट, चारा छावण्या आणि अन्य प्रश्न, अशा प्रकारे विभागणी केली होती. या भेटीदरम्यान कृषी विभागाच्या धोरणाच्या संदर्भात लोकांनी आमचे लक्ष वेधले. त्यांनी असे सांगितले की, वैजापूर तालुक्यात शेततळी, कांदा चाळी, शेडनेट, ठिबक सिंचन आणि फळबागा पुर्नरूज्जीवन यासाठी अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून ही सामुहिक शेततळी केली आहेत. या शेततळ्यांच्या मध्ये शेडनेट केले आहे. परंतु तेथील अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही गेल्या दोन वर्षापासून अनुदानाची सातत्याने वाट पहात आहोत. ही योजना अस्तित्वात आहे की, रद्द झाली, या संदर्भात त्यांना स्पष्टता नव्हती. आम्ही या संदर्भात औरंगाबाद जिल्हाधिकारी यांच्याबरोबर बैठक घेतली. सन्माननीय सहकार राज्यमंत्री श्री.दादाजी भुसे, अन्य 6 सन्माननीय सदस्य आणि मी स्वतः त्या बैठकीला उपस्थित होतो. त्यांनी आम्हाला खूप जाणीवपूर्वक सहकार्य केले. त्यांना आम्ही असे सांगितले की, 5 डिसेंबरपर्यंत तुम्हाला प्रत्येक तालुक्यातीन मुद्दे देतो, आम्ही असे 100 मुद्दे जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडले होते. त्यापैकी 40 ते 50 प्रश्नांवर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी लेखी उत्तरे आम्हाला 5 डिसेंबरपर्यंत दिलेली आहेत. शेडनेट, कांदा चाळी आणि फळबाग अनुदानाबाबत सरकारची काय घोषणा आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

आणि त्यांना दिलासा दिला पाहिजे. कृषी अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, एका तालुक्यासाठी 5 कांदा चाळींना अनुदान आहे. ही संख्या खूप अपुरी आहे. त्यामुळे कुशा पध्दतीने आणखी कांदा चाळींना आपण मदत करु शकू, हे सरकारने पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, वैजापूर येथील कृषी अधिकाऱ्यांनी सातत्याने लोकांची दिशाभूल केलेली आहे. श्री.मुनीर शेख, तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लोकांनी सातत्याने विनंती केली आहे. त्यांनी असे सांगितले की, धोरणात्मक निर्णय झाला नाही, त्यामुळे फळबागांसाठी अनुदान देऊ शकत नाही. अशीच उत्तरे आम्ही अन्य तालुक्यात देखील ऐकली आहेत. आमची अशी अपेक्षा राहील की, फळबाग अनुदानासंदर्भात सरकारने कोणती पावले उचलली आहेत, हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, तेथील दैनिक चालविणारे एक पत्रकार आणि शेतकरी आहेत. त्यांनी माझ्याकडे निवेदन दिलेले आहे. अशी 20 निवेदने माझ्याकडे आहेत. मी ती सर्व रेकॉर्डवर ठेवणार आहे. एका शेतकऱ्यांने असे लिहिले होते की, दोन वर्षे विजेच्या कनेक्शनसाठी तो प्रयत्न करीत आहे. परंतु, वेगवेगळी कारणे सांगून त्याला कनेक्शन दिले जात नाही. त्याने असे सांगितले की, विजेचे कनेक्शन मिळाले नाही तर मी आत्महत्या करणार आहे. मला हे सांगितले पाहिजे की, आज येथे येण्याअगोदर मी त्याला फोन केला होता. तेव्हा त्याने सांगितले की, 15 दिवसात मला कनेक्शन मिळणार आहे. या निमित्ताने मला असे विचारावयाचे आहे की, एखादी सरकारी योजना जाहीर केल्यानंतर अंमलबजावणी करण्यासाठी आपण खरोखरच यंत्रणा उभी करतो का ?

सभापती महोदय, सर्व पक्षाच्या आमदारांचा समावेश असलेली एक दुष्काळ निवारण समिती प्रत्येक तालुक्यात असली पाहिजे. आता सरकारने अशी समिती जाहीर केली आहे. परंतु, त्या समितीची कार्यपध्दती ठरली पाहिजे. महसूल, कृषी या विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत वारंवार तक्रारी येत आहेत. काही अधिकारी ठरवून खोटे बोलत होते. लातुर मधील आणि इतर तालुक्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

काही खोटे बोलणारे अधिकारी आम्हाला दिसले. आमदारांनी येऊन त्याबाबत रिपोर्ट केला. आम्ही तो अहवाल सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिलेला आहे.

सभापती महोदय, डी.पी.ची कनेक्शन दोन-दोन वर्षे प्रलंबित आहेत. अनेक शेतकऱ्यांनी यादी दिली आहे. ती यादी आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेली आहे. अन्न सुरक्षा योजनेत आपण शेतकऱ्यांचा अंतर्भाव केला, विशेषतः जे दुष्काळग्रस्त तालुके, जिल्हे आहेत, त्यामधील शेतकऱ्यांचा अंतर्भाव आपण केला आहे, ही चांगली गोष्ट आहे. ही यादी अपडेट झाली पाहिजे. शेतकरी असे सांगतात की, या यादीमध्ये आमचे नाव समाविष्ट केलेले नाही.

सभापती महोदय, काही दुकानांमध्ये धान्य वेळेवर मिळत आहे. अन्य जिल्ह्यातील काही तालुक्यात विशेषतः बीड आणि जालना जिल्ह्यात राऊंड फिगर म्हणजे 80 रुपये, 90 रुपये रेट असेल तर रेशन मिळेल, 76 रुपये असेल तर मिळणार नाही, असे काही रेशन दुकानदारांनी सांगितले आहे. सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत. आम्हाला प्रश्न पडला की, अन्न सुरक्षा योजनेमध्ये अगोदरच तुर डाळीचा समावेश केला असता तर प्रश्न निर्माण झाला नसता. कारण, शेवटी लोक आमटी-भात, आमटी-भाकरी खातात, भाज्या त्यांना मिळत नाहीत आणि परवडतही नाहीत. त्यामुळे तुर डाळ रेशनवर उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी आलेली आहे.

सभापती महोदय, आम्हाला अनेक असे शेतकरी भेटले की, थोडाफार पाऊस झाल्यानंतर त्यांनी तुर डाळ लावली आहे. परंतु, तुरीला हमीभाव मिळावा, अनुदान मिळावे, अशी मागणी अनेक शेतकऱ्यांनी केली आहे.

सभापती महोदय, कर्ज माफीचा विषय आहे. शेतकऱ्यांना कर्जामधून मुक्ती मिळण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलणे अपेक्षित आहे. त्यामध्ये आपल्याला असे दिसून येईल की, जे अनुदान मिळते ते फार तुटपुंजे आहे. अशा तक्रारी अनेक शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

सभापती महोदय, आणखी एक महत्वाचा मुद्दा रोजगार हमी योजनेचा आहे. रोजगार हमी योजनेच्या कार्डधारकांची यादी आता इंटरनेटवर उपलब्ध आहे, ही फार मोठी उपलब्धता आहे. गावामध्ये किती मजुर उपलब्ध आहेत, हे आता इंटरनेटवरुन दिसते. परंतु, असे लक्षात आले की, रोजगार हमी योजनेच्या मजुरांची जेवढी क्षमता आहे, त्या मानाने फार कमी मजुरांना काम मिळाले आहे. याची कारणेशोधण्याचा आम्ही प्रयत्न केला. गेल्या सहा महिन्यांपूर्वी, वर्षापूर्वी रोजगार हमी योजनेच्या मजुरांना मजुरी वेळेवर मिळाली नाही. खरे तर सरकारने ग्राम सेवकांप्रमाणे रोजगार हमी योजना सेवक नेमलेले आहेत. मी ज्या गावात केले होते त्या गावात रोजगार हमी योजना सेवक नेमलेला होता. मी अशी विनंती केली की, मला त्या सेवकाला भेटावयाचे आहे. मी त्यांना भेटले. त्यावेळी असे लक्षात आले की, तो सेवक ग्रॅज्युएट होता व यादी देखील अपडेट होती. त्याने असे सांगितले की, आम्ही तहसीलदारांकडे कामाची मागणी केली. परंतु महिन्याभरात कामेच निघालेली नाहीत. सरकारने ही कामे ताबडतोब निघण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देणे गरजेचे आहे. रोजगार हमी योजनेचा कायदा आहे. पण आपण अनेक वर्षांपासून या सभागृहात आहोत. कायद्याप्रमाणे आतापर्यंत राज्य नव्हते, आता ते होईल, अशी आशा आहे.

सभापती महोदय, तुमच्या आणि माझ्या आवडत्या विषयावर मी नंतर येणार आहे. रोजगार हमी योजनेच्या संदर्भात अंमलबजावणी व्हावी.

सभापतल महोदय, वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये शेततळ्यास मंजुरी मिळाल्यानंतर सुध्दा कार्यारंभ आदेश मिळालेला नाही. याखेरीज श्री.बाबासाहेब शिवाजी जगताप यांचे निवेदन मला प्राप्त झाले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून पूर्वी 12 मंजूर असलेल्या परंतु अद्याप सुरु न झालेल्या वैयक्तिक लाभाच्या विहिरी रद्द केल्या आहेत. त्याचा परिणाम असा झाला की, ज्या शेतकऱ्यांनी काही वर्षे धडपडून पूर्वीच्या लाभार्थ्यांच्या विहिरी बांधण्यासाठी गावात प्रयत्न केले त्या सर्व विहिरी रद्द झाल्या आहेत व नवीन लाभार्थी शोधले जात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. गैरव्यवहार झाल्यामुळे सरकारने त्या रद्द केल्या असतील तर माझी अशी विनंती आहे की,

....6....



डॉ.नीलम गो-हे.........

एखाद्या प्रकरणात गैरव्यवहार झाला असेल तर त्यामध्ये लाभार्थ्याचा काही दोष नाही. त्यामुळे लाभार्थी प्रामाणिक आहेत त्या प्रकरणात त्याच लाभार्थ्यांना लाभ दिला पाहिजे. अधिकाऱ्यांकडून गैरप्रकार झाला असला तरी शेतकरी प्रामाणिक आहेत. या दृष्टीकोनातून औरंगाबाद जिल्ह्यात 2500 शेतकऱ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहिरी रद्द झाल्यामुळे शेतकरी लाभापासून वंचित रहात आहेत.

...DD-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

पूर्वीचे अनुदान 1.98 लाख रुपये होते. आता बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याचे भाव वाढलेले आहेत. त्यामुळे विहिरींच्या बांधकामासाठी जे अनुदान मिळते ते वाढविण्यात यावे, असे त्यांचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, मी चारा छावन्यांच्या संदर्भात सांगू इच्छिते की, आम्हाला बहुतेक ठिकाणी विशेष अशा चारा छावन्या दिसल्या नाहीत. उस्मानाबाद जिल्ह्यातील धाराशीव येथे काही चारा छावन्या आहेत. मला पक्षाचे नाव घ्यायला योग्य वाटत नाही. परंतु, पक्षीय पातळीवर चारा छावन्या चालविल्या जाऊ नयेत, असे मला स्वतःला वाटते. मला आठवते की, स्व.गोपीनाथ मुंडे साहेब हयात असताना आम्ही बीड जिल्ह्याला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, ज्यावेळी चारा छावनी सुरु होते त्यावेळी जनावरांबरोबर गावातील एखाद्या म्हाताऱ्या माणसाला देखील चारा छावनीत जाऊन राहावे लागते. कारण, तेथे गुरांची व्यवस्था बघण्यासाठी कोणीही नसते. त्यामुळे खरे तर चारा छावनी गुरांबरोबर माणसांची देखील होते. म्हणून चारा गुरांच्या दावणीला मिळावा, अशी आम्ही सातत्याने मागणी केलेली आहे. यातून कशा प्रकारे मार्ग काढता येईल हे शासनाने जरुर बघावे.

सभापती महोदय, मी सांगू इच्छिते की, ज्या गावातील पुरुष मजुरीसाठी स्थलांतर करतात त्या गावात महिला एकट्याच असतात. तेथे महिलांवर हल्ले होणे, अत्याचार होणे किंवा त्यांना त्रास होणे अशा घटना घडत असतात. म्हणून शासनाने कमीत कमी स्थलांतर कसे होईल या दृष्टीने पावले उचलावित अशी माझी विनंती आहे. मी ठाणे, पुणे येथील नगर विकास विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली. कारण, पिंपरी-चिंचवड, पुणे, वाशी येथे स्थलांतरीत लोक येत आहेत. मी महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना विचारले की, आपण या संदर्भात कोणती तयारी केलेली आहे ? आम्हाला महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, स्थलांतराबाबत आम्हाला सरकारकडून अद्याप कोणत्याही सूचना मिळालेल्या नाहीत. माझे असे म्हणणे आहे की, लोक शहरात स्थलांतर करतात याबाबत रिव्ह्यू घेतला पाहिजे. जे लोक गावाकडून शहरात रोजगारासाठी येतात ते लोक नंतर गावी देखील जातील. परंतु, आज ते लोक शहरात येऊन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

झोपडपट्टीमध्ये किंवा इतर ठिकाणी राहत आहेत. त्यांना रोजगार मिळावा अशी अपेक्षा आहे. तसेच, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून स्थलांतराबद्दलचे काही ॲसेसमेंट झाले पाहिजे. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ मायग्रेशन ही संस्था सातत्याने या संदर्भात आढावा घेत असते. पूर्वी स्थलांतर झाल्यानंतर आम्ही त्या संदर्भात सभागृहात मुद्दा उपस्थित करीत होतो. मला तत्कालीन मंत्री महोदयांची नावे घ्यावयाची नाहीत. परंतु, त्यावेळी काही मंत्री सांगत होते की, कोणतेही स्थलांतर होणार नाही याची आम्ही हमी देतो. आपण वर्षानुवर्षे बघतो की, ग्रामीण भागातील लोक शहरात स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. गरीब लोक पिंपरी-चिंचवड, पुणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई अशा वेगवेगळ्या शहरात स्थलांतर करतात याची आपल्याला कल्पना आहे. म्हणून स्थलांतराच्या संदर्भात धोरण तयार करणे आवश्यक आहे. स्थलांतर झाल्यानंतर आपण त्याला कशा प्रकारे सामोरे जाणार आहोत याबाबत विचार केला नाही तर सातत्याने अतिक्रमणे होतात.

सभापती महोदय, मी बँकांच्या संदर्भात शेवटचा मुद्दा मांडणार आहे. बँकांना संवेदनशील कसे बनवायचे हे फार मोठे आवाहन आहे. विशेषतः मला दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी सांगितले की, आम्ही मुलांच्या शिक्षणासाठी बँकेकडे कर्जाची मागणी करतो. परंतु, आम्हाला बँकेकडून कर्ज दिले जात नाही. कोणत्याही बँकेकडून शैक्षणिक कर्ज मिळत नाही. त्यामुळे मुले कशा प्रकारे शिक्षण घेणार आहेत असा प्रश्न लोकांसमोर निर्माण होतो. तसेच, असे लक्षात आले आहे की, जी मुले वसतिगृहात राहतात त्यांची फी माफ झाली असली तरी त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली नाही. आम्हाला जेवढे शक्य आहे तेवढे धान्य आम्ही काही लोकांना देत आहोत. (...अडथळा...) सभापती महोदय, तुमचा इम्पॅक्ट यांच्यावर का होत नाही, हे मला कळत नाही. आपली प्रेमळ नजर त्यांच्यावर आहे, असे मला वाटते. मी सांगू इच्छिते की, आपण वसतिगृहातील मुलांची जेवणाची व्यवस्था कशी करु शकतो या संदर्भात शासनाने आणखी ठोस पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, आम्ही 70 आमदार मराठवाड्याच्या दौऱ्यावर गेलो होतो. त्या प्रमाणेच आम्ही माननीय श्री.उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली 19 आणि 20 तारखेला खान्देश दौरा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

करणार आहोत. जळगाव, नाशिक, धुळे या भागातील प्रत्येक तालुक्यात शिवसेना पक्षाचा आमदार जाणार आहे. (...अडथळा...) मी स्वतः मुक्ताईनगर तालुक्यात जाणार आहे. मी ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी पूर्ण केल्या असतील आणि ज्या मागण्या पूर्ण झाल्या नसतील त्या देखील ते पूर्ण करतील, अशी मला आशा आहे. या सर्व प्रक्रियेत आणखी वेगाने काम व्हावे आणि ज्या काही त्रुटी आहेत त्या दूर व्हाव्यात, असा आमचा हेतू आहे. ज्यावेळी आम्ही दौरा केला त्यावेळी अधिकारी आमच्याबरोबर अतिशय चांगले वागले आणि त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे त्यांनाही जाणीव आहे की, आम्ही शिवसेना पक्षाचे आमदार आहोत आणि दुसरे महत्वाचे म्हणजे त्यांनी स्वतः....

**उप सभापती** : आपण सत्तेत आहात याची देखील त्यांना जाणीव आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी दुसरे कारण तेच सांगणार होते. आम्ही बघितले की, 5 टक्के अधिकारी आमच्या समोर येण्यास टाळाटाळ करीत होते. परंतु, 95 टक्के अधिकारी उपस्थित होते. ज्या अधिकाऱ्यांच्या नव्याने बदल्या झालेल्या आहेत त्या अधिकाऱ्यांना अगोदर काय झाले याची माहितीच नाही. तुमच्या काळातील जे बदमाश अधिकारी होते ते कोठे लपून बसले ते आम्हाला माहिती नव्हते. आम्ही त्यांना शोधत होतो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेबांनी पुन्हा-पुन्हा सांगितले की, तुम्ही सत्तेतून बाहेर पडावे. परंतु, मी सांगू इच्छिते की, माननीय शिवसेना प्रमुख सक्षम आहेत. त्यांना जे योग्य वटते त्या प्रमाणे ते आम्हाला सूचना देतात. आम्ही आमच्या दौऱ्याचा अहवाल मुख्यमंत्री महोदयांकडे दिलेला आहे. मराठीमध्ये एक म्हण आहे, ती पुणेरी म्हण आहे आणि ती म्हणजे "शिंक्याच तुटल आणि बोक्याच फावल." (...अडथळा....) मला असे वाटते की, मांजर, बोका याला आणखी काही सोपे शब्द असतील तर ते मला माहीत नाहीत. आमच्या ज्या विधायक सूचना आहेत त्यातून यांनी राजकारण शोधू नये. मघाशी मी खाजगीत चर्चा ऐकली की, शिवसेना पक्षातर्फे जी मदत केली जाते ती कोठून केली जाते याचा शोध घेतला पाहिजे. आम्ही काय करतो आणि काय करीत नाही, हे तुम्ही सारखे शोधतच असता. तुम्ही ते जरूर शोधावे. (...अडथळा...) सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार तुमच्या पक्षाचे सदस्य

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

असतील तर तुम्ही त्यांचा आधार घ्यावा. परंतु, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार भारतीय जनता पक्षाचे सदस्य आहेत. मग तुम्हाला त्यांची आठवण का होते ? तुमचा विरह मी समजू शकते.

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीकोनातून काम करतो. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब सभागृहात आलेले आहेत. ज्यावेळी माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सभागृहात नव्हते त्यावेळी विरोधी पक्षाचे सदस्य माननीय श्री.दिवार रावते साहेब यावर काय बोलले असे विचारतात. माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब मंत्रिमंडळाच्या बैठकीत काय ते बोलत असतील, ते तुमच्या समोर कशाला बोलतील ? आमच्या पक्षाच्या मंत्री महोदयांनी देखील मुख्यमंत्री महोदयांकडे आणि इतरत्र योग्य पद्धतीने भूमिका मांडलेली आहे. आमच्या पक्षाचे मंत्री ज्या जिल्ह्यांचे पालकमंत्री आहेत तेथे देखील त्यांचे उत्कृष्ट काम आहे. परंतु, त्यामध्ये आणखी सुधारणा व्हावी या दृष्टीकोनातून आम्ही सर्वच भागामध्ये काम करीत आहोत. आमच्या मनात कोणताही दुजाभाव नाही. तुम्हाला सकाळी, दुपारी, संध्याकाळी माननीय श्री.उद्धव ठाकरे साहेबांची आठवण येते, याचा मला खूप आनंद वाटतो. तुम्ही त्यांच्यावर असेच प्रेम करावे आणि माननीय श्री.उद्धव ठाकरे साहेबांच्या मताप्रमाणे आमचे समाजकारण, राजकारण चालू राहणार आहे, एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपविते.

धन्यवाद.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 वाजता स्थगित करावी, असे ठरले होते. आता सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सकाळी 10.30 ते 12.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत दुष्काळाच्या प्रस्तावावरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तराह पूर्ण करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विशेष बैठकीत या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. या प्रस्तावावर आणखी 22 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

**उप सभापती :** आपल्याला सभागृहाच्या मागणी प्रमाणे पुन्हा निर्णय घेता येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.30 ते 12.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही